श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड, संचालित

मासिक

# ॥ रघुवीर समर्थ ॥

e-mail : raghuvirsmasik@gmail.com

मे २०१३,
वर्ष सातवे, अंक पाचवा,
मुल्य रु. १५



वेणीस्वामीयांच्या संगे।
आम्ही राहो आत्मरंगे।

# सज्जनगड



चैत्र पाडव्याला श्रीसमर्थ समाधी मंदिरासमोर
मंगलमय गुढीचे तोरण उभारण्यात आले



श्रीराम जन्म व श्रीसमर्थ जन्म कथा सांगताना वेदमूर्ती श्री.श्रीकृष्णशास्त्री जोशी,सातारा



पाळणा श्रीरामाचा आणि श्रीसमर्थांचा



अ.भा.वारकरी संघटनेचे अध्यक्ष श्री.रामेश्वर शास्त्री यांना
श्रीसमर्थ प्रसाद देताना श्री.मोहनबुवा रामदासी

# काळोशी



काळोशी येथे संस्थानने दिलेल्या व्यायाम साहित्याचे
पूजन करताना श्री.शहाजीबुवा रामदासी



काळोशी गावात श्रीसमर्थ पादूकांच्या मिरवणुकीत सहभागी तरुण मंडळी



काळोशीतील व्यायाम शाळेत श्री मारुतीरायाची स्थापना



श्री रामदासस्वामी संस्थान, सज्जनगड, संचालित

मासिक

# ।। रघुवीर समर्थ ।।

मे २०१३/ चैत्र-वैशाख शके १९३५

- वर्ष सातवे
- अंक पाचवा
- वार्षिक वर्गणी : रु. १५०
- चार वर्षांसाठी : रु. ५००
- आठ वर्षांसाठी : रु. १०००

**प्रत्ययज्ञाता सावधान। तयाचे ऐकावे निरूपण।**
**येणेकरिता बाणे खुण। परमार्थाची।।** दा.१७-४-३०

• मालक •
श्री रामदास स्वामी संस्थान,
श्री रामदास स्वामींचा मठ,
मु.पो. सज्जनगड, ता.जि. सातारा.
पिन ४१५०१३
फोन (०२१६२) २७८२२१
Website :
www.samartharamdas.com
E-mail :
samartharamdas@gmail.com

• संपादक •
स. भ. मंदारबुवा रामदासी उर्फ
श्री.मंदार प्रदीपराव कुलकर्णी

• कार्यकारी संपादक •
डॉ. सौ. ज्योत्स्ना कोल्हटकर

• मानद उपसंपादक •
स. भ. मोहनबुवा रामदासी

• संपादन साहाय्य •
स. भ. अमृतबुवा रामदासी

• मुखपृष्ठ •
सौ. अर्चना धीरज पेटकर

• प्रकाशक/मुद्रक •
श्री. सूर्याजी गवालाक्ष स्वामी (C.A.)
श्री रामदास स्वामी संस्थान,
सज्जनगड, जि. सातारा,

• मुद्रण स्थळ •
श्री गजानन प्रेस,
७६ अ, चिमणपुरा, सातारा

• सल्लागार मंडळ •
- श्री. भूषण महारुद्र स्वामी
- ॲड. महेश. ना. कुलकर्णी
- ॲड. राजेन्द्र. ना. कुलकर्णी
- श्री. विजय प. ठोंबरे
- कलेक्टर अँड कोर्ट ऑफ वॉर्डस् सातारा यांचे प्रतिनिधी

हे मासिक प्रकाशक श्री रामदास स्वामी संस्थानचे वतीने प्रकाशक व मुद्रक श्री. सूर्याजी गवालाक्ष स्वामी यांनी श्री रामदास स्वामींचा मठ, मु.पो. सज्जनगड, ता.जि.सातारा, (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. श्री गजानन प्रेस, ७६ अ, चिमणपुरा, सातारा येथे मुद्रित केले.
**संपादक-** स.भ.मंदारबुवा रामदासी उर्फ श्री.मंदार प्रदीपराव कुलकर्णी

## अनुक्रमणिका


- **संपादकीय** — मंदारबुवा रामदासी — ४
- **समर्थ महाद्वार** — शहाजीबुवा रामदासी — ६
- **श्रीसंत वेणाबाई-कार्य आणि कवित्व** — डॉ. सौ. स्मिता वि. कुलकर्णी — ७
- **महिला सबलीकरणात समर्थांचे योगदान** — डॉ. जोगेश्वर नांदुरकर — १२
- **अध्यात्मातले काय हवे ? तत्त्वज्ञान की ईश्वरदर्शन** — डॉ. नरेंद्र कुंटे — १४
- **शांती परते नाही सुख !** — ह. भ. प. भरतबुवा रामदासी — १७
- **अभंग योगवासिष्ठ** — श्री. वामन वा.कोल्हटकर — २०
- **यज्ञसंकल्पना-२** — शरयु दाते, रामदासी — २५
- **तुका म्हणे (अभंग ५ वा)** — सौ. माधुरी दि. जोशी — ३०
- **दृष्टांत** — अमृतबुवा रामदासी — ३३
- **मित्र,मैत्री आणि समर्थ** — श्री. ग. प्र. कुलकर्णी — ३५
- **दास म्हणे** — श्री. प्रसादबुवा रामदासी — ३७
- **श्रीराम जन्म (कविता)** — श्री. सुभाष शं. सरदेशमुख — ३८
- **दासबोध-सानुल्यांसाठी** — सौ. अनुजा सोमण — ३९
- **जुना दासबोध-आत्मनिवेदन (लेखांक १० वा)** — सौ. मंजिरी श. धूपकर — ४१
- **नमस्कार माझा सद्गुरु रामदासा (७)** — सौ. संध्या कोल्हटकर — ४३
- **विविध कार्यक्रम वृत्ते** — ४७
- **ग्रंथ मात्र धांडोळावा - प्रश्नमंजुषा** — ५०


• लेखातील मजकुराशी संपादक/प्रकाशक/सल्लागार सहमत असतीलच असे नाही.



## संपादकीय

# वेणीस्वामीयांच्या संगे। आम्ही राहो आत्मरंगे।

*सर्व समर्थ भक्तांसी*
*सादर जय रघुवीर!*

*चैत्र कृ. १४ या तिथीस श्रीवेणास्वामी श्रीसज्जनगडावर सद्‌गुरुंची आज्ञा घेऊन श्रीसमर्थांसमोर अखेरचे कीर्तन करून...*

***बंधविमोचन राम माझा । बंधविमोचन राम ।***
***शरण ही वेणा आत्मारामा । पावली पूर्ण विराम ।।***

*हे कीर्तनासाठी घेतलेले स्वरचित पद म्हणत सद्‌गुरूपदी विसावल्या.*

*''कायावाचामने यथार्थ रामी रमणे । तरीच श्लाघ्यवाणे रामदास्य ।''*

*श्रीसमर्थ शिष्या श्रीवेणास्वामींचे चरित्रच या ओळीतून व्यक्त झाले आहे. कायावाचामनाने खऱ्या अर्थाने राममय झालेल्या संत वेणास्वामींचे चरित्र मोठे दिव्य आहे. रामदास्याचं असिधाराव्रत अखेरच्या श्वासापर्यंत निष्ठेने सांभाळून श्री वेणास्वामी संपूर्ण विश्वाला आदर्श ठरल्या आहेत. सद्‌गुरुभक्तीत अंतरबाह्य रंगून गेलेल्या श्रीवेणास्वामी विश्वाला प्रकाशित करणारी 'भक्तिज्ञानवैराग्य दीपिका होऊन साधनमार्ग प्रशस्त करीत आहेत.*

*कोल्हापूरच्या गोपजीपंत देशपांडेंची कन्या, विवाह होऊन मिरजेला जाते परंतु लहान वयातच वैधव्य वाट्याला येतं. लौकिक अर्थाने सौभाग्य हरवलेली ही लहान मुलगी श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या सान्निध्यात येते आणि सद्‌गुरूकृपेने मोक्षश्री प्राप्त करून महद्‌भाग्याचं वाण सर्वांवर मुक्तहस्ताने उधळते.*

***मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ।।***

*श्रीसमर्थांनी मिरजेच्या मठपती म्हणून दिलेली जबाबदारी, लोकांसमोर उभे राहून कीर्तन करण्याचा दिलेला अधिकार व विशेष कौतुकाने 'राजकन्या' असे संबोधणे यातून श्रीसमर्थहृदयात वेणास्वामींचे असलेले विशेष स्थान लक्षात येते.*

***जाणत्याची संगती धरावी । जाणत्याची सेवा करावी । जाणत्याची सद्‌बुद्धी घ्यावी । हळूहळू ।।दा.१८-२-२।।***

*श्रीसमर्थांच्या सत्संगात वेणास्वामी यथार्थतेने रामदास्याचं मूर्तिमंत प्रतिक बनल्या. 'जगदीश धारणेने धरावा' अशी त्या व्यापक परमात्म्याला आपल्या कवेत घेणारी रामदासी धारणा संत वेणास्वामींच्या वाङ्मयातून ठाई ठाई व्यक्त होते.*

***आम्ही स्वामींचे अंकित । रामनामें मुद्रांकित ।***
***गुरूवाक्य प्रेमनौका । मायासागर तरलों देखा ।***
***अहंब्रह्म उपदेशिले । अहं गेले ब्रह्म ठेले ।***
***आली अनुभवाची खुण । खुण केली रामार्पण ।***
***वेणीस्वामी अवघा जाला । विज्ञानासी अंत आला ।।***

कोणत्याही सद्गुरुकृपांकित साधक-शिष्याचा लघुत्वाकडून गुरुत्वाकडे, अज्ञानतिमिरातून ज्ञानप्रकाशाकडे जाण्याचा प्रवास वेणास्वामी स्वानुभवाने व्यक्त करतात. समाजातील प्रवृत्ती आणि आंतरिक वृत्तींच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने चालून आपल्या शुद्ध स्वरूपाकडे, उगमाकडे झेपावण्याचं असिधाराव्रत घेणं हे किती कठीण असेल ? परंतु अनंत संकटांवर मात करून मनुष्य आपलं जीवन सत्याच्या पथावर ठेवून प्रकाशमय, प्रकाशरूप करू शकतो, याची खात्री वेणास्वामींच्या चरित्रातून मिळते.

**रामनामेंविण मज कंठेना ।।धृ ।।**
**कोणी निंदिती कोणी वंदिती । वास मी त्यांचा पाहीना ।।१ ।।**
**हृदयी धरिले सद्गुरुचरणा । प्राणान्तीही विसंबेना ।।२ ।।**
**वेणीचे निजधन रामचि जीवन । होणार ते का सुखे होईना ।।३ ।।**

एकदा श्रीसज्जनगडावर एक शिष्य मंचकावर निजून ग्रंथराज दासबोधाचे वाचन करत होता. ते दृश्य पाहून वेणास्वामींनी साष्टांग दंडवत घातला. शिष्य उठून उभा राहिला व हे काय करता ? म्हणून विचारले. तेव्हा 'श्रीमत् दासबोध साक्षात समर्थस्वरूप आहे, या रूपात मंचकावर असलेल्या सद्गुरुंना नमस्कार केला.' असे वेणास्वामींनी सांगितल्यावर शिष्य वरमला, त्याला आपली चूक लक्षात आली. कशाप्रकारे सद्गुरुबोधामृत वेणास्वामींच्यात अंतर्बाह्य भिनले होते, हे या घटनेवरून लक्षात येते. त्यांचे प्रत्यक्ष जीवन हेच इतरांना बोध देणारे प्रवचन झाले.


**गुरू निःशब्दांची बीजे । आम्हां प्राप्त आत्मकाजे ।।१ ।।**
**आम्ही अबोल अबोल । अबोलें बोलू बोल ।।धृ ।।**
**आमुची माया वांज जाली । येर ब्रह्मीं लया गेली ।।२ ।।**
**शब्द आकाशीं निमाला । आत्माराम अवघा जाला ।।३ ।।**
**वेणीस्वामीयाच्या संगे । आम्ही राहो आत्मरंगे ।।४ ।।**

काही शिष्य सद्गुरुंचे बोल ऐकून बोलू लागतात, काही शिष्य सद्गुरुंच्या मौनावरही बोलतात. काही शिष्य सद्गुरुंचे बोल ऐकून निःशब्द (तृप्त) होतात. तर काही शिष्य सद्गुरुंच्या निःशब्द मौनानेच निःशब्द(तृप्त) होतात. वेणीस्वामींना श्रीसमर्थांकडून निःशब्दाचं बीज जे परममौन (परमशांती), त्याची दीक्षा मिळाली. हे गुरुवाक्याच्या मननातून आलेलं परममौन इतरांनाही परमशांतीचा अनुभव देण्याएवढं बोलकं झालं.

श्रीसमर्थांच्या कायावाचामनाने झालेल्या यथार्थ सत्संगात सद्शिष्या वेणा 'स्वामी' झाली. सद्गुरुपदाचा आश्रय मिळून, सद्गुरुपदी चढून, सद्गुरुपदी विसावण्याचं महद्भाग्य प्राप्त करणाऱ्या श्री संत वेणास्वामी गुरु-शिष्य परंपरेत एकमेवाद्वितीयच आहेत. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्तानं त्यांच्या दिव्य समर्पित जीवनचरित्राचे स्मरण करून पुनीत होऊया!

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

- मंदारबुवा रामदासी (भ्रमणध्वनी - ९८६३२८१४०८)
C/o स.भ. मीनाताई भावे, श्रीधर-दत्त निवास, ४८४/८८, मित्रमंडळ सोसायटी, पुणे-४११ ००९.




सर्व समर्थ भक्तांसि
सादर जय रघुवीर!

## गुढीपाडवा

चैत्र शु. १ या दिवशी वसंत ऋतुचे आगमन झाले. या काळात निसर्गामध्ये विशेष असा बदल होत असतो. वृक्षवेलींना नवीन पालवी फुटत असते. अनेक प्रकारच्या फुलांच्या सुगंधाने आसमंत दरवळून गेलेला असतो. सगळीकडे आनंदी आनंद पाहण्यास मिळतो. या दिवशी सनातन हिंदुधर्माप्रमाणे नवीन वर्षाची सुरूवात होत असते. गुढीपाडव्यानिमित्त गडावर श्रीसमर्थ समाधी मंदिरात सजावट करण्यात आली होती. सगळीकडे तोरणे लावण्यात आली होती. प्रातःकाळी श्रीसमर्थ मंदिराच्या समोर गुढीचे पूजन करून शास्त्रोक्त पद्धतीने गुढी उभारण्यात आली. नंतर सकाळी दहा वाजता मंदिरामध्ये पंचांग वाचनानंतर कडू निंबाच्या पानाचे चूर्ण प्रसाद म्हणून वाटप करण्यात आले.

## श्रीरामनवमी

रामनवमी म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामाचा वाढदिवस. रामनवमी निमित्त गडावर अनेक कार्यक्रम पार पडले. त्यात सकाळी श्रीसमर्थ समाधीची महापूजा स्वामींच्या हातून करण्यात आली. महापूजेनंतर आरती, आरतीनंतर श्रीसमर्थ मंदिरात तेरा आरत्यांनी प्रदक्षिणा घालण्यात आल्या. प्रदक्षिणेनंतर सभामंडपात श्रीराम व श्रीसमर्थ जन्मकथा, श्रीकृष्ण शास्त्री सातारा यांनी सांगितली. दुपारी १२ वाजता श्रीरामाचा जन्म झाला. सभामंडपात एकच जयघोष करण्यात आला.

''प्रभू श्रीरामचंद्र की जय.''

''सद्‌गुरू श्री रामदास स्वामी महाराज की जय.''

म्हणून गुलाला फुले उधळण्यात आली. सगळीकडे आनंद आनंद झाला. श्री मोहनबुवा रामदासी यांनी श्रीरामाचा व श्रीसमर्थांचा पाळणा म्हटला. आलेल्या सर्व समर्थ भक्तांनी भोजन महाप्रसादाचा लाभ घेतला. गडावर अशा प्रकारे रामनवमी उत्सव पार पडला.

## श्री हनुमान जयंती

दरवर्षीप्रमाणे मारुती जन्माचा कार्यक्रम गडावर पार पडला. गडावरील पेठेतील मारुतीस व श्रीसमर्थ समाधीस पहाटे पाच वाजता रूद्र अभिषेकास सुरूवात झाली. त्याच वेळेत पेठेतील मारूतीसमोर श्री शहाजीबुवा रामदासी यांच्या सांप्रदायिक भजनाचा कार्यक्रम झाला. वेदपाठ शाळेतील विद्यार्थी व श्री बोधे सर यांनी भजनास साथ दिली. भजन चालूच होते. इकडे सूर्योदय झाला आणि मारूतीरायाचा जयघोष करून गुलाल फुले उधळण्यात आले. नंतर पाळणा म्हणण्यात आला. नंतर भजनाचा उपसंहार करून सर्व भक्तांस प्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमास गर्दी भरपूर होती.

दि. ५/४/२१३ रोजी श्री.पद्मनाभ मधुकर दामले, पुणे यांनी श्रीरामदास स्वामी संस्थानमधील गोशाळेस एक गाय दान केली. त्यांना स्वामींच्या हातून प्रसाद देण्यात आला.

।।जय जय रघुवीर समर्थ।।



# श्रीसंत वेणाबाई-कार्य आणि कवित्व

डॉ. सौ. स्मिता वि. कुलकर्णी,पुणे. मो. ९८२३३६४०८३

संत वेणाबाईंचे कार्यकर्तृत्व आणि कवित्व अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. समर्थ रामदास स्वामींच्या या शिष्येने आपल्या अंगभूत गुणांनी मठाधिपती म्हणून मोठे जबाबदारीचे काम केले होते. त्यांच्या प्रासादिक सहज काव्याला भारतीय वाङ्मयात मानाचे स्थान आहे.



वेणाबाईंचा जन्म करवीरनगरी इ.स. १६२८ च्या सुमारास झाला. त्यांचे वडील गोपजी देशपांडे गोसावी यांनी आपल्या या कन्येला लिहायला वाचायला शिकविले होते. वयाच्या आठव्या वर्षी वेणाबाईंचे लग्न मिरज येथील देशपांडे घराण्यात झाले. पण दुर्दैवाने बाराव्या वर्षीच त्यांना वैधव्य आले. वेणाबाईंच्या शांत-विरक्त स्वभावाची खात्री झाल्यामुळे त्यांच्या सासूबाईंनी त्यांना पोथ्यापुस्तके वाचण्याची परवानगी दिली. तर या घरच्या कुलोपाध्यायाने त्यांना एकनाथी भागवत वाचण्यास दिले होते. या थोर ग्रंथामुळेच त्यांना समर्थांची भेट घडली. दहाएक वर्षांची एक बालविधवा एवढा मोठा ग्रंथ वाचते आहे हे पाहून समर्थांनी विचारले, 'मुली, या ग्रंथातले तुला काही समजले का ?' तेव्हा वेणाबाईंनी नम्रपणाने त्यांना सांगितले की,'मी भक्तिभावाने हा ग्रंथ वाचते पण मला तो समजला आहे असे नाही.' त्यावेळी वेणाबाईंनी समर्थांना या ग्रंथाविषयीचे पंचवीस प्रश्न विचारले. हे प्रश्न साधेसुधे नव्हते. आत्मा, परमात्मा, अनात्मा, मूळ माया, चैतन्य, मोक्ष यांविषयीची वेणाबाईंची जिज्ञासा या प्रश्नांमधून प्रकट झाली. मग समर्थांनी हे सर्व प्रश्न एका अभंगात गोविले आणि त्यांची उत्तरे सांगणारा दुसरा अभंगही रचला. हे दोन्ही अभंग त्यांनी वेणाबाईंच्या हाती दिले.

समर्थांच्या दर्शनानंतर वेणाबाईंनी मनोमन ठरविले की हेच आपले गुरू. परमार्थाचा मार्ग तेच आपल्याला दाखवतील. त्या नित्यनियमाने समर्थांच्या कीर्तनांना जाऊ लागल्या. एके दिवशी त्यांनी अनुग्रह देण्याविषयी समर्थांना विनंती केली. वेणाबाईंची पारमार्थिक प्रगती पाहून समर्थांनी त्यांना मंत्रोपदेश दिला. वेणाबाईंचा जन्म धन्य झाला. पण समाजातील तेव्हाच्या रूढीनुसार या गोष्टीचा वेणाबाईंच्या घरच्या मंडळींना अतिशय त्रास होऊ लागला. शेजारीपाजारी या कुटुंबाला दूषणे देऊ लागले. अखेर अगदी नाईलाजाने वेणाबाईंच्या मातापित्यांनी आपल्या या लेकीपुढे विषाचा प्याला ठेवला. या साऱ्या दाहकतेतून समर्थांनीच वेणाबाईंची सुटका केली. ते त्यांना आपल्याबरोबर चाफळला घेऊन गेले. चाफळला समर्थशिष्या आक्काबाईंशी त्यांची मैत्री झाली. तेथील प्रसन्न, अभ्यासपूर्ण वातावरणात वेणाबाई रमून गेल्या. चाफळ मठातील उपहाराची व्यवस्था पाहण्याचे महत्त्वाचे काम समर्थांनी वेणाबाईंवर सोपविले. ही जबाबदारी सांभाळत वेणाबाईंनी ग्रंथवाचनही चालू ठेवले. त्यांचा आवाज अतिशय गोड होता. हळूहळू त्या उत्कृष्ट कीर्तने करू लागल्या. समर्थांनी वेणाबाईंचे कीर्तनकौशल्य जाणले म्हणूनच त्यांनी केवळ आपल्या या शिष्येलाच सभेमध्ये उभे राहून कीर्तन करण्याची अनुज्ञा दिली होती.

समर्थांचे तेजस्वी विचार आत्मसात करणे ही गोष्ट सोपी नव्हती पण अतिशय निष्ठेने वेणाबाई प्रयत्नशील राहिल्या. धार्मिक, आध्यात्मिक प्रश्न घेऊन अनेक साधक मठात येत तेव्हा समर्थ वेणाबाईंना त्यांची उत्तरे देण्यास सांगत आणि ती ऐकून अतिशय प्रसन्न होत. आपल्या या शिष्येवर समर्थांनी अपत्यवत् प्रेम केले. वेणाबाईंची गुरुनिष्ठाही पराकोटीची होती. आपल्या गुरूंचा कोणाकडूनही उपमर्द होणार नाही याची दक्षता त्या घेत

असत. एकदा एक शिष्य पडल्या पडल्या दासबोधाचे वाचन करतो आहे हे पाहताच त्यांनी त्याची कडक शब्दांत हजेरी घेतली होती. दासबोध या गुरुग्रंथाची असंख्य पारायणे त्यांनी अतिशय श्रद्धेने केली होती. त्यातील शिकवणीनुसार त्यांनी स्वतःलाही घडविले होते. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांच्या बुध्दिसामर्थ्याचा प्रत्यय येत असे. समर्थांचे समकालीन आणि थोर विचारवंत वामन पंडित हेही वेणाबाईंची कीर्तने ऐकून भारावून जात. जयरामस्वामी वडगावकर, रंगनाथस्वामी निगडीकर, आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर ही संतमंडळीही या मठात रामनवमीच्या निमित्ताने कीर्तनासाठी येत असत. त्यावेळी वेणाबाईंचेही कीर्तन होई.

वेणाबाईंच्या या गौरवशाली वाटचालीमागे समर्थ रामदासस्वामींची उदारमनस्कताही आहे. स्त्रीविषयक उदात्त दृष्टिकोन त्यांच्या वाङ्मयातून प्रकट होतो. स्त्री जातीची निंदा करण्याच्या अनिष्ट परंपरेवर त्यांनी आपल्या वाङ्मयातून वेळोवेळी प्रहार केले. 'जनी पाळिती सर्व नारी नराला। तया निंदिती शुद्ध नाही खराला।'' अशा शब्दात स्त्रीची निंदा करणाऱ्यांचा अधिक्षेप त्यांनी केला. आपल्या मठातील स्त्रीशिष्यांना समर्थांनी वात्सल्याने घडविले आणि लोकोद्धारासाठी त्यांना प्रेरित करण्याचे मोठे कार्य केले. ज्ञानाला आचाराची साथ मिळाली पाहिजे असा त्यांचा सदैव आग्रह असे. वेणाबाईंनीही हे सारे जाणून आपल्या ज्ञानप्राप्तीला क्रियाशीलतेची जोड दिली.

इ.स.१६५५ मध्ये वेणाबाईंनी मिरज येथे मठस्थापना केली. मठाधिपती म्हणून वेणास्वामींनी समर्थांनी दिलेल्या शिकवणीनुसार वाटचाल सुरू केली. मठामध्ये सर्वांनी यावे म्हणून त्यांनी धार्मिक उत्सव सुरू केले. या उत्सवांच्याद्वारे लोकशक्ती संघटित करणे आणि संस्कृतीचे संवर्धन करणे हे काम त्यांनी अनेक तरुणांकडून करवून घेतले. काहींना त्यांनी शिष्य म्हणून अनुग्रह दिला. श्री बाईयास्वामी या वेणास्वामींच्या थोर स्त्रीशिष्या होत्या. वेणास्वामींच्यानंतर त्यांनी मिरज मठाचा पदभार समर्थपणे सांभाळला. आपल्या काही शिष्यांबरोबर वेणाबाईंनी उत्तर भारताची यात्राही केली. अयोध्या, प्रयाग, काशी या तीर्थक्षेत्री जाऊन त्यांनी कीर्तनसेवा केली. हिंदी भाषा त्यांना अवगत होती. त्यांनी स्वतः काही हिंदी पदरचनाही केली आहे. गोड गळा आणि अभ्यासपूर्ण निरूपणामुळे त्यांनी लोकांना प्रभावित केले. तिकडेही त्यांनी काहींना शिष्यत्व दिले. त्या भागातील त्यांचे शिष्य आपल्या नावाबरोबर आपल्या गुरूचे नाव आदरपूर्वक लावतात. जसे-बेनीमाधव, बेनीप्रसाद इ.

वेणास्वामींच्या मिरज मठामध्ये तेव्हाचा किल्लेदार दलील खान हाही येत असे. इतकेच नव्हे तर वेणाबाईंचे तत्त्वज्ञानविषयक विचार ऐकण्यासाठी तो तेथे थांबत असे. सर्वांचा देव एकच आहे हे मूळ धर्मतत्त्व वेणाबाई समजावून देत. त्यांच्या सांगण्याने खान इतका प्रभावित झाला होता की, त्याने आपली कबर मठाच्या समोर बांधावी अशी शेवटची इच्छा व्यक्त केली होती. मिरज मठाची ख्याती वेणाबाईंच्या कार्यकुशलतेमुळे सर्वदूर पसरली. विवेकी आणि विश्वमैत्रीने प्रेरित झालेले महंत रामदास स्वामींनी घडविले. समाजशिक्षणाचे मोठे काम या महंतांनी केले. वेणाबाईही या कामात अग्रेसर होत्या. प्रबोधनाचे महाद्वारच त्यांनी उघडले. मुसलमानी राज्यांच्या बेबंदशाहीच्या त्या दुःस्थितीत शिवशाहीचा उदय ही एक आश्वासक घटना त्या काळाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसते. वेणाबाईंच्या एका पदामध्ये राज्याभिषेकाचे वर्णन येते. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे,'भक्तजन संत सज्जन। गोब्राह्मण प्रतिपाळाचे करती स्तवन। अनंत कोटी ब्रह्मांड भूपाळ जमले। वेणी सोहळा पाहाती। (श्रीवेणीकवन आणि पंचीकरण पद २४) शिवछत्रपतींना गौरविणारे गोब्राह्मणप्रतिपालक हे बिरुद त्यांच्या काव्यात आले आहे. त्यावरून रायगडावर झालेल्या शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ऐतिहासिक प्रसंगी त्या उपस्थित असाव्यात असे अनुमान केले जाते. स्वराज्याच्या कार्यासाठी समाजमन संघटित करण्याची मोलाची कामगिरी समर्थांचे मठाधिपती करीत होते. त्यांच्या या कार्याची नोंद शिवाजी महाराजांनी निश्चितच

घेतली असावी. म्हणूनच राज्याभिषेकाचा हा सोहळा मिरज मठाच्या अधिपती वेणास्वामी यांना प्रत्यक्ष पाहता आला असणार.

वेणाबाईंच्या कार्याप्रमाणेच त्यांचे काव्यही स्मरणीय आहे. अक्षरओळख त्यांना लहानपणीच झालेली होती. पुढे समर्थांच्या सान्निध्यात त्यांनी संस्कृतचे अध्ययनही केले.वाचनाची आणि ज्ञानप्राप्तीची मुळातच आवड असल्यामुळे भारत, भागवत, रामायण हे ग्रंथ त्यांना चांगले अवगत होते. ज्ञानेश्वरादि सर्व पूर्वसूरी संतांच्या काव्याचेही त्यांनी परिशीलन केले होते. संत तुलसीदास, कबीर, सूरदास, मीराबाई आदींच्या कवनांचा उत्तम अभ्यास त्यांनी केला होता. त्या स्वतः हिंदी भाषेतून सहजपणे काव्यरचना करीत असत.

वेणाबाईंची कविता ही प्रगल्भ आणि तितकीच हृदयस्पर्शी आहे. त्यातील सहजपणाने आणि गोडव्याने वेणाबाईंचे काव्य पुनःपुन्हा वाचावेसे वाटते. चैत्र वद्य चतुर्दशी शके १६०० (इ.स. १६७८) मध्ये वेणाबाईंनी सज्जनगडावर देह ठेवला. त्यांची कविता अखेरपर्यंत त्यांच्याबरोबर होती. सज्जनगडावर त्यांनी अखेरचे कीर्तन केले तेव्हा त्यांनी केलेल्या 'पतितपावना जानकीजीवना अरविंदनयना रामराया' या विनवणीने श्रीरामरायांच्या मूर्तीच्या नेत्रांमधूनही अश्रू ओघळले होते.

वेणाबाईंची आणखीही काही पदे आणि अभंग उपलब्ध आहेत. ही पदे परमार्थपर आहेत. काही पदांमधून श्रीरामाचे सुंदर वर्णन येते. 'जय देव जय देव जय कार्मुकपाणी' ही वेणाबाईंनी रचिलेली रामरायाची आरतीही प्रसिद्ध आहे. श्रीरामावर मनापासून भक्तिप्रेम करणाऱ्या वेणाबाईंनी श्रीरामासाठी शेजारतीही गाईली आहे. आजही ही शेजारती सज्जनगडावर रोज रात्री म्हटली जाते. 'धन्य होणे सफल जिणे रामगुणे होते। ध्यास पडे ज्यास त्यास सत्य कळो येते।'अशी काही पदे रामनामाचा महिमा सांगणारी आहेत. समर्थ रामदासस्वामी या आपल्या सद्‌गुरूंविषयी त्यांना नितांत आदर होता. 'हृदयी धरिले सद्‌गुरुचरणा प्राणांतीही विसंबेना' या त्यांच्या दृढ निष्ठेमुळेच त्यांनी अतिशय कणखरपणाने लोकनिंदेला तोंड दिले होते. गुरूंच्या सेवेत आपल्या जन्माचे सार्थक कसे झाले ते सांगताना त्यांनी म्हटले आहे,'गुरुवाक्य प्रेमनौका। मायासागर तरलो देखा। आम्ही स्वामीचे अंकित। रामनामे मुद्रांकित।' सद्‌गुरूंच्या विचारांचा आणि काव्यरचनेचा प्रभाव त्यांच्या कवितेतून जाणवतो तरीही घरगुती वळणाची भाषा, स्त्रीसुलभ सहृदयता ही वेणाबाईंच्या काव्याची गुणवैशिष्ट्ये आहेत. कौल आणि रामगुहसंवाद ही वेणाबाईंनी लिहिलेली दोन प्रकरणेही उपलब्ध आहेत. कौल हे प्रकरण २६ श्लोकांचे तर रामगुहसंवाद हे ४४ श्लोकांचे आहे.

कौल हे प्रकरण वेणाबाईंच्या प्रतिभेतील नाविन्याचे दर्शन घडविणारे आहे. रामप्रभू सिंहासनावर बसल्यानंतर त्यांना भेटण्यासाठी प्रजाजन येऊ लागले. धनधान्य, भाग्य, मनासारखे पुत्र अशा त्यांच्या मागण्याही सुरू झाल्या. या साऱ्या मागण्या लिहून ठेवाव्यात अशी आज्ञा रामरायांनी केली. आदर्श अशा रामराज्याविषयीच्या वेणाबाईंच्या कल्पना मुळातूनच वाचण्यासारख्या आहेत. रामराज्यातील ही प्रजाही वेणाबाईंच्याप्रमाणेच रामभक्तीत रमणारी आहे.

रामगुहसंवाद ऊर्फ नावेचे श्लोक- श्रीरामप्रभू लक्ष्मण आणि सीतेसह वनवासात जाण्यासाठी भागिरथी नदीच्या काठी आले. तेथे आपली 'तोयतारी' म्हणजे नाव घेऊन गुहक हा नावाडी उभा होता. श्रीरामांनी आम्ही तापसी आहोत असे त्यास सांगितले पण त्याला हे खरे वाटेना. 'वदा नाम स्वामी' अशी त्याने मनापासून प्रार्थना केली. तेव्हा हे प्रत्यक्ष श्रीरामप्रभू आहेत हे गुहाला कळले. त्याने रानफुलांनी रामरायाची पूजा केली. आणि मागणी केली की,'पुन्हा मागुतें याचि पंथेचि यावे। दिनानाथ सनाथ मातें करावे।।'' अतिशय हृद्य असा हा प्रसंग वेणाबाईंनी आपल्या शब्दकलेने जिवंत केला आहे. कीर्तन करताना एखादा प्रसंग श्रोत्यांच्या डोळ्यांपुढे वेणाबाई कसा उभा करीत असाव्यात त्याची कल्पना येथे येते. हा केवट (नावाडी) प्रसंग वाल्मिकी रामायणामध्ये जरी नसला तरी तो गोस्वामी तुलसीदासांच्या रामायणामध्ये आहे. रामचरितमानस या त्यांच्या ग्रंथाचे केवळ वाचनच

वेणाबाईंनी केले होते असे नाही तर या ग्रंथाचा सखोल अभ्यास त्यांनी केला होता.

**पंचीकरण-** आध्यात्मिक विचारांनी परिपूर्ण असे हे गद्य लेखन आहे. समर्थांच्या काळातील एका स्त्री अभ्यासकाचे लेखन म्हणूनही हे महत्त्वपूर्ण आहे. ब्रह्मापासून विश्वाची उत्पत्ती, या अफाट अशा विश्वामध्ये मनुष्यमात्राचे स्थान, जीवशिवाचे ऐक्य अशा काही विषयांची चर्चा येथे आहे. कीर्तनातील वेदांत रंगवताना स्वतः निःशंक असणे महत्त्वाचे आहे हे वेणाबाईंनी जाणले होते. म्हणूनच ही टिपणे त्यांनी आपल्या अभ्यासासाठी लिहिली आहेत. समर्थांच्या सहवासात राहून ज्ञान संपादन करणे आणि त्यांची शिस्त जोपासणे हे एक व्रतच होते. वेणाबाईंनी कणखरपणे ते सांभाळले.

वेणाबाईंनी काही रामायणेही लिहिली असावीत असे अनेक अभ्यासकांचे म्हणणे आहे. श्रीराम आणि आपला संप्रदाय यांची सेवा वेणाबाईंनी आयुष्यभर केली. ही त्यांची काव्यभक्ती त्यांच्या सीतास्वयंवर या ग्रंथातही प्रकट होते.

**सीतास्वयंवर**-रामायणातील सीतास्वयंवर हे आख्यान प्राचीन मराठी कवींच्या आवडीचे आहे. म्हणूनच या आख्यानावर विठ्ठल, नागेश, आनंदतनय, वामन आदी कवींनी सुंदर काव्ये रचिली आहेत. पण ती बहुतेक श्लोकबद्ध आहेत. ओवीबद्ध असे हे सीतास्वयंवर आख्यानकाव्य केवळ वेणाबाईंचेच आहे. इतकेच नव्हे तर वेणाबाई या सीतास्वयंवर हे आख्यानकाव्य लिहिणाऱ्या आद्य स्त्री कवयित्री आहेत.

मराठी भाषेतील आद्य कवयित्री म्हणून महदायिसेचे नाव घेतले जाते. धवळे, मातृकी रूक्मिणी स्वयंवर व गर्भकांड ओव्या अशी तीन प्रकरणे त्यांनी लिहिली आहेत. शके १२०८ च्या आधीच्या या रचना आहेत. नामदेवशिष्या जनाबाई यांचे हरिश्चंद्र आख्यान प्रसिद्ध आहे. भारतीय अन्य भाषांमधील स्त्रीलेखिका म्हणून रबिया (उर्दू), आंडाल (गोदावरी), (तमीळ) यांचा उल्लेख मिळतो. पण यांचे आख्यानकाव्य नाही. (डॉ.गो.रा.कुलकर्णी-भक्तिसाहित्यमें वात्सल्य भावना-हिंदी-मराठी) संत मीराबाईंचीही हिंदी पदरचना आहे. सीतास्वयंवरावर कोणतेही महाकाव्य संस्कृत साहित्यात आढळत नाही. एकूणच भारतीय भाषांमधील वेणाबाईंच्या आधीच्या ज्या स्त्री कवयित्री आहेत, त्यांची सीतास्वयंवर आख्यानकाव्य रचना नाही.अतएव वेणाबाई या सीतास्वयंवर हे आख्यानकाव्य रचणाऱ्या प्रथम स्त्री कवयित्री आहेत. शके १५७८ ते १५८० च्या आसपास ही काव्यनिर्मिती झाली असावी. (डॉ. पद्मा क्षीरसागर). एक संपूर्णस्वयंवर कथा आख्यानरूपाने सांगणे ही एक महत्त्वपूर्ण बाब आहे. वेणाबाईंच्या सीतास्वयंवर या आख्यानकाव्याचे वैशिष्ट्य असे की ते एका स्त्रीने रचलेले एकमेव आख्यानकाव्य आहे.

वेणाबाईंच्या या ग्रंथाचे १४ समास असून ओवीसंख्या १५६८ आहे. त्यांनी संस्कृत अध्ययनही केले होते. सीतास्वयंवराला आपण मूळ वाल्मिकीरामायणाचा आधार घेतला आहे असे वेणाबाईंनी म्हटले आहे. विश्वामित्रांनी दशरथाकडे यज्ञरक्षणासाठी पुत्रांची मागणी केली. रामलक्ष्मण त्यांच्याबरोबर वनात जातात. त्राटिकेचा वध, अहिल्येचा उद्धार या घटना कथन करून वेणाबाई जनकराजाच्या दरबारातील प्रसंग सांगतात. तेथे रावणाने केलेल्या वल्गना आणि रामाने केलेला शिवधनुष्यभंग या वर्णनानंतर कन्यादानाचा भावपूर्ण प्रसंग वेणाबाईंनी रंगविला आहे. सीतास्वयंवरातील लहानमोठ्या सर्व प्रसंगांची साद्यंत हकीकत वेणाबाई सांगतात. रामरायाची उपासना करणाऱ्या वेणाबाईंनी आपल्या भक्तिप्रेमाने हा ग्रंथ परिपूर्ण केला आहे. वेणाबाईंनी अतिशय आवडीने-मायेने सारे सांगितले आहे. स्वयंवरासाठी कोणकोणत्या देशांमधून राजे आले होते, स्त्रियांनी घातलेले दागिने, भोजनाचे विविध पदार्थ यांचे वर्णन येते. सीमांतपूजन, हळदसमारंभ, रुखवत, पायघड्या, सूनमुख, उखाणे, वरात अशा सोहळ्यांचे चित्रमय वर्णन वेणाबाई करतात. या काव्यामध्ये मनातील भावनांचे वर्णन करताना वेणाबाईंची लेखणी जणू कुंचला बनते. या भावभावनांचे सूक्ष्म दर्शन त्या घडवतात. विश्वामित्र मुनींची मागणी जनकराजाने मान्य केली. तेव्हा

अगदी न राहवून कौसल्या वसिष्ठमुनींना विचारते,'कौशिकाचिया यागासि। काय उणे होते द्यावयासी। संपत्ती सेना रायापाशी। दुजी तुळणा नसे।'

'मजकारणे दीनदयाळा। अरण्य शोधीत आलासी।' असे आर्तपणाने म्हणणारी अहिल्या, आपली कन्या रामरायाच्या स्वाधीन करताना 'माझ्या प्राणाची प्राणकळा। सुखदायक सुसीळा। परम स्नेहे भूपाळा। ईचे पाळण करावे।' असे व्याकुळपणे सांगणारे सीतेचे मातापिता, आपलेही आप्त होऊन जातात. वेणाबाई स्वतः त्या त्या प्रसंगाशी एकरूप होतात आणि आपल्या शब्दकळेने वाचकालाही तद्रूप करतात. शिवधनुर्भंगाचे वर्णन करताना त्यांची लेखणी किती प्रभावी होते हे पाहण्यासारखे आहे. 'रामें वोढिता कोदंड। मध्येचि झाले दुखंड। ध्वनि दाटले ब्रह्मांड। नभ कर्कश गर्जतसे।। मेरुमांदार सिखरें। घडघडिली ते अपारे। सप्तपाताळ दिगांतरे। नादे डोले वसुमति।' वेणाबाईंनी रचिलेल्या मंगलाष्टका, त्यांची बोधपर वचने या सर्वांमुळे हा ग्रंथ पूर्ण वाचल्याशिवाय ठेववत नाही.

ग्रंथाच्या शेवटी फलश्रुती आहे. 'भक्ति करिता याचे पठण। अथवा करिता श्रवण। त्यांचे मनोरथ पूर्ण। कर्ता राम समर्थ।' रामचरित्रात रंगून जाऊन वेणाबाईंनी गायिलेली ही सीतास्वयंवर काव्यकथा आजच्या काळातील वाचकालाही भावणारी आहे. कारण सार्वत्रिक अशा भावभावनाच येथे व्यक्त होतात.काळाचे अंतर उल्लंघून अमर ठरलेली ही रामकथा वेणाबाईंच्या भक्तिप्रेमाची निरंतर आठवण करून देणारी आहे. 'रामकथा ब्रह्मांड भेदूनि पैलाड न्यावी' हे समर्थांचे सांगणे वेणाबाईंनी प्रत्यक्षात उतरविले. रामभक्ती आणि गुरुभक्ती यांचा उत्तुंग आदर्श म्हणजे श्रीसंत वेणाबाई. त्यांना शतशः प्रणाम.

।।जय जय रघुवीर समर्थ।।

## 'रघुवीर समर्थ' मासिकातील पृष्ठ प्रायोजनासंबंधी

एप्रिल २०१३ च्या अंकापासून **'रघुवीर समर्थ'** मासिकासाठी पृष्ठ प्रायोजकत्व स्वीकारले जाईल.

आपण आपल्या नावाने, आपल्या दिवंगत आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ किंवा परिवारातील सदस्याच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ श्रीसमर्थ विचारांचा प्रसार व प्रचार सेवा म्हणून अंकातील एक अथवा अधिक पानांचे प्रायोजकत्व स्वीकारू शकता. प्रायोजित केलेल्या पानावर आपले नाव छापले जाईल.

**पृष्ठ प्रायोजनाचे दर :**
**एका अंकातील एका पानासाठी रु. ५००/-**

**अधिक माहितीसाठी संपर्क-**
**स. भ. मंदारबुवा रामदासी, ९७६३२७१४०७**
**श्री. रवि देशपांडे ९४०५५४२४६१**





पाटणकर बंधू यांचे
**।।श्री परमेश्वर।।**
**एक कलात्मक आविष्कार**
**सुबक मूर्तींचे एकमेव दालन**


६ इंचांपासून ते ६ फुटांपर्यंत
विविध देवदेवतांच्या,
साधुसंतांच्या
सुबक व आकर्षक
प्लॅस्टर ऑफ पॅरिस,
फायबर व मार्बलच्या मूर्ती
फोटोप्रमाणे तयार करून मिळतील.
**५७६ नारायण पेठ, रमणबाग चौक, पुणे ४११ ०३०**
फोन(०२०) २४४५ ०५८७/७५८८२ ३५८३३/९८५०० ७२९८२
Website : www.shreeparameshwar.com
**•कॉर्पोरेट गिफ्टची खास सोय•**
लायन शरदचंद्र पाटणकर (माजी प्रान्तपाल)यांचे सौजन्याने

# महिला सबलीकरणात समर्थांचे योगदान

डॉ. जोगेश्वर नांदुरकर, नाशिक

महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची सुरुवात संतांपासून झाली आहे. संत नामदेव माऊलीने संत जनाबाई माऊलीला सुशिक्षित केले. बाई मी लिहिणे शिकले सद्गुरूरायापाशी' असा स्पष्ट उल्लेख तिने एका अभंगात केला आहे. स्त्री शिक्षणाचा असाच प्रसार करणारे एक संत म्हणजे समर्थ रामदास स्वामी हे होत.

समर्थांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन अतिशय चांगला होता. स्त्री ही जणू आध्यात्मिक विकासाच्या मार्गातील धोंड आहे, अशा दृष्टीने त्यांनी स्त्रीकडे पाहिले नाही. उलट स्त्रियांविषयीचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत आदराचा होता, हे त्यांच्या एका काव्यातून स्पष्ट होते.त्या काव्यात ते लिहितात-

**बहुता दिसांच्या वयोवृद्ध मुला।**
**जनी बायकांच्या गुणे जन्म तुला ।।**
**तये जननीच्या कुळा निंदीतोसी।**
**वृथा पुष्ट तू मानवामाजि होसी ।।**

'अरे मुला, तू वयोवृद्ध झालास तरी तुला काही कळत नाही. तुझा जन्म स्त्री जातीच्याच पोटी झाला आहे, हे विसरू नकोस. त्याच आईच्या जातीची तू निंदा काय करतोस ? तू व्यर्थच पुष्ट झालेला दिसतोस.'

समर्थांचा स्त्री विषयक दृष्टिकोन इतका चांगला असल्यानेच समर्थांनी स्त्रियांना शिक्षण दिले. समर्थांचे भारतभर सुमारे ११०० मठ होते. या मठांमध्ये पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षण दिले जात होते.त्यामुळेच गिरीजाबाई ही समर्थांची शिष्या ग्रंथकार बनली होती. वेणाबाई या त्यांच्या शिष्येनेही बरीच काव्यरचना केली आहे.

समर्थांनी स्त्रियांना निव्वळ शिक्षण दिले नाही तर त्यांचा आध्यात्मिक विकासही घडवून आणला. त्या काळात स्त्रियांना संप्रदायात प्रवेश दिला जात नसे. पती हाच स्त्रीचा गुरू असे मानले जात असे. स्त्रियांना अनुग्रह हवाच असेल तर गुरूने प्रथम पतीला अनुग्रह द्यावा आणि मग स्त्रीने पतीकडून अनुग्रह घ्यावा असे मानले जात असे. समर्थांनी मात्र या परंपरेला छेद दिला. त्यांनी स्त्रियांना अनुग्रह देऊन आपल्या संप्रदायात सहभागी करून घेतले. त्या काळातील हे एक क्रांतिकारक पाऊल होते.समर्थांमुळेच त्या स्त्रियांचा आध्यात्मिक विकास झाला. त्या अध्यात्मिक क्षेत्रात महंतपदाला जाऊन पोहोचल्या. आजही त्या स्त्रियांचा उल्लेख समर्थ संप्रदायात 'आक्का स्वामी', 'वेणा स्वामी' असा केला जातो. इतर कोणत्याही संप्रदायात स्त्रियांना 'स्वामी' असे संबोधले जात असेल असे वाटत नाही. 'स्वामी' हा शब्द नेहमी पुरुषांसाठी राखीव असतो. समर्थांनी मात्र स्त्रियांनाही 'स्वामी' बनवले, ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

समर्थांनी आपल्या आध्यात्मिक क्षेत्रात पुरेशी क्षमता प्राप्त केलेल्या शिष्यांना इतरांना अनुग्रह देण्याचा अधिकार दिला होता. त्यात स्त्रियांचाही समावेश होता. म्हणजेच त्यांनी स्त्रियांना गुरुपदी बसवले होते.

आपल्या संस्कृतीने गुरूपद खूप श्रेष्ठ मानले आहे. गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ मानण्याची आपली संस्कृती आहे. असे हे श्रेष्ठ गुरूपद समर्थांनी स्त्रियांना दिले. ही बाब महत्त्वाची आहे. समर्थांचे 'समर्थ प्रताप' हे पहिले ओवीबद्ध चरित्र ज्यांनी लिहिले ते गिरीधर स्वामी हे एक विद्वान लेखक होते. या माणसाने किती लेखन करावे ? त्यांचे लहानमोठे चाळीस ग्रंथ आज उपलब्ध आहेत. या खेरीज त्यांचे शेकडो स्फुट अभंग, पदे, श्लोक आहेत. एवढ्या विद्वान आणि प्रतिभावान लेखकाची गुरू एक स्त्री होती हे सांगितले तर आश्चर्य वाटेल. त्या स्त्रीचे नाव होते बाइयाबाई. ही बाईयाबाई वेणा स्वामींची शिष्या होती.

म्हणजे समर्थांनी वेणा स्वामींना एवढ्या प्रतिभावान आणि विद्वान लेखकाची 'गुरूची गुरू' बनवले होते, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

विशेष म्हणजे वेणास्वामी या एक बालविधवा होत्या. त्या काळातील बालविधवांची परिस्थिती अतिशय दारुण होती. विधवा स्त्रियांना घरात किंवा समाजात आदराचे, सन्मानाचे स्थान नव्हते. उलट त्यांच्याकडे तुच्छतेच्या, तिरस्काराच्या नजरेने पाहिले जात होते. तिचा पती मरण पावला, हा जणू तिचाच दोष, असे समजले जात होते. विधवा स्त्रीचे दर्शन घडले तरी अपशकुन झाला असे समजले जात होते. लग्न किंवा  मुंज अशा मंगल प्रसंगी विधवा स्त्रियांना दूर ठेवले जात असे. अशा त्या काळात समर्थांनी वेणाबाईंसारख्या बालविधवेला आपली शिष्या बनवले, तिला सुशिक्षित बनवले, तिला 'गुरूची गुरू' बनवले या साऱ्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. समर्थांनी वेणास्वामींना कीर्तनकारही बनवले होते. गागाभट्टांसारखे विद्वान लोकही वेणास्वामींच्या कीर्तनाला बसत असत. जो समाज बालविधवांचे दर्शनही अशुद्ध मानत असे, तोच समाज वेणास्वामींचे कीर्तन ऐकत असे आणि कीर्तन झाल्यावर त्यांच्या पायावर डोके ठेवत असे ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

वेणास्वामींना समर्थांनी मिरज मठाचे अधिपती नेमले होते. अंबिकाबाई नामक समर्थांची दुसरी एक शिष्याही मठाधिपती होती. त्या काळात स्त्रियांना मठाधिपती नेमणे हे एक धाडसच होते. तो काळ स्त्रियांच्या दृष्टीने असुरक्षिततेचा होता. त्या काळात एका स्त्रीच्या हाती एखाद्या मठाची व्यवस्था सोपवणे हे तर खूपच मोठे धाडस होते. समर्थांनी ते धाडस केले. स्त्रीशक्तीवर त्यांनी केवढा विश्वास दाखवला हे बघण्यासारखे आहे.

समर्थांच्या महानिर्वाणानंतर सज्जनगडाची व्यवस्था आक्कास्वामींनी म्हणजे एका स्त्रीने सांभाळली, ही बाबही महत्त्वाची आहे. समर्थांच्या शिष्यवर्गात पुरुषांची संख्या मोठी होती. तथापि या सर्व पुरुषांचे नेतृत्व एका स्त्रीकडे गेले, ही त्या काळातील एक विलक्षण बाब म्हणावी लागेल. इतर कोणत्याही संप्रदायात त्या काळात असे घडले असते का ? हा एक प्रश्नच आहे. समर्थ संप्रदायात मात्र हे घडले आहे. त्या काळाच्या मानाने हा संप्रदाय किती प्रागतिक होता, हेच त्यातून स्पष्ट होते.

समर्थ संप्रदायाचे केंद्रस्थान असणाऱ्या सज्जनगडावरच आज समर्थांच्या समाधीजवळ वेणास्वामी आणि आक्कास्वामी यांच्याही समाध्या आहेत आणि समर्थांच्या समाधीप्रमाणेच याही समाध्यांचे लोक दर्शन घेतात, ही बाबही लक्षात घ्यायला हवी. आज स्त्री-पुरुष समानतेच्या तत्वाचा खूप उदो उदो होतो. ते तत्त्व समर्थ संप्रदायाने फार पूर्वीच अंमलात आणले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

समर्थांनी स्त्रियांना सुशिक्षित बनवले, संप्रदायात घेतले, त्यांना कीर्तनकार बनवले, त्यांना गुरुपद दिले, या सर्व गोष्टी तत्कालीन समाजाला रुचणे शक्यच नव्हते. स्त्री म्हणजे निव्वळ पतीची छाया असते, चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र असते, असे समजण्याचा तो काळ होता. अशा त्या काळात समर्थांनी स्त्रियांना असे सन्मानाचे, प्रतिष्ठेचे स्थान मिळवून द्यावे हे समाजाला कसे आवडणार ?

महात्मा ज्योतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी जेव्हा मुलींसाठी पहिली शाळा काढली, तेव्हा समाजाने त्यांना किती त्रास दिला, ते आपल्याला ठाऊक आहेच. हे दांपत्य शाळेत जाण्यासाठी रस्त्याने जात असे, तेव्हा लोक त्यांच्या अंगावर दगड किंवा शेणाचे गोळे फेकत असत. समर्थांचा काळ हा तर महात्मा फुले यांच्या कितीतरी अगोदरचा काळ होता. अशा त्या काळात समाजाने या सर्व गोष्टींना विरोध करावा हे स्वाभाविकच होते. या विरोधकांनी समर्थांचे आणि शिष्यांचे संबंध आहेत, अशा अफवा समाजात पसरवल्या होत्या. त्या अफवा समर्थांचे थोरले बंधु गंगाधरपंत उर्फ श्रेष्ठ यांच्या कानावर गेल्या. त्यांनी समर्थांना पत्र लिहून कळवले''यापुढे स्त्रियांना संप्रदायात प्रवेश देऊ नका.'' त्यावर समर्थांनी उत्तर दिले...

**पान १९ वर...**

# अध्यात्मातले काय हवे ? तत्त्वज्ञान की ईश्वरदर्शन

डॉ. नरेंद्र कुंटे, फोन (०२१७) २६०००03

अध्यात्मातले तुम्हाला काय हवे आहे ? तसेच बुद्धीने तत्त्वज्ञान समजून घेणारा एक वर्ग आहे आणि साधनेने ईश्वरदर्शन घडून यावे अशी इच्छा-कामना धरून राहणारा एक वर्ग आहे. तिसरा एक वर्ग असा आहे की, अध्यात्माची भानगड आम्हाला नको, तसेच आम्ही निरीश्वरवादी आहोत, त्यामुळे आम्हाला काय हवे, हा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रापंचिक जीवनात सर्व सोयी-सुविधा आहेत.. पैसा आहे... प्रतिष्ठा आहे. मग तुमच्या अध्यात्माची काय गरज आहे ? सर्व भौतिक सुखे आमच्या पायाशी लोळण घेत आहेत.

**प्रसंगांच्या तीन तऱ्हा**

हे तीन प्रकार कळून यायला तसे एक निमित्तही घडले. ते निमित्त कोणते म्हणाल तर (१) विज्ञान-संशोधन क्षेत्रात मोठ्या पदावर काम करून सेवानिवृत्त झालेले एक गृहस्थ भेटले. त्यांच्या बोलण्यातून परमार्थाची परिभाषा त्यांना उत्तमपणे ज्ञात आहे हेही कळून आले. मनुष्य हुशार होता. परमार्थापेक्षाही त्यावरील एका ग्रंथातील तत्त्वज्ञानाची बौद्धिकतेच्या आधारे तो उकल करून घेऊ पाहत होता. म्हणाला- ज्ञानेश्वरी व अभंग यांचे माझे वाचन नाही. भक्ती हाही माझा विषय नाही. पण ज्ञानदेवांचा स्वतंत्र आणि तत्त्वज्ञानस्वरूप असलेला ग्रंथ - अमृतानुभव : तो मी वाचतोय/ अभ्यासतोय. त्यातले अज्ञान खंडन मी समजून घेऊ इच्छित आहे. हा गृहस्थ वादपटुही होता. बुद्धीने तो काही प्रमेयही मांडू पाहात होता. मी म्हणालो- बुद्धीने तुमच्याशी वाद-प्रतिवाद करावा एवढी बुद्धिमत्ता माझेकडे नाही, तेवढा वेळही नाही आणि तशी माझी इच्छाही नाही. कोणतेही तत्त्वज्ञान कळून घ्यायला भक्ती हवी, त्यायोगे प्राप्त होणारी अनुभूतीही हवी, नामदेवांच्या प्रभावळीतील अठरापगड जातीच्या सर्व संतांनी भक्तीनेच तत्त्वज्ञान कळून घेतले आहे. माझे सद्‌गुरू, थोर तत्त्वज्ञ आणि साक्षात्कारी संत डॉ. रा. द. तथा श्रीगुरूदेव रानडे यांनी आपल्या समाधीवर खालील वाक्य कोरून ठेवण्यास सांगितले होते. ते म्हणाले की, 'तत्त्व-जिज्ञासेचे प्रश्न ईश्वरीपादपराग सेवेवाचून सुटत नाहीत. म्हणजेच भक्तिसेवेनेच अध्यात्माचे तत्त्वज्ञान कळून येईल. तुकोबा म्हणाले की, 'आम्ही वैकुंठवासी आलो याच कारणासी। अहो बोलिले जे ऋषी। साचभावे वर्ताया।।' त्यांना तत्त्वज्ञान कळून आले होते ते भक्तिसाधनेनेच ! ते गृहस्थ म्हणाले, मला भक्तीच्या भानगडीत पडावयाचे नाही. बुद्धीने थोडे कळून घ्यायचे आहे. मी म्हणालो, तुमच्या-माझ्या वाटा भिन्न आहेत. तुम्ही एखाद्या तत्त्वज्ञान शिकवणाऱ्या अभ्यासकाकडे जावे. त्यांचेशी होणाऱ्या चर्चेतून तुम्हाला काही कळू शकेल. (२) आणखी एक गृहस्थ भेटले- ते तर 'ॲलर्जी'चे डॉक्टर होते. माझी ओळख करून देताना माझे स्नेही त्यांना म्हणाले,'हे संत वाङ्मयाचे अभ्यासक नि उपासकही आहेत.' वाक्य संपायच्या आधीच ते म्हणाले,'मी निरीश्वरवादी आहे. यांचे-आमचे पटणार नाही एवढे सांगून ते आमच्या पासून दूर होऊन रस्ता चालू लागले. माझे स्नेही म्हणाले की, त्यांना 'भक्ती' विषयाची 'ॲलर्जी' आहे असे दिसते. (३) तिसरे एक गृहस्थ भेटले. ते म्हणाले 'मी गोंदवलेकर महाराजांचा शिष्य आहे. त्यांची उपासना करतो. जपमाळ करतो. त्यांची प्रवचने वाचतो. महाराजांच्या कृपेने प्रपंचही उत्तम चालला आहे. परमार्थातही गोडी लागली असून त्याद्वारे मी सुखी नि आनंदी आहे. देव केव्हा भेटेल तेव्हा भेटेल पण तो भेटावा या ओढीनेच मी त्यांची उपासना करीत आहे. तत्त्वज्ञानापेक्षा त्यांना ईश्वरदर्शनाची ओढ आहे. आम्हाला काय हवे आहे ?

सहजपणाने ही तीन तऱ्हेचे लोक भेटल्यानंतर खरेच माझ्याही मनाला प्रश्न पडला की, अध्यात्मातले कोणाला काय हवे आहे नुसते तत्त्वज्ञान ? देवदर्शन ? की या भानगडीत न पडता निरीश्वरवादाचा बोभाटा करीत बुद्धीच्या सामर्थ्यावर सूक्ष्म अहंकार जोपासत राहणे ? मग प्रश्न पडतो की, आम्हाला काय हवे आहे हे ठरविल्याशिवाय हा गुंता उलगडणार नाही. निरीश्वरवाद्याला पटवून देण्याच्या भानगडीत न पडणे हे उत्तम ! बुद्धीच्या वाटेने जाऊन वादपटुत्वाने सुखावून जाणाऱ्यालाही त्याच्या त्याच्या वाटेने जाऊ देणे हेही उत्तम ! मग आपली पंसती कुणाशी ? तर सुख-समाधान-आनंद यासही एका विशिष्ट संप्रदायातील उपासनेची शिस्त नि चौकट सांभाळून जगणारा नि भक्तीच्या अंगाने ईश्वरदर्शनाची ओढ धरणारा तोच आपल्याला त्याच्या भेटीतून नि सहज संवादातून उभयपक्षी भक्तिप्रेम जगणारा साधकच उपयोगी आहे. उपासनेचे पाथेय घेऊन जाणारा कुठल्याही संप्रदायाचा साधक सत्संगतीला बरा।। जो तो त्याच्या मार्गाने चालला आहे. त्यात भक्तीला आरंभ तरी झाला आहे. पुढे उपासना अधिक दृढ होऊन त्याला सगुण वा निर्गुण देवाचे दर्शन तरी घडून येईल. बुद्धीच्या वाद-विवादात लक्ष घालून काय उपयोग ? निरीश्वरवादीने तर स्वतः होऊनच आपली वाट ठरविली आहे. मग उरते ती वाट कोणती ? तर ती भक्तिप्रधान जीवन जगण्याची ! गुरू-नाम-साधना-संप्रदाय-अनुभूती हीच भक्तिमार्गाची 'पंचपदी' उत्तम आहे. ती वाट शोधायची कशी ? त्यावरून वाटचाल करायची कशी ? त्याची फलश्रुती कोणती ? इत्यादी प्रश्नांचा विचार करताना समर्थ रामदासस्वामी यांचा 'दासबोध' ग्रंथ या प्रश्नांची उकल करून सहजपणे आणि सुलभपणे तुम्हा-आम्हास मार्गदर्शन करतो. तत्त्वज्ञानापेक्षाही भक्तिप्रधान असा साधनाविचार आम्हाला हवा आहे. कारण त्यायोगेच ईश्वरदर्शन घडून येणे शक्य आहे. साधकाच्या पारमार्थिक-वाटचालीचे तेच खरे तर ध्येयही आहे. ध्येय ठरले की, मगच माणूस क्रियाशील होतो.

**परमार्थाचे जन्मस्थान**

'दासबोध' ग्रंथ हा समर्थ संप्रदायाचा प्रमाणग्रंथ आहे, तसाच तो निंबरगी संप्रदायाचाही प्रमाण ग्रंथ आहे. निंबरगीमहाराज- भाऊसाहेब महाराज उमदीकर- अंबुराव महाराज कुलकर्णी- गुरूदेव रानडे अशीही गुरूपरंपरा असून दासबोधावर यापैकी प्रत्येकाची टिप्पणी आहे. भाऊसाहेब महाराज हेही दासबोधावर प्रवचने करीत असत. गुरुदेव रानडे यांनी 'रामदास वचनामृत' नावाचा ग्रंथ संपादित केला असून त्यास विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. तसेच जो ओवीबंध त्यांनी निवडला आहे, त्यावर एक सूत्रभाष्य करणारे शीर्षकही दिले आहे. त्यावरून त्यांची अध्यात्मदृष्टी दिसून येते. समर्थ रामदासस्वामींचा विचार पाहण्याजोगा आहे. आता खरा प्रश्न असा आहे की, जो देव मानत ाही किंवा अध्यात्माचीच मुळात ज्यांना 'ॲलर्जी' आहे त्यांना देव आहे आणि अध्यात्मविद्या त्यासाठी उपकारक आहे हे सांगत बसण्यात अर्थ नाही. कारण ते आपली भूमिका सोडणार नाहीत. मग आपले आयुष्य वाया कशाला घालवायचे ? आपण त्यांचा मार्ग सोडून देणे हेच बरे !

दुसरा प्रश्न असा आहे की, ज्यांना बुद्धिजन्य वाद-पटुत्वाने केवळ तत्त्वज्ञान जाणून घ्यायचे त्यांचाही मार्ग सोडून देणे हेच उपकारक आहे. कारण तत्त्वज्ञानाचा कडबा चघळून देव भेटत नाही. काहीजण 'बौद्धिक-मेजवानी' देतात, एवढेच ! घरी आल्यावर कोणताच मुद्दा आठवणीत राहात नाही. मग उरतो तो प्रश्न असा आहे की, आपल्याला देव हवाय का? हवा असेल तर संतांनी सांगितलेला साधनमार्ग उपलब्ध आहे. त्या मार्गाने जाणे उत्तम। ज्ञानेश्वरी, नाथभागवत, नामदेव-तुकारामांची अभंग गाथा, समर्थांचा दासबोध, गुरुचरित्र वगैरे ग्रंथातून गुरू-नाम-साधना-संप्रदाय-प्रचिती याविषयी पुष्कळ लिहिले गेले आहे. इथे मात्र तूर्त तरी दासबोधाच्या आधारे साधनमार्ग पहावयाचा असून त्यायोगे ईश्वरदर्शनाचा विचार अनुसरावयाचा आहे.

परमार्थाचे जन्मस्थान कोणते म्हणाल ? तर समर्थ रामदास स्वामी सांगतात की, 'परमार्थाचे जन्मस्थान।

ते तू जाण सद्गुरुवचन। सद्गुरुभजन समाधान।अकस्मात तो बाणे। शरणागताची वाहे चिंता। तो एक सद्गुरू दाता। जैसे बालक वाढवी माता। नाना यत्न करोनी।। म्हणौनि सद्गुरूंचे भजन। जयासी घडे तोचि धन्य। सद्गुरूविण समाधान। आणीक नाही।। (दा. ७ -१० ओवी ३८-४०-४१)

**सद्गुरूंची भेट आणि बोध**

प्रपंच करता करता आपण परमार्थही करावा आणि त्यायोगे दोन्हीकडे सुख-आनंद प्राप्त करून घ्यावा अशी इच्छा झाली तरच परमार्थाची तळमळ लागून राहते. संसार आपोआप होतो. पण परमार्थ मात्र प्रयत्नपूर्वक करावा लागतो. त्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते. सद्गुरुंची भेट होऊन त्यांचेकडून नाममंत्र घेतल्याशिवाय साधन कसे करणार ? मग सद्गुरु कुठे भेटतील ? तर देहाने उपासना करून ज्यांनी ईश्वर पाहिला आहे आणि ईश्वर दाखविण्याची कृपाशक्ती ज्यांच्या नाममंत्र वचनात आहे ते देव पाहण्याची कृपाशक्ती देतात. गुरुवचन म्हणजे नाममंत्र होय. सद्गुरुभजन म्हणजे त्यांनी दिलेल्या नाममंत्राचे स्मरण करणे होय.

ही स्मरणोपासनाच देवाचे दर्शन घडविते. जर देहाने वावरणारे सद्गुरू भेटले नाहीत, तर काय करावे ? त्याचे एक सहजता असे आहे का ? 'समाधि स्थाने असती जिथे । चैतन्यकृपा वसती तिथे' समाधिस्थानी जाऊन तिथे आपल्या उपास्य दैवताचे नाम घेऊन त्यांनीच हा कृपामंत्र दिला आहे, अशी श्रद्धा ठेवून नामानुग्रह प्राप्त करून घेता येतो. ते नाम बीजच ईश्वरदर्शनाचे फळ प्राप्त करून देते. देहरूपी शेतात नामबीज पेरले तरच धान्यरूपी देवा प्राप्त होऊ शकेल. 'जिता सार्थक नाही केले। व्यर्थ आयुष्य निघोन गेले। मुळी धान्यची नाही पेरले। ते उगवेल कैचे।। (न. समास १० ओवी १८) नामाची नुसती पेरणी करून काय उपयोग ? तर ते म्हणतात की, 'संत पेरिले आणि उगविले। परंतु निगेविण गेले। साधने वीण तैसे जाले। साधकासी।'' (द. ५ समास ३ ओवी ९) ही निगा कोणती म्हणाल ? तर नामाचे स्मरण करणे होय. ते स्मरण कसे करावे ? तर 'नित्यनेम प्रातःकाळी। माध्यान्हकाळी सायंकाळी। नामस्मरण सर्वकाळी करीत जावे।।' (दा. ४ समास ३ ओवी ३)

नामस्मरणात्मक साधना केली तरच हळूहळू सगुण वा निर्गुण अशा स्वरूपाचे अनुभव येऊ लागतात. त्याच ईश्वरदर्शनाच्या खुणा होत.'भक्तिचेनि योगे देव। निश्चये पावती मानव।' असे समर्थ रामदास स्वामी यांनी ग्रंथारंभनिरुपण नाम समासात सांगितले आहे. ईश्वरदर्शनाकडे नेणारी साधना, समर्थ रामदास स्वामी यांनी 'नवविधाभक्ती'च्या विवरणातून स्पष्ट केली आहे.

**नवविधाभक्तीचे स्वरूप**

श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन अशाप्रकारे नवविधाभक्ती सांगितली गेली आहे. श्रवण म्हणजे केवळ ऐकणे नव्हे, तर श्रवण म्हणजे गुरूमंत्राची प्राप्ती होणे होय. स्मरण भक्तीत अखंडपणाने नामस्मरण करावे. श्रवण हे भक्तीचे 'प्रवेशद्वार' आहे आणि नामस्मरण ही परमार्थपदावरील 'वाटचाल' आहे.

मुखभक्ती कोणती म्हणाल ? तर ती नामस्मरणभक्ती होय. बाकी भक्तीचे प्रकार या मुख्य भक्तीला पूरक-पोषक असे आहेत. सगुण स्वरूपातील दर्शन हे स्वप्नदृष्टांताद्वारेही होऊ शकते. निर्गुण स्वरूपातील दर्शन हे तेज, आकार, नाद, बिंदू अशा स्वरूपातील असते. हळूहळू साधकाला त्याविषयी प्रेम वाटू लागते. त्याची श्रद्धा दृढ होऊ लागते. साधकाचा प्रपंचही सुखाचा होऊ लागतो. कारण तिथे तो सद्गुणसंवर्धनाकडे लक्ष देतो. त्यामुळे दुःख-कष्ट हे पचविण्याची ताकद त्याला प्राप्त होते. त्याला मनोबल असेही म्हणतात. परमार्थातही त्याच्यातले षड्विकार हळूहळू कमी होत गेल्याने तिथेही त्याला समाधान आणि शांती प्राप्त होऊ लागते. 'मी' पणाचा अहंकार नाहीसा होऊन तेथे 'देव' कर्ता होय, अशा भावनेने तो वागू लागतो. समर्थ रामदास स्वामी म्हणतात की,'मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी। राम कर्ता म्हणता पावसी। यश, कीर्ति, प्रताप।।' (दा. ६ समास ७ ओवी ३६) तुम्हा-आम्हांला तरी याशिवाय आणखी काय हवे आहे ? यश कीर्ति प्रताप यातच जीवनाची धन्यता आहे.



संप्रदाय कोणताही असो, गुरू कुणीहा असो नाममंत्र कोणताही असो, पण स्मरणोपासनेतूनच साधक

# शांती परते नाही सुख !

ह. भ. प. भरतबुवा रामदासी, बीड, मो. ९४२१३४४९६०

*बाराव्या तेराव्या शतकातील यादव राजाचा कालखंड हा महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा काळ आहे. याच काळात महाराष्ट्राच्या मायभूमीत 'ईश्वर निष्ठांची मांदियाळी' निर्माण करणाऱ्या संत महंतांचा सुकाळ झाला होता. संतांची अमृतवाणी मानवाच्या अंतरंगात सदाचाराचे बीजारोपण करीत होती. अविवेकाची काजळी दूर करून ज्ञानाची दिवाळी उजळविण्याचे काम महाराष्ट्रातील संतांनी केले...*

विकार विवशतेचे ग्रहण लागलेल्या आजच्या वर्तमानकाळात मानवी मनाची शांती हरवली. त्यामुळे जीवनात सुख, समाधान, आनंद दिसत नाही. जीवनाची प्रतिष्ठाच ज्या आध्यात्मिक मूल्यांवर आधारित आहे ती मूल्ये त्या मूल्यांचे संस्कार जर मानवी जीवनावर बिंबवले गेले तर आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंतचा टप्पा सहज गाठता येईल.

ज्या सुखासाठी आजचा मानव रात्रंदिवस धडपडत आहे ते सुख त्याला एवढी धडपड करून मिळते का ? डनलॉपच्या गादीवर झोपल्यानंतर जर झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागत असतील तर या झोपेला सुख मानणार काय ? सुखाचा मार्ग सांगताना संत तुकाराम महाराज म्हणतात-

**शांती परते नाही सुख। येरं अवघेचि दुःख।**
**म्हणवुनि शांती धरा। उतराल पैल तीरा।।**

अध्यात्मशास्त्रात शांतीला विशेषत्वाने महत्त्व आहे. आता प्रश्न असा पडतो की, शांती म्हणजे काय ? तर याचे उत्तर देताना अध्यात्मशास्त्र सांगते की, जो मनुष्य निरिच्छ विकाररहित जीवन जगतो त्यास शांतीची प्राप्ती होते. निरिच्छ व विकाररहित जीवनाची जी अवस्था त्यासच शांती असे म्हटले आहे. जो माणूस सर्व इच्छांचा त्याग करून काम, क्रोधादि षड्विकारांचा त्याग करून जीवन जगतो तोच शांती सुखाचा अनुभव घेऊ शकतो. संतांनी विकारावर विजय मिळविला होता. काम-क्रोध-लोभ निमाले ठायिची...! अशी संतांची वृत्ती होती. नाथांचे जीवनचरित्र बघा..! केवढा शांतीचा सागर..! **चित्ताला क्रोध कधी शिवलाच नाही.**

नाथांची किर्ती ऐकून एक पांथस्थ ब्राह्मण पैठणात आला. मुलांच्या मौंजी करायच्या होत्या. दारिद्र्याने पिडलेला होता. या गावात काही द्रव्य, भिक्षा मिळेल या आशेने तो पैठणला आला. कर्मधर्मसंयोगाने काही टवाळखोर मंडळी गावातील चौकात बसलेली होती. त्यांची आणि या पांथस्थ ब्राह्मणाची गाठ पडली. त्यानेही आपली सत्य परिस्थिती त्या मंडळींच्या कानांवर घातली. नाथांच्याबद्दल विलक्षण द्वेष करणारी ती मंडळी होती. या नाथांची शांती भंग करण्याचा त्यांनी विडाच उचलला होता. आता हीच योग्य संधी आहे असे समजून ते टवाळखोर म्हणाले, ''विप्रा, आम्ही तुला मुलांच्या मौंजी बंधनाकरिता हवे तेवढे पैसे देऊ पण या गावात शांतीसागर नाथमहाराज राहतात. त्यांना तू राग आणून दाखवायचा.'' या विप्राला वाटले हे काम तर अगदीच सोपे. पैजेचा विडा उचलून तो नाथांच्या वाड्यात आला. आणि देवपूजेत रंगलेल्या नाथांच्या मांडीवर, अंगावरील कपडे आणि पायातल्या जोड्यांसह जाऊन बसला. नाथ जरासुद्धा रागावले नाहीत. हास्यवदनाने त्याला म्हणाले,''वा ! वा ! आपण मला भेटण्याकरिता इतके अधीर झालात की कपडे व जोडे काढण्याकरिताही आपणास वेळ मिळाला नाही. आपल्या रूपाने मला आज प्रत्यक्ष पांडुरंगाचेच दर्शन झाले. नाथांची ही अमृततुल्य वाणी ऐकून तर तो नाथांना शरणच आला. संतांचा आचार

आणि विचार किती उच्च दर्जाचा होता.

**कोणाहि जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।**

हेच त्यांच्या भक्तीचे खरे मर्म होते. अशी अवस्था मानवी जीवनात निर्माण होण्यासाठी विकार नष्ट झाले पाहिजेत. विनोबांनी गीताईमध्ये म्हटले आहे की-

**रागद्वेष परि जाता आली हातात इंद्रिये।**
**स्वामित्वे विषयी वर्ते त्यास लागे प्रसन्न।।**
**प्रसन्नतेने बुद्धीची स्थिरता शीघ्र होतसे।**

अशांतस्य कुतः सुखम्। अशांत माणसाला सुख लाभत नाही. मनात काम, क्रोध, मोह, मत्सर, अहंकार, स्वार्थ, हिंसा, भीती इ. विकार असले की माणूस अशांत राहतो. या सर्व विकारांचा त्याग करता आला की शांती आपोआप मिळते. 'त्यागात शांती निरंतरम्.' भोगात मिळणारा आनंद क्षणिक असतो. त्यागातून मिळणारा आनंद शाश्वत असतो. संयमाने आणि विवेकाने मनाला हळूहळू शांतीच्या मार्गावर आणता येते, असा संतांचा ठाम विश्वास आहे.

आजच्या वर्तमान युगात आपण क्रांतीची भाषा बोलतो पण शांतीतून ही क्रांती निर्माण करता येते. संतांनी शांतीतून क्रांती केली. खलाची दुष्टप्रवृत्ती बदलण्यासाठी कुठल्याही संताने हातात शस्त्र घेतले नाही. श्रेष्ठ जीवनमूल्यांचा विचार त्यांनी आचारसिद्ध केला. आज सुधारलेल्या जगात बिघडलेला माणूस पाहताना या दैवी संपत्तीचा गुण आचरणात आणण्याची नितांत गरज आहे.

**तरी हे कामु क्रोधु पाही। ज्या कृपेची साठवण नाही।**
**हे कृतांताच्या ठायी। मानिजेती।।**
**साध्वी शांती नागविली। मग माया मांगीन श्रृंगारली ।**
**तिये करवी विटाळविली। साधु वृंदे।।**
**इहि संतोषवन खोडीले। धैर्य दुर्ग पाडीले।**
**आनंद रोप सांडिले। उघडोनिया।।**

परमेश्वर प्राप्तीसाठी शास्त्राने तीन मार्ग सांगितले आहेत. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग व भक्ती किंवा उपासनामार्ग. या तीनही मार्गात सर्वसामान्य जीवाला आचरण्यास तिसरा मार्ग सुखकर व सोपा आहे. ज्ञान मार्गात क्रोध विघ्न आणतो. कर्म मार्गात काम विघ्न आणतो व भक्तीमार्गात लोभ विघ्न आणतो. काम आणि लोभ विषयातून क्रोध निर्माण होतो. काम पूर्ण झाला तर लोभ आणि काम अपूर्ण राहिला तर क्रोध निर्माण होतो. परमेश्वर दर्शनाच्या आड येणारे हे पर्वत साधकाला सर्व प्रथम बाजूला सारावे लागतील. सर्व प्रथम बाजूला सारावे लागतीत, हे दोन पर्वत ओलांडूनच साधकाला खडतर मार्ग चालावा लागेल. तुकाराम महाराज म्हणतात-

**काम क्रोधा आड पहिले पर्वत । राहिले अनंत पलिकडे।।**

क्रोधातून संपूर्ण मानवी जीवनाचा नाश होतो. महान महातपस्वी, ज्ञानी योग्याला देखील क्रोधावर विजय मिळविता आला नाही. मानवी जीवनात क्रोध निर्माण झाला की शांती हरवून जाते. क्रोधी माणूस अशांत बनतो आणि क्रोधाच्या भरात वाटेल ते पाप करायला तयार होतो. म्हणून ज्ञानराज माऊली या विकारावर भाष्य करताना म्हणतात,-

**हे ज्ञान निधीचे भुजंग।**
**विषय दरीचे वाघ भजन मार्गीचे मांग। मारक जे।।**

चित्ताची शांती ढळू न देता परमेश्वर चरणी अखंड प्रेम ठेवल्यास हे विकार बाधत नाहीत. नसता क्रोधाला आहारी गेल्यावर जीवाची केवढी दुर्दशा होते त्याचे ज्वलंत उदाहरण द्यायचे झाल्यास जय आणि विजय यांची सुंदर कथा श्रीमद् भागवतात वाचावयास सापडते. एकदा सनतकुमार ब्रह्मदेवाच्या दर्शनासाठी आले. त्यांनी ब्रह्मदेवाला नमस्कार केला आणि संसार दुःखाची कर्मकहाणी सांगितली. ब्रह्मदेव त्यांना म्हणाले, 'तुम्ही आदिनारायणाच्या दर्शनासाठी वैकुंठात जा.' ब्रह्मदेवांच्या सांगण्यावरून ते वैकुंठात आले पण वैकुंठवासी भगवान विष्णुच्या द्वारात दोन पहारेकरी उभे होते. त्यांचे नाव जय आणि विजय. सनत कुमार वैकुंठात आल्यावर जय आणि विजय यांनी त्यांना विचारले,'आत कुठे चाललात?' सनतकुमार म्हणाले, 'आमचा पिता भगवान विष्णू आहे. माता पित्यांना भेटण्यासाठी आम्ही जात आहोत. आम्हाला का आडवता ?' त्यावर जय-विजय म्हणाले,''भगवान विष्णुंची आज्ञा झाल्याशिवाय आपणांस

आत जाता येणार नाही.' त्याचे ते भाषण ऐकून सनतकुमार क्रोधाने लाल झाले. त्यांनी क्रोधाच्या भरात जय-विजय यांना शाप दिला. आम्ही भगवंताच्या दर्शनासाठी जात असताना आपण आम्हाला अडवले..! तुमच्यात विषम भाव आहे. आपणास तीन वेळा दैत्य कुळात जन्म घ्यावा लागेल. क्रोधामुळे सारासार विचार शिल्लक राहात नाही.वास्तविक वैकुंठ हे असे ठिकाण आहे की जिथे गेल्यावर परत यावे लागत नाही. अशा दुर्लभ ठिकाणापासून सनतकुमारांना पदच्युत व्हावे लागले. तसेच जय-विजय यांनाही सनतकुमारांच्या शापामुळे पहिल्या जन्मात जय-विजय हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू झाले. दुसऱ्या जन्मात शिशुपाल व दंतवक्त्र झाले आणि नंतर रावण आणि कुंभकर्ण असा तीन वेळा जय-विजयांना राक्षस योनीत जन्म घ्यावा लागला. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपु लोभाचे अवतार, रावण आणि कुंभकर्ण कामाचे अवतार तर शिशुपाल व दंतवक्त्र हे लोभाचे अवतार आहेत. म्हणून काम, क्रोध, आणि लोभ हे माणसाच्या अंतरंगातील तीन शत्रू असून नरकाची द्वारेच आहेत. बाहेरील शत्रु मारणे सोपे पण आपल्यामधील शत्रुविकार मारणे महाकठीण काम आहे. भगवद् दर्शनाची तीव्र अभिलाषा असणाऱ्या साधकाला सर्वप्रथम विकारांवर विजय मिळवता आला पाहिजे. प्रवृत्तीरूपी सासर सोडून निवृत्तीरूपी माहेराला जाण्यासाठी विकाररूपी नातेवाईकांचा त्याग करायला हवा. मुक्ताबाई एका पदामध्ये सुंदर विवेचन करतात...

**उबगल्या सासरा मज माहेरासी न्याहो।**
**तोडा एवढा जाच पडते तुमच्या पाया हो।**
**प्रपंच हा सासरा मज प्रभु उगाज गांजितो।**
**भेद भयंकर भावा हा तर उभेचि जाळितो।।**
**क्रोध माझा दीर मजला भलतेची बोलतो।**
**काम माझा दादला सखे ग भलतीकडे नेतो।।**

ज्ञानमार्गात क्रोध विघ्न आणतो. कर्ममार्गात काम विघ्न आणतो. यःकश्चित मेनकेला भुलून विश्वामित्रांची तप, साधना धुळीला मिळाली. कर्म मार्ग आणि ज्ञान मार्गाने ईश्वरप्राप्ती करताना अनेक धोके आहेत. भक्ती मार्ग हा सुलभ व सुखकर आहे.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

---

**पान १३ वरून...**

**स्वर्गांगनेसी जरी साम्य आली।**
**परंतु तेथे दृष्टी न घाली।**
**निजात्मबोधे निःसंग दासी।**
**परंतु आरण्य मिरास त्यासी।।**


स्वर्गातील अप्सरेसारखी एखादी सुंदर स्त्री समोर आली तरी मी तिच्या सौंदर्याकडे लक्ष देणार नाही या उत्तराने श्रेष्ठांचे समाधान झाले.

थोरल्या भावासह अनेकांचा विरोध असतानाही समर्थांनी स्त्रियांना भक्तिमार्गाचे दरवाजे उघडे करून दिले, ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. जेव्हा माणसाचा हेतू शुद्ध असतो त्यावेळी त्याला समाजाच्या टीकेची, विरोधाची पर्वा करण्याची गरज नसते. समर्थांचा हेतू शुद्ध असल्याने त्यांना समाजाच्या विरोधाची पर्वा करण्याची गरज नव्हती.

आज भारतीय स्त्रियांची स्थिती खूप सुधारली आहे. त्याचे श्रेय अनेक महापुरुषांच्या मालिकेला दिले जाते. त्या मालिकेत समर्थ रामदासांना स्थान दिले जाणे आवश्यक आहे. आज तसे ते दिले जात नाही. निदान यापुढे तरी दिले जावे, अशी इच्छा व्यक्त करून हा लेख संपवतो.

।।जय जय रघुवीर समर्थ।।

**सुजन वाक्य**



**जो गुरू असेल, तो शिष्य असेलच.**
**जो शिष्य नसेल, तो गुरू नसेल.**

# अभंग योगवासिष्ठ (लेखांक २ रा)

**श्री. वामन वा.कोल्हटकर** , फोन (०२०) २५४३८६६३, email - wavako@gamil.com
(विज्ञान मंदिर या फिजिक्स प्रयोगशाळेचे जनक) गणितमंदिर, कीर्तनशाळा, पुणे

**अहंकार निंदा**

**अज्ञानोद्भव हा दुष्ट अहंकार। वैरी महाक्रूर भयप्रद ।।**
**विषयलंपट करुनि नरासी। मृत्युप्रति अर्पी करूनी दीन ।।**
**आधिव्याधिसम करी अहंकार। प्रबल विकार महावैरी ।।**
**चिरवैरे त्याच्या अन्नही न रुचे। मग विषयांचे स्मरण केवी ।।**
**संसाररजनीमाजि हा नरास। फसवी किरात मायाजाळीं ।।**
**वासुदेव म्हणे सद्गुणकल्हारा। नाशी अहंकार हिमराशी ।।**

अहंकाराबाबत राम काय म्हणतो हे सांगणारे चार अभंग या ग्रंथात आहेत. राम म्हणतो की अहंकार हा एक पारधी आहे. त्याने जीवाला अगदी जन्मापासूनच आपल्या जाळ्यात जखडून टाकलेले असते. समजा एखादा माणूस सिगरेट, दारू वगैरे व्यसनात अडकला असला आणि त्याच्या कोणी मित्राने, नातेवाईकाने त्याला जागे करायचा प्रयत्न केला तर तो मोठ्या ताठ्यात म्हणतो की,''मी माझ्या पैशाने काय ते करतो आहे. तुझे काय बिघडते?'' वगैरे वगैरे. पण मग जेव्हा मोठमोठ्या आजारांना तोंड द्यावे लागते तेव्हा तरी त्याला केलेल्या कर्माचा पश्चाताप व्हावा की नाही? तसे झाले तर तो अहंकार कच्चाच म्हणायचा! हे महाशय इतक्या कच्च्या अहंकाराचे सहसा नसतात. आपल्या दुर्वर्तनाचे खापर ते दुसऱ्याच कुठल्यातरी कारणावर फोडून आपला अहंकार जपत असतात. बहिणीच्या लग्नासाठी फार मनस्ताप सहन करावा लागला. माझ्या जॉबचे स्वरूपच या आजाराला कारणीभूत होते पण काय करणार. संसारासाठी हे सहन करणे प्राप्तच होते. अशी अनेक फसवी कारणे तो अहंकार पुढे करीत असतो.

अहंकाराचे दुसरे रूप राम उघडे करतो. अहंकारी माणसाची डूख धरून एखाद्याला त्रास देण्याची प्रवृत्ती. प्रसंगी स्वतःचे नाक कापूनही शत्रूला अपशकून करण्याचा महापुरुषार्थ हा अहंकारी माणूस मोठ्या तोऱ्यात करीत असतो.''माझे काय व्हायचे ते होवो पण मी तुला सुखाने जगू देणार नाही. असा विडा, एखाद्या राष्ट्रोद्धारक क्रांतिकारकाच्या ईर्षेने उचलून आपल्या क्षुद्र, निरर्थक, दुष्ट अहंकाराला खतपाणी घालीत असतो. साऱ्या मराठी, हिंदी टी. व्ही. मालिकांत हे तंत्र सारखे वापरतात कारण बहुसंख्य लोकांना हा अहंकारप्रकार आवडतो. राम म्हणतो स्वतःचेच मनःस्वास्थ्य हे लोक, ढगांना वाऱ्याने उडवावे तसे अहमहमिकेने उडवीत असतात. त्यांना मनःस्वास्थ्याशी आपण होऊन वावडे असते. मग निष्कलंक, निर्लेप, निरंजन असे स्वस्वरूपदर्शन होण्याच्या इच्छेपासून असे लोक किती दूर असतील बरे ?

**चित्तनिंदा**

आपल्या चित्ताच्या चंचलपणाचे वर्णन करताना राम म्हणतोः

**तीरस्थ मी वृक्ष झंझावाती तृण।**
**स्थैर्य अर्धक्षण मज न तेवी ।।**
**रहाटा बांधिल्या घागरीसमान।**
**ऊर्ध्वाधोगमन नित्य चित्ता ।।**
**प्रगतीत माझ्या आड येई चित्त।**
**आडवी जलास बांध जेवी ।।**
**चित्तपिशाचासी आंवरू मी केवी।**
**बागुल मिथ्याचि भिववी बाला ।।**
**अग्नि पर्वत की श्रेष्ठ वज्राहूनि।**
**उष्ण दुर्लंघ्य तैं कठिण चित्त ।।**
**विषयांच्या अंकी लोळतसे चित्त।**
**पक्षिप्रियाअंकी पक्षी जसा ।।**
**वासुदेव म्हणे चंचल बालक।**
**क्रीडे बहुविध तैसे चित्त ।।**

चित्तनिंदेसाठीही इथे असे पाच अभंग आहेत. राम वसिष्ठांना म्हणतो की मी काही ठोस पाऊल उचलू लागलो की माझेच चित्त माझ्या सत्प्रयत्नांच्या आड येते. विचार केल्यावर कळून येते की खरे तर हे चित्त म्हणजे लहान मुलांच्या बागुलबुवासारखे अवास्तव आहे. पण त्या विचाराला हेच चित्त हसत हसत क्षणार्धात वज्रमुष्टीने चीतपट करते. चित्ताच्या माजोरेपणाला उल्लंघिणे फार कठीण जाते. विकारांनी विचारावर मात केव्हा केली हे कळतच नाही.

एखादी गोष्ट करायचे ठरविले आणि ती गोष्ट समजा बाह्येन्द्रियांचे चोचले पुरविणारी नसली.. समजा जपाला बसू, ध्यानाला बसू किंवा गीता उपनिषद् यांसारखे विचारप्रवर्तक काही वाचू असे ठरवून तसे करायला बसलो तर ५-१० मिनिटातच चित्त म्हणते की पुरे आता ! मग कोणाला तरी फोन करण्याच्या निमित्ते किंवा काहीतरी दुसरे महत्त्वाचे काम निघाल्याचा बहाणा करून आपण ते मनाचे चोचले न पुरविणारे उद्योग थांबवून दुसरे, खरेतर फडतूस पण चित्ताला रिझवणारे... टाईमपास काम हाती घेतो, ज्याने काही मनाला कल्याणकारक शिकायला मिळेल असे काही न साधता कुठल्यातरी सांसारिक कुटाळक्यांचाच संदर्भ असतो. मग तो साहित्य-संगीत-कला यांपैकी काही विषय असो की खेळ असो की नीरस-नाकर्त्या राजकारणासारखा असो किंवा अगदी संगीतप्रधान विनोदप्रचूर अशा भजनाचा, कीर्तनाचा असो !

हे जग हा काय प्रकार आहे ? जीव म्हणजे काय? त्याचा जगाशी काय संबंध ? हे जग आणि जीव यांची उत्पत्ती कशापासून झाली ? ते परमतत्त्व कोणते ? असे प्रश्न पडावेत का ? मी एक जीव आहे, मला सुख-दुःखादिक भावना आहेत त्या माझ्या जीवनाला चेतविणाऱ्या अंतःप्रेरणा आहेत. त्यांना काही शास्त्रीय बैठक असणे हे आवश्यक आहे की त्या त्या वेळी जे भावते त्यानुसार वागत गेले की झाले असे करावे ? असे अनेक प्रश्न चित्तांत पेटून उठतात पण त्यांची उत्तरे शोधायला चित्ताचे जे एकाग्र लागते ते मात्र चित्ताचांचल्यामुळेच जमत नाही अशी रामाची स्वतःबाबतची तक्रार आहे.

**तृष्णा निंदा**

तृष्णेचे वर्णन राम विविध परींनी करतो. त्यासाठी इथे १० अभंग खर्चीले आहेत. तृष्णा म्हणजे विषयोपभोगांची तहान. ती तर कधी ''पुरे आता'' असे मानण्यासाठी लागणारे सिंहावलोकन करण्यासही फुरसत काढीत नाही. राम म्हणतो :

**संसार नाटकी प्रमुख ही नटी।**
**शृंखला हातीची चांडाळाच्या ।।**
**प्रवृत्तिघरट्या माजी ही पक्षिणी।**
**मनोरथारण्यी हरिणीची ती ।।**

संसाराच्या नाटकातली हिरॉइन म्हणजे तृष्णा. हे करू, ते करू अशा मोहरूपी पिलांना चारापाणी करून पोसणारी पक्षिणी ती ही तृष्णा. किंवा मनोरथांच्या अरण्याला शोभा आणि गती देणारी हरिणी म्हणजे ही तृष्णा. असे राम तृष्णेचे यथार्थ वर्णन करतो, तेही वयाच्या १५ व्या वर्षी हे लक्षात घेण्याजोगे आहे. तो म्हणतो की तृष्णा म्हणजे वखवख. तिला जे तिजजवळ आहे त्याची जाण किंवा पर्वा नसते तर :

**अप्राप्तासी इच्छी प्राप्तेही न तृप्त।**
**वानरी चपल तेवी तृष्णा ।।**

या विषयलालसारूप हावरट तृष्णेपायी राम म्हणतो,''अखंड एकरस सच्चिदानंदरूप'' आत्म्याला सुद्धा, ढगांनी सूर्याला झांकळून टाकायला जीव मागेपुढे पहात नाही.

**मेघमाला जशी लपवी सूर्यासी।**
**तृष्णा तैं आत्म्यासी आच्छादिते ।।**

पण ज्या या देहाचे चोचले पुरविण्याच्या मिषाने हा जीव या तृष्णेला कवटाळत असतो तो देहच मुळात कसा अभद्र, कोणत्याही क्षणी मृत्यूची धाड टाळता येत नसल्याने सतत पराधीन आहे इ. विवरण करताना राम मुळापासूनच देहविचार विदारकपणे आपल्यापुढे उभा करतो.

**देह निंदा**

**मुनिश्रेष्ठा देह मांसमज्जायुक्त।**
**मृत्यु पाठलाग करी त्याचा॥**
**असूनिया जड आत्माचि तो भासे।**
**कारण दुःखाते होई सदा॥**
**जड चैतन्याचे तादात्म्य त्या ठाई।**
**चमत्कार होई देही ऐसा॥**

अस्थि, मांस, मज्जा या जणू लोखंड, त्याला जखडून धरणाऱ्या तारा आणि सिमेंट, रक्तवाहिन्या या जणू विविध तऱ्हेची रसद पुरविणाऱ्या यंत्रणा, कान, नाक, डोळे, हात, पाय, त्वचा इ.ही शब्द, रूप इ. ज्ञान देणारी व विविध हालचाली करणारी यंत्रे.. असे ज्याचे यथार्थ वर्णन करता येईल असा एक यंत्रबंध म्हणजे देह. मात्र त्याची सर्व यंत्रे अगदी जिथल्या तिथे ठाकठीक असली तरी आपण होऊन स्वतः थोडीही हालचाल करण्याचे सामर्थ्य त्याकडे नसते. त्या देहात मन, बुद्धी नावाची आणखी दोन, न दिसणारी, यंत्रे म्हणजे इंद्रिये असतात. त्यांनाही स्वतंत्रपणाने काही करण्याचे बळ नसते. या सर्वांना प्रेरणा देणारा आणि त्यांच्याकडून कामे करून घेणारा जो कोणी असतो त्याला आत्मा असे नांव आहे. हा आत्मा नक्कीच देहाहून भिन्न आहे. पण विषयपिपासू जीव मात्र बेगुमानपणे देह आणि आत्मा यांना वेगळे मानीत नाही का ? कारण उघड आहे. जीवाला देहाकडून मिळणारे सुख हवे असते. भले त्यासाठी दुःखाची किंमत मोजावी लागली तरी सुखाचा घास पकडताना तो दुःखाचा हिशेब मनी आणायला दक्ष तर नसतोच पण राजीही नसतो. विषयसुखाची जीभ घेऊन जन्मलेला आत्मा म्हणजेच जीव. पण जसे धनाबरोबर ऋणही येतेच, इलेक्ट्रॉन बरोबर पॉझिट्रॉन येतोच. तद्वत सुखाबरोबर दुःखही येतेच ! आत्मस्थिती ही सुखदुःखातीत आहे. ती आवडेल तो जीव कसला ?

पण जीवदशेतून मूळ स्थितीकडे झेप घ्यायची तर जीवाला देहाचा आसरा घेऊन शास्त्रीय प्रयत्न करावे लागतात. यासाठी हे लक्षात आणणे आवश्यक आहे की जीव हा देहाहून वेगळा आहे आणि त्या दोघांहून चैतन्यरूप आत्मा हा व्यापक आहे. ते तर विश्वाला व्यापून उरणारे असे सच्चितत्त्व आहे. हे सारे पाण्डित्य जरी खरे असले तरी देहालाच 'मी' असे मानण्याची खोड सुटत नाही आणि चिखलांत अडकलेल्या हत्तीसारखी माझी अवस्था आहे. ''परी उद्धारासी असमर्थ मी ''।

**बाल्य-यौवन-स्त्री-वार्धक्य या अवस्थांची निंदा**

**इथे वाचकांनी हे ध्यानी घ्यावे की निंदा हा शब्द 'दोषदर्शन' इतपत अर्थाने घ्यावा. मराठीत निंदा हा शब्द अगदी कडक अर्थाने घेतला जातो. तसा कडक अर्थ घेऊ नये, पण दोषांकडे लक्ष न दिल्यास फार महागात पडायची शक्यता हे ओळखून या साऱ्यांचे स्वागत करावे असा वर सारीकडे 'निंदा' या शब्दाचा अर्थ घ्यावा.**

बालपणाची मुख्य गोची, राम म्हणतो, कायिक-वाचिक दुर्बलतेत आहे. जे हवे-नको ते स्वतःला तर घेता किंवा टाकता तर येत नाहीच पण त्याबद्दल बोलताही येत नाही. पुढे बोलता यायला लागले तरी ''बेटा तू अजून लहान आहेस'' अशा प्रकारची त्याची बोळवण केली जाते. त्याने काय खायचे-प्यायचे, कुठे किती केव्हा झोपायचे, उठायचे हेही दुसऱ्याने ठरवायचे. त्याचा कपडालत्ता, त्याचे खेळ सारे मोठ्यांनी ठरवायचे. अशा पराधीन... सर्वस्वी पराधीनपणांत, असून ... आनंद तो काय असणार !

तारुण्यातही राम दोष दाखवितो ते स्त्री-लालसा, व्यसने आणि गद्धेपंचविशीतील बुध्दिभ्रष्टतेबाबतचे. राम म्हणतो,''वर्षाकालीं जळ होई जै गढुळ। तैसा युवाकाळ बुद्धि नाशी।'' तारुण्य हाच जीवनोद्दिष्ट साध्य करण्याचा काळ हे खरे. पण एकतर विषयलंपट तारुण्य हे कुसंगती असेल तर बरबाद होते. स्त्रीमद किंवा इतर भयानक व्यसनांच्या आहारी जाते की ज्यांचे दुष्फळ जन्मभर भोगावे लागते. दुसरे म्हणजे संसार, धनसंपत्ती, मोठेपणाची अतिरिक्त हाव, बडेजावाची मिजास करण्याची प्रवृत्ति दुणावते. अशी सांसारिक आनंदातच कृतार्थता मानण्याची प्रवृत्ती रंकापासून रावापर्यंत साऱ्यांत दिसून येते. संसाराचे मूळ शोधायचा प्रयत्न हा तर तारुण्याच्या सरुवातीपासूनच

करायला हवा, पण तारुण्यमद तसे करू देत नाही. राम संसाराबाबत म्हणतो-

**विकारमगरीयुक्त ह्या सागर। तरे तोचि थोर भाग्यवंत।।**
**अविवेके ऐसे तारुण्य हे निंद्य। विवेके ते वंद्य लाभप्रद।।**
**विनयभूषित दयार्द्र शान्त्यादि। गुणवंताप्रति सौख्यदायी।।**
**वासुदेव म्हणे मंगलकारक। तारुण्य दुर्लभ नंदनवन।।**

स्त्री शरीराची ओढ पुरुषाला असते हे खरे. पण तिचेही शरीर हे हाडामांसाचेच आहे इकडे त्यावेळी त्याचे लक्ष नसते. त्याची मजा लुटायची एवढेच त्यावेळी त्याचे एकमेव इप्सित असते. या शरिरालाही रोगराई आहे, या शरीरात राहणाऱ्या जीवालाही मन आहे, तेही काम-क्रोध-लोभ-मत्सर-मद अशा भावनांना सांभाळून असते. त्याचा उपभोग घेऊ गेलास तर त्याची जबरदस्त किंमतही मोजावी लागेल. स्त्रीमोहाबाबत राम म्हणतो, कामकिराताचे जाल हे युवका। अविवेकी मूढा बद्ध करी।।

तो म्हणतो की यौवनाच्या डबक्यात कामुकाचे चित्त हा चिखल आहे आणि तो स्वतः त्यात लुडबुडणारा मासा आहे. त्याच्याच वासनांच्या रज्जूचा कौशल्याने उपयोग करून चाणाक्ष स्त्रिया त्याला गळांत पकडतात आणि त्याची किती ससेहोलपट होते त्याला पारावार नाही. म्हणून स्वस्त्रीसंगाखेरीज इतर ठिकाणी वक्रनजर करू नये.

वार्धक्याबाबत बोलताना राम त्या काळातील शरीराच्या नाजुकपणामुळे आलेल्या पराधीनतेचे वर्णन करतो. त्या वयांत त्याला आलेली पराधीनता, शरीराची गलितगात्र झालेली अवस्था, लाळ गळतेय, दातांचा पत्ता नाही, उच्चार नीट करता येत नाहीत या अवस्थेमुळे लहानांकडून, तरुणांकडून, स्त्रियांकडून होणारी थट्टा, कुचेष्टा याचे वर्णन करताना राम म्हणतो

**कृशता शैथिल्य येई उंटासम। सापत्नभावाने बुद्धि चळे।।**
**कांपता शरीर हांसताती सर्व। 'लोभ' जिवलग मित्र होई।।**
**स्वादु भोजनाची इच्छा बहु होई। पचेही न काही भक्षिता ते।।**

शेवटी व्हायचे तेच होते हे सांगताना राम म्हणतो

**पिकल्या कोहळ्या खुडे शेतकारी।**
**तवी 'काळ' खुडी वृद्धशिरे।।**

**कालवर्णन**

अशा या कालाचे वर्णन राम असे विदारक करतो की ते खरे म्हणजे मुळातच वाचायला हवे. त्यात कालपुरुषाचे अफाट बल, त्याची अनादि-अनंतता, त्याची अखिल विश्वाशी चाललेली एकहाती नाट्यमय क्रीडा, तो क्षणाक्षणाला घडवीत असलेले अतर्क्य चमत्कार व त्यांची वैश्विक महाभव्यता रामाने अतिशय प्रभावीपणे आणि मोठ्या साहित्यप्रचुर भाषेत मांडली आहे. राम म्हणतो,

**कालाचे न भय वस्तु नसे ऐसी।**
**सिंधूसीही भक्षी वडवानल।।**
**अनंत विश्वांसी भक्षितो विश्वात्मा।**
**दिन वर्ष युग ऐशा मापे।।**
**गरूडसी सर्प तसे काला विश्व।**
**शुभाशुभ त्यास नसे काही।।**

कालाची भव्यता सांगताना राम म्हणतो :

**कालसागरी ही ब्रह्मांडे तरंग।**
**औदुंबर जीवकीट घुंघु।।**
**अनंत अखंड परब्रह्मी काल।**
**राहिला अचल अचलस्थानी।।**
**काल,रात्रिरूपी झाडणी घेवोनी।**
**जीवशिरस्वर्णकणां झाडी।।**
**सूर्यपणतीने उरलेले शोधून।**
**नियतितंतूंत ओंवी काळ।।**
**वासुदेव म्हणे कालनेत्र सूर्य।**
**जगद्वनी पक्व फळे भक्षी।।**
**जगज्जीर्ण कुटीमाजी बैसोनी।**
**बोरे ती समजूनी भक्षी काळ।।**
**कर्मासम बुद्धि देवोनी जीवांसी।**
**क्रिया सकलही घडवी काळ।।**
**नियति आंखिते नियम सृष्टीचे।**
**कृतकर्मसाठा तेंचि दैव।।**
**कृतान्त तो कर्मफळासी देतसे।**
**काल घेत असे ऐसी रूपे।।**

राम पुढे म्हणतो-नियति नोवरी कृतांताची।।

काळावर रामाने पुष्कळच विवेचन केले आहे. नियती, दैव, कृतान्त, काल हे सारे एकाच शक्तीचे विविध पैलू आहेत. या कालाच्या ओघात आपण जन्मामागून जन्म घेत असतो. पहिले पाप-पुण्य भोगण्यासाठी झालेली तरतूद म्हणजे जन्म-मृत्यू. एका प्रकारचे भोग भोगून आता दुसऱ्या प्रकारचे भोग असे आहेत की जे या देहात भोगता येणार नाहीत. मग दुसरा देह घ्यावा लागतो की ज्यामुळे त्या निराळ्या प्रकारचे भोग भोगणे शक्य होईल. आपण जसे निजण्यासाठी ज्या खोलीत असतो ती खोली तो निजण्याचा भोग संपल्यावर सोडतो आणि चहा प्यायला दुसऱ्या खोलीत जातो. तसेच वेगवेगळे भोग भोगण्यास वेगवेगळे जन्म बदलावे लागतात. त्यामुळे मधे मृत्यू घडणे अपरिहार्य आहे. गप्पा रंगात आल्या असता बाथरूमला लागली तरी उठू नयेसे वाटते तसेच मरू नयेसे वाटते. तरी केव्हातरी बाथरूमला जावेच लागते तसे मरून पुढच्या जन्मात जावेच लागते. मरण हा एक, दोन भोगयोनींमधील आवश्यक ''पॉझ'' आहे इतकेच. पण आपण पहिल्या विश्वात इतके रंगलेले असतो की त्यात खाडा पडावा अशी इच्छाच नसते. असो.

प्रत्येक गोष्टीतले तात्पुरतेपण रामाला नीरस करते.

**तो म्हणतो की दरी आज तेथे गिरी उद्या।।**
**ओसाडवनाच्या उखरप्रदेशी।**
**दिसे भाग्यवती नगरी रम्य।।**
**वैभव क्षणांत धुळीस मिसळे।**
**धूळही क्षणांत श्रीमंतिणी।।**
**संपत्ती विपत्ती काहीं स्थिर नसे।**
**मुने अस्थिराचे काय सौख्य।।**

राम अशा अनिश्चित, अमंगल, बेभरवंशाच्या या जगात रहायला अगदीच कंटाळलेला आहे. सगळे लोक समूळ अनर्थालाच महाअर्थमय मानीत आहेत. त्यातच मी एक असे मानून तो फार निराश आहे. भयाण रानात एखादी अबला स्त्री एकटी पडली तर ती जशी घाबरून थरकांपावी तशी, राम म्हणतो माझी अवस्था झाली आहे. रानात वाघाची डरकाळी ऐकून हरिणाची जशी दशा होते तसे त्याचे, या बिनबुडाच्या जगद्व्यवहारांचा विचार करून झाले आहे. गंमत म्हणजे, कोणतीच अशी घटना घडली नव्हती की तिच्या त्रासात तो अडकला गेला आणि त्यामुळे त्याला असे संसाराबद्दल वैराग्य आले ! उलट सर्व लौकिक सुखाची आगरे त्याचे पुढ्यात हात जोडून उभी होती. त्याने या निर्निमित्त वैराग्यातून बाहेर पडावे म्हणून दशरथाने राजवैभवाला साजेसे सारे उपाय करून पाहिले होते. पण रामास हे निर्निमित्त वैराग्य केवळ विचाराने आले होते. त्याला जग हा भ्रम आहे हे तीक्ष्ण विचाराने कळाले होते. पण ज्यावर हे जग भासते असे काहीतरी जे आहे त्याची उकल झाली नव्हती. ओंवळे तर सुटले होते पण सोंवळे कुठे ते सांपडत नव्हते. तो जगाच्या अनिश्चित रहाटीला घाबरला होता. त्याच्या डोक्यात जगाच्या अनेक असंबद्ध हालचालींच्या गुंत्याचा अर्थ लागत नाही यामुळे मोठे काहूर माजले होते.

तो हतबल होऊन वसिष्ठ-विश्वामित्रांना विचारतो की, या माझ्या मनःस्थितीतून माझी सुटका होईल असे आपणांपैकी कोणी काही करू शकेल का ? या माझ्या मनःस्थितीतून मला बाहेर काढणारा कोणताच मार्ग उपलब्ध नसला तर, हे मुनिवर्य मी खाणे,पिणे वर्ज्य करेन. माझे सर्वच जगद्व्यापार बंद होतील. या जगाबाबतची माझी वांछा इतकी संपली आहे की मृत्यूलाही मी आनंदाने कवटाळीन ! असे मोकळ्या मनाने, पंधरा वर्षांचा राम निर्वाणीने, पण कोणावर वा परिस्थितीवरही न डाफरता बोलला आणि वाल्मिकी म्हणतात, सजल मेघांपुढे पुष्कळ टाहो फोडून श्रांत झालेला मोर जसा एकदम शांत उभा राहतो तसा राम त्या विद्वत्सभेपुढे शांत उभा राहिला.

रामाच्या या अत्यंत विचारपूर्वक झालेल्या भारदस्त पण अंतर्मुख करायला लावणाऱ्या ठाशीव भाषणाने सारी सभा चकीत पण तटस्थ झाली. ज्ञानसंपन्न ऋषिमंडळातून ''साधु साधु'' म्हणजे ''वाहवा रे वाहवा'' असे ध्वनी आले. आकाशातून पुष्कळ वेळ पुष्पवृष्टी झाली. पण सामान्य जनांना वाटत असणार की,आम्ही या जगातच

**पान २९ वर...**

# यज्ञसंकल्पना-२

स. भ. शरयु दाते, रामदासी, मिरज, जि. सांगली

यज्ञ संकल्पनेचा थोडा विचार आपण मागील लेखात केला. तसेच यज्ञाचे विविध प्रकारच्या स्वरूपाचाही थोडा विचार झाला. त्यात १) शरीरयज्ञ आणि २) राष्ट्रयज्ञ यांचे चिंतन झाले. राष्ट्रात यज्ञबुद्धी असली पाहिजे. राष्ट्र सुस्थितीत राहण्यासाठी लोकांची प्रवृत्ती यज्ञाकडे असली पाहिजे.यातच राष्ट्राची उन्नती आहे. गीतेने म्हटले आहे.

**नायं लोकोऽस्त्य यज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ।।** (अ.४-३१)

अयज्ञस्य = यज्ञ न करणाऱ्याला हा मनुष्यलोकसुद्धा (अयं लोकः) सुखदायक होत नाही; तर परलोक कसा सुखदायक होईल ? अर्थातच यज्ञ न करणारे निःसंशय दुर्गतीला जातील.

**अयज्वानः सनका प्रेतिमीयुः ।** (ऋग्वेद १-३३-४)

म्हणजे यज्ञ न करणारे नाश पावतात. उत्तम आचरण करून यज्ञ करणारा घातक शत्रूंचा नाश करू शकतो. यज्ञ न करणाऱ्यांची एका अर्थाने ऋग्वेदात निंदाच केली आहे. किंवा अथर्ववेदातही अयारीयो हतवर्चा भवत। (अ.१२-२-३७) जो यज्ञ करीत नाही त्याचे तेज नष्ट होते, तो निस्तेज होतो असे म्हटले आहे. किंवा यज्ञ न करणाऱ्याला शुभगती मिळत नाही. (४.३१) गीतेतही म्हटले आहे.

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।

**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ।।**

(गीता अ.१६-२३)

**यज्ञाचा तिसरा प्रकार**

३) मनुष्याचे जीवन हाच एक महायज्ञ आहे.(छां.उप.)

पुरुषो वाव यज्ञस्तस्य यानि चतुर्विंशति वर्षाणि तत्प्रातः सवनम् ।

चतुर्विंशति= २४ वर्षे. सवन=यज्ञ

अथयनि चतुश्चत्वारि वर्षाणि (४४ वर्षे) तत् माध्यंदिनसवनम् ।

अथयानि अष्टचत्वारिशद् वर्षाणि (४८ वर्षे) तत् तृतीय सवनम् । - सायं स्तवन् प्र हं षोडश वर्ष शतं जीवति स एव वेद। (११६ साधारणपणे) तोच जगतो. परंतु यात १६ वर्षे कुमारपणाची जातात. म्हणून बाकीच्या शंभर वर्षांच्या आयुष्यात त्याने यज्ञ केले पाहिजेत. तेही मिताहार। यम्नियम इ. पाळून.

ईश उपनिषदात- 'कुवन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतः समाः ।

कर्मे करीत करीत शंभर वर्षे जगावे. (अर्थात सत्कर्मे) सात्त्विक कर्मे करीत.

**४) चौथा यज्ञाचा प्रकार म्हणजे गृहयज्ञ**

आतापर्यंत शरीर, राष्ट्र, जीवन यात स्वभावतःच चालत असलेला यज्ञ पाहिला. असाच यज्ञ घरोघरी होत असतो. कसा ?

आई - मुलासाठी स्वार्थत्याग करते. कुटुंबातील इतर मंडळी एकमेकांसाठी त्याग, समर्पण करतात. यालाच 'गृहयज्ञ' म्हणता येईल. कारण समर्पणात सुख असते. 'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः ।' हे गृह व राष्ट्र दोघांनाही लागू आहे. संयमाचे धडे घरातच मिळतात. केवळ स्वतःपुरतेच पहायचे असा संकुचितपणा टाकून, अनेकांना आपल्या सुखात सहभागी करावे. या योगे भोगतृष्णा जिंकता येते. मुलांना शिकवले पाहिजे. 'तुझ्यातलं थोडं त्याला दे. 'मा गृधः कस्यसित् धनम् ।। (ईश.उप.)

कुणाचेही धन विना मोबदला घेऊ नये, कुणाचेही धन लुबाडू नये. अथर्व वेदातील

**सहृदयं सांमनस्यं अविद्वेषां कृणोति वः ।**
**अन्यो अन्याभि हर्यत वत्सं जातमि वाघ्न्या ।।२ ।।**

हा मंत्र पाहू. किती सुंदर विचार पहा- प्रेमपूर्ण हृदयं, शुभ विचारांनी संपन्न असे मन व परस्पर निर्वैरता तुमच्या

ठिकाणी असो. गाय जशी नुकत्याच जन्मलेल्या वासरावर प्रेम करते, वात्सल्य प्रकट करते, तसेच तुमचेही परस्परांवर प्रेम असू दे.

**जाया पत्ये मधुमतीं वाचं वदन्तु शन्ति वाम्।**
**अनुव्रतः पितुः पुत्रो मात्रा भवतु संमनाः।२॥**

पती पत्नीबरोबर शांतीपूर्ण व प्रिय वचन बोलो. पुत्र पित्याला अनुकूल असे कर्म करो. तो आईशी चांगल्या मनाने वागो.

**मा भ्राता भ्रातरं द्विक्षन्मा, स्वसारमुत स्वसा।**
**सम्यञ्चः सव्रता, भूत्वा, वाचं वदत भद्रय॥३॥**

भाऊ भावाचा द्वेष न करो, बहीण बहिणीचे वैर न करो. सर्वजण एकमताने एकाच कामात लक्ष घालून, परस्पर प्रेमपूर्वक संभाषण करोत.

**समानी आकूतिः, समाना हृदयानि वः।**
**समानमस्तु वो मनः। यथा वः सुसहासति।**

येथे तर राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला आहे. यासाठी सर्वांनी एका विचाराने एकमेकांसाठी समर्पण करून आत्मोन्नती करून घ्यायची आहे.

गृहयज्ञाचे स्वरूप इतके व्यापक आहे. परस्परांचा सन्मान ठेवून, आदर ठेवून, एकमेकांना साह्य करावे. ईश्वराचा आणि आपला संकल्प एक होतो तेव्हा हे सर्व साध्य होते. म्हणून शरीर, मन, अंतःकरण निर्मळ, निर्मम व शुद्ध ठेवून कार्यप्रारंभ करावा.

यज्ञ मानवी जीवनाशी संलग्न असल्यामुळे त्याचे महत्त्व गीता, उपनिषदादि ग्रंथामध्ये अनेक प्रकारे वारंवार सांगितले आहे.

१) त्रयो धर्मस्कंधा यज्ञोऽध्ययनं दानमिति। (छांदोग्य उप. २.३१.१)

१) यज्ञ २) अध्ययन ३) दान हे तीन स्कंध होत. या तिहींचा मानवी जीवनाशी अतूट संबंध आहे.

२) त्वं ब्रह्म, त्वं यज्ञ। (बृह. उप.१.५.१७)

३) अहं क्रतुरहं यज्ञ- स्वधाहमहमौषधम्।
मंत्रोऽहममेवाज्य महमग्निरहं हुतम्॥ (भ.गीता ९-१६)

४) यज्ञो विष्णुः प्रजापतिः। (मैत्रायणी उप.) यज्ञ प्रजापालक आहे, तोच विष्णू आहे. म्हणून 'अनेन प्रसविष्वध्वं एष वो स्त्विष्टकामधुक्॥(भ.गीता)

या यज्ञानेच तुम्ही बुद्धी प्राप्त करा. हा यज्ञच तुमच्या इच्छित कामना पूर्ण करील.

**५) ज्ञानयज्ञ**

ज्ञानयज्ञ हा गुरुशिष्यांशी संबंधित आहे. शिष्यानी गुरूंचा सन्मान, सत्कार करावा. गुरूंनी शिष्याला प्रेमाने शिकवावे आणि त्याची योग्यता सिद्ध करावी, वाढवावी.

अशाप्रकारे गुरुशिष्य एकमेकांना मदत करीत एकमेकांची उन्नती करू शकतात. ''सहनाववतु। सह नौ भुनक्तु। सह वीर्यं करवावहै। तेजस्विना वधीतमस्तु। मा विद्विषावहै॥'' या प्रसिद्ध मंत्रातीलच वरील श्रेष्ठ विचार आहे.

कुणी कुणाचा द्वेष न करता उत्कर्ष साधायचा आहे. किती सुंदर शिकवण, केवढा सुंदर उपदेश केला आहे! पुढे

'मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। स्वाध्याय प्रवचनात् न प्रमदितव्यम् अशी शिकवण तैत्तिरीय उपनिषदांनी आमच्यासमोर ठेवली.

**६) देवयज्ञ**

ज्या पंचमहाभूतांपासून हा देह निर्माण झाला ती भूते तसेच सूर्य, नक्षत्रे, वनस्पती इ.सर्वांना देवता मानले आहे. कारण या सर्वांवरच मनुष्याचे सुख सर्वतोपरी अवलंबून आहे. म्हणून त्यांना प्रसन्न ठेवणे आवश्यक आहे.

मातृभूमीची सेवा- तिच्यासाठी आत्मसमर्पण हीच उपासना

जल- निर्मळ ठेवणे- तरच ते आरोग्याला हितकारक. श्रीसूक्तामध्ये या जलदेवतांना प्रार्थना आहे. त्या त्या देवतांना प्रसन्न करण्याचे निरनिराळे मार्ग आहेत. त्यांचा योग्य तो आदर-पूजा वगैरे करून, मनुष्याने आपली उन्नती करून घेतली पाहिजे.

भागवतात 'माझी ११ पूजास्थाने महत्त्वाची' असे भगवंत सांगतात. ती अशी-

**सूर्योऽग्नि बाह्मणौ गावो वैष्णवः स्वः मरुत् जलम्।**
**भूरात्मा सर्वभूतानि भद्रपूजापदानि मे॥**

(भाग ११.११.४२)

नाथ म्हणतात– ही एकादश पूजास्थाने असली तरी ती सर्व एकरूपच आहेत. 'त्यांची पूजा केल्या। मज पावे।''

ही पूजा कशी करावी ?

**१) सूर्ये तु विद्यया त्रय्या, हविषाग्नौ यजेत माम्।**
**आतिथ्येन तु विप्राणे गोपवंग यवसादिना।।**

सूर्याची उपासना/पूजा, 'त्रयी'- तीन वेदांनी (वेदातील मंत्रांनी) करीत. यावरील नाथांचे भाष्य पहा-

ऋग्वेदादी वेद तीनही। सांग सौरमंत्र जाणोनी।
सूर्यसूक्ते संमुख पठणे। पूजा सज्ञांनी करावी।।

ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद (त्रयी) यांतील जे सूर्यपद मंत्र आहेत, जी सूर्यसूक्ते आहेत, त्यांचे सांगपठण जाणकारांनी करावे, म्हणजे ती सूर्याची पूजा होते. आपल्याकडे गायत्री मंत्र- त्याची पुरश्चरणे, सौरसूक्त इ. म्हणण्याची प्रथा आहेच. त्याचा हा आधार श्रीसमर्थांनीही गायत्री पुरश्चरणे केली हे सर्वज्ञातच आहे. त्यांच्या पूर्वीच्या २३ पिढ्यांत सूर्योपासना होती.

सर्व मंत्रांचा मुकुटमणी जो गायत्री मंत्र त्यांचे पठण प्राचीन काळापासून महत्त्वाचे मानले आहे.

आता अग्नीची पूजा कशी करावी ?

**२) सर्वांगा मुख प्रधान। ते माझे मुख अग्नि जाण।**
**ये अर्थी वेदशास्त्रपुराण। साक्षी संपूर्ण गर्जता।।**

(नाथ भाग.) किंवा 'अग्निर्वै देवानां मुखम्।' - अग्नी हे देवांचे मुख आहे. म्हणून यज्ञीय अग्नीत आहुती त्या देवांना उद्देशून दिल्या की ती ती देवता प्रसन्न होते.

(हविष्याग्नौ यजेत माम्)

**३) विप्र-(ब्राह्मण) आतिथ्येन तु विप्राग्रे.**

**पूजे माजी अतिश्रेष्ठ ब्राह्मण। शीघ्र मत्प्राप्ती कारण।**
**ब्राह्मण माझे पूजास्थान। अति गहन उद्धवा।।**

**(नाथ भाग.)** आवाहन, विसर्जन वगैरे करून देवांची पूजा केली जाते. शाळिग्रामात माझे अधिष्ठान आहे. तरी– ते केवळ अचेतन। ब्राह्मण सचेतन। ब्राह्मण सचेतन मद्रूपे।। (नाथ) मी अव्यक्त पण ब्राह्मण हे माझे व्यक्तरूप आहे. त्यांच्या द्वाराच वेदमंत्र म्हटले जातात व ते मला प्राप्त होतात.

**४) चौथे पूजास्थान गोशुश्रुषा।** (गोष्वंग यवसादिना) म्हणजे गाईला चारा घालावा. खरारा करावा. अंग धुवून तिला स्वच्छ करावे. चांगले अन्न द्यावे. तिच्याशी प्रेमाने वागावे. ही गाईच्या ठिकाणी केलेली माझी (भगवंताची) पूजा. गाई आणि ब्राह्मण माझा प्राण आहे. असे भागवतात म्हटले आहे.

**५) वैष्णवे बन्धु सत्कृत्य**

**त्या वैष्णवाचे पूजन। ब्राह्म उपचारे नव्हे जाण।**
**बंधुस्नेहे कळवळी मन। साचार पूजा त्या नाव।।**

(नाथ भागवत)

आपल्या सख्ख्या भावाविषयी जेवढा कळवळा, प्रेम वाटते त्या कळवळ्याने वैष्णवाचे पूजन करावे. केवळ ब्राह्योपचार नकोत. त्याच्या विषयी स्नेह पाहिजे. अशा प्रकारे त्या त्या स्थानाची योग्य तऱ्हेने पूजा केली की ते ते स्थान संतुष्ट होईल आणि तीच भगवंताची पूजा होय. ती ती पूजा मला (भगवंताला) पावते. असा स्पष्ट व सुंदर विचार भागवतात आला आहे. अशी पूजा करणे हा यज्ञच होय.

पुढे खं वायुमग्निं सलिलं महींश्च.... या श्लोकात ही सर्व ११ पूजास्थाने सांगितली आहेत. त्या सर्वांची यथोचित पूजा करावी. ती भगवंताला पावते व भगवंत संतुष्ट होतो. ज्याची जशी पूजा केली असता संतुष्टी होते; ते कर्म यज्ञस्वरूप होते.

'देवान भावयतनिन'... हा गीतेतील विचार (अ.३) मागील लेखात पाहिला. हा सर्व आत्मयज्ञ आहे. आत्मा संतुष्ट झाला की परमात्मा संतुष्ट होतोच. यासंबंधी एका वारकऱ्याची गोष्ट पाहण्यासारखी आहे.

पंढरीला दर महिन्याच्या वारीला हा वारकरी जायचा चालत चालत. कारण त्यावेळी वाहनं नव्हती. मजलदरमजल करीत जायचा. वाटेत पाटीलबुवांच्या घरी ह्याचा मुक्काम पडायचा.पाटलांचा नेम होता की, शेतात काही नवीन धान्य आलं, फळं, आंबे, आले की ते पंढरीच्या विठोबाला अर्पण केल्याशिवाय तो सेवन करीत नसे. वारकऱ्याच्या हातून तो ते पाठवीत असे. असेच एकदा

आंब्याचा मोसम होता. पाडाला आलेले चांगले पाच आंबे त्याने वारकऱ्याच्या हाती देऊन सांगितले, ''वारकरी बुवा, हे आंबे पंढरीनाथाला अर्पण करा बरं का! आणि तसं मला जाताना सांगा. तो बरं म्हणाला, ते आंबे घेऊन तो पंढरीच्या वारीला निघाला. पण झालं असं, वाटेत जाताना वाटेत त्याला खायला काही मिळालं नाही, पाण्याचा थेंबही नाही मिळाला. मग त्यानं विचार केला, 'हे आंबे देवाला अर्पण करेपर्यंत माझा देह तरी धड रहायला हवा का नको ? वैशाखाचा महिना. रणरण ऊन. वारकरी कासावीस झाला आणि 'शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्' या न्यायाने पिशवीतील दोन तयार झालेले आंबे खाल्ले, तो तृप्त झाला. त्याला तरतरी आली. मग तो पुढील वाट चालू लागला. पंढरीला पोचला. चंद्रभागेचं स्नान केलं. मंदिरात गेला. देवाला उरलेले तीन आंबे समर्पण केले आणि म्हणाला, 'पंढरीराया 'त्या पाटलानं पाच आंबे दिले होते बरं का ! पण वाटेत खूप भूक लागली. जीव कासावीस झाला म्हणून मी दोन आंबे खाल्ले. मला क्षमा कर. क्षमा कर.''

दुसरे दिवशी खिरापत घेऊन द्वादशीला हा परत येण्यास निघाला. वाटेत पाटलाचे घर. मुक्काम. झालेलं सर्व सांगितलं प्रामाणिकपणे पाटलाला! मग पाटील बुवा म्हणतात,''तू ते तीन आंबे तरी देवाला समर्पण केलेस का नाही ?' पाटलानं शंका घेतली. तो वारकरी बैचेन झाला. वा! पाटीलबुवा ! असे कसं ? मी सांगितलं यात काही खोटं नाही. हवं तर विचारा पंढरीनाथाला. रात्रीच्या वेळी पाटलाच्या स्वप्नात स्वतः विठुराया आले, तेव्हा पाटलांनी विचारलं, काय म्हणे तुला ते तीन आंबे पोचले काय ?'' देव म्हणतो- नाही मला ते दोन आंबे पावले.'' तात्पर्य काय ? 'त्याची केली सेवा मज पावे' ते दोन आंबे खाऊन वारकरी तृप्त झाला अन् त्याने उरलेले आंबे मला समर्पित केले यात त्या वारकऱ्याचं समाधान, संतुष्टी, महत्त्वाची.' सारांश ''आत्मा संतुष्ट झाला की परमात्मा संतुष्ट होतो.'' असा हा आत्मयज्ञ आहे.

भगवत् गीतेत भगवंत अर्जुनाला म्हणतात, हे अर्जुना ' न मे पार्थास्ति कर्तव्यं... (३.२२) या तिन्ही लोकात मला काही मिळवायचे नाही पण, मी यज्ञकर्म करीतच आहे. हाच आत्मयज्ञ भगवंताचा.

ऋग्वेदातही १०.८१.१ मध्ये म्हटले आहे.

'या इमा विश्वा भुवनानि जुव्हत् ।' आमच्या परमपिता सर्वसाक्षी विश्वकर्म्याने आधी सर्व भूतांसाठी यज्ञ केला. नंतर त्याने आत्म्याचा यज्ञ केला आणि त्या योगे सर्वांना धन, ऐश्वर्य प्राप्त झाले.

म्हणून असे म्हणता येईल जो दुसऱ्यांना न देता धन साठवितो तो जनतेचा शत्रू होय. उलट जो साठविलेले धन गरजूंना देतो, दान करतो, त्याचे धन वाढते. 'ये पचन्त्यात्मकारणात्, ते पापाः अघं भुङ्कते' हा या अर्थाचाच श्लोक आपण यापूर्वी पाहिला आहे.

देण्यात कल्याण आहे, उपनिषदातील 'त्रयो दकारः' ही कथा सर्वश्रुत आहे. देव, दानव आणि मनुष्यांना प्रजापतीने 'दा'या अक्षराचाच उपदेश केला. त्यात 'द'- दान करा. हा मनुष्यांसाठी केलेला उपदेश आहे. आणि दानही कसे ? ''अपुनर्ग्रहणाय स्वत्ववृत्तिनिवृत्तिपूर्वकं परस्वत्वोत्पादनम् । (पाणिनी) ही दानाची व्याख्या 'पाणिनीने' सांगितली आहे.

तेव्हा दान हा महायज्ञ आहे. म्हणून देताना फार विचार करू नये. एक सूचक दृष्टांत पहा-

एकदा एक याचक दारी आला असता एका गृहस्थानं त्याच्या झोळीत एकच दाणा टाकला. याचक निघून गेला. हा गृहस्थ घरात आला अन् पाहिलं तर त्या झोळीतील धान्यात एकच दाणा सोन्याचा झाला. मग त्याला पश्चात्ताप झाला. आपण ओंजळभर तरी द्यायला हवे होते. असे त्याला वाटले.

जिथे दान केले जात नाही. 'न स ओकः अस्ति- ते घर नव्हे; असे ऋग्वेदात म्हटले आहे.

यज्ञासंबंधी भगवद्गीतेतील विचार स्पष्ट आहे. अ.३.१४/१५ वा
श्लोक-

**अन्नाद् भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।**

**यज्ञाद् भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ।।१४।।**
**कर्म ब्रह्माद्भवं विध्दि ब्रह्माक्षर समुद्भवम् ।**
**तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।।१५।।**

श्लोकाचा अर्थ स्पष्ट आहे. सारांश असा- साक्षात् परमात्मा यज्ञात प्रतिष्ठित असतो. म्हणून यज्ञ हे श्रेष्ठतम कर्म आहे.

अन्नात् भवन्ति भूतानि- यासारखाच विचार तैत्तिरिय उपनिषदात पहा- 'अन्नाद् हि सर्व भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति । अन्नं प्रयन्त्यभिसंविशन्ति । अन्नाद् वै प्रजाः उत्पद्यन्ते । अर्था अन्नेन जीवन्ति । जातानि अनेन एव वर्धन्ते । असे हे यज्ञचक्र, सृष्टिचक्र अव्याहत चालू आहे, हजारो वर्षांपासून प्रश्नोपनिषदातही 'अन्नं वै प्रजापतिः' 'अन्नं ब्रह्म' असा विषय आला आहे. हे शरीर अन्नरसरूप आहे. अन्नापासून वीर्य-त्यापासून प्रजोत्पत्ती- सर्व पशुपक्षी अन्न खातात- त्यापासून पुनः प्रजोत्पत्ती- या निसर्ग चक्रावर मात करता येणार नाही.

यज्ञाद् भवति पर्जन्य...यज्ञः कर्मसमुद्भवः । हा मोठा आधार प्राचीन काळातील जो आहे त्यानुसार पूर्वी पर्जन्येष्टि करून वृष्टी होत असे. हा सर्व विषय मोठा आहे. तो विस्ताराने पाहणे येथे शक्य नाही. पण अभ्यासकांना याचे आधार सांगता येतील. (प्राचीन ग्रंथाआधारे)

यज्ञात हवनाद्धारे पाऊस पडू शकतो. आजही कधी कधी मोठमोठे यज्ञ (स्तवन/सत्र) केले जातात. तेव्हा हा अनुभव येतो. जिज्ञासूंना याचे संदर्भ देता येतील. परंतु विस्तारभयास्तव येथे मी ते सर्व दिले नाहीत.

यज्ञसंकल्पनेचा आणखी थोडा विचार पुढील व शेवटच्या लेखात आपण करू.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

---

**पान २४ वरून...**

वावरतो. राम जे मुद्दे उपस्थित करतो ते सारे खरे आहेत. पण तरीही आजवर नव्हे, आताही आम्हाला या जगाबद्दल इतकी अनास्था..घृणा का वाटत नाही ?

कोणताही दुःखद प्रसंग वाट्याला आलेला नसताना म्हणजेच संपूर्णतः निर्निमित्त असे वैराग्य अंतरी उपजणे हे किती बरे वेगळे ! समोर वसिष्ठ-विश्वामित्रांसारखे लोक नसताना आज रामाच्या या वक्तव्याप्रमाणे कोणी बोलू लागले तर आपण त्याला वेड्यातच नाही का काढणार ? म्हणूनच आजवर मित्रांपुढे अथवा अगदी आई-वडिलांपुढेही हे विचार राम मांडीत नव्हता. पण मानसशास्त्राचे सर्वोत्तम ज्ञान असलेल्या वसिष्ठादिक ऋषींना रामाची शुद्ध वैराग्य अवस्था बरोबर कळली आणि ते रामाला अंतस्त्यागी बहिःस्संगी असा महाकर्ता महाभोक्ता करण्यास पुढे सरसावले ते कसे ते आपण पुढील मुमुक्षुव्यवहार प्रकरणांत पाहणार आहोत. तूर्तास इथेच थांबू.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

(क्रमशः)

## ...वाचक समर्थ भक्तांना नम्र निवेदन...

- **'रघुवीर समर्थ'** मासिकातील लेखांबद्दल व रचनेबद्दल आपल्या प्रतिक्रिया, सूचना, अभिप्राय मासिकात छापण्यासाठी लिखित स्वरूपात अवश्य पाठवा.
- अंकातील विषयांना अनुसरून आपले स्वतंत्र चिंतन लिखाणाचे आम्ही निश्चितच स्वागत करू.
- विविध उपासना केंद्र, मठ, अभ्यास मंडळांमध्ये झालेल्या कार्यक्रमाचे वृत्त 'रघुवीर समर्थ' मासिकाच्या सातारा येथील कार्यालयात पाठवावे.



**-संपादक**



संत तुकाराम महाराजांचे साखळीचे १२ अभंग

# तुका म्हणे (अभंग ५ वा)

सौ. माधुरी दि. जोशी, बुलढाणा, मो. ९८२२१९०९६३

**अभंग -५**

**ज्याची त्याला पदवी इतरा न साजे ।**
**संताला उमजे आत्मसुख ।।१ ।।**
**आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी ।**
**यावीण चावटी करू नका ।।२ ।।**
**करू नका कांही संतसंग धरा ।**
**पूर्वीचा तो दोरा उगवेल ।।३ ।।**
**उगवेल प्रारब्ध संतसंगे करुनी ।**
**प्रत्यक्ष पुराणी वर्णियेले**
**वर्णियेले एक गुणनाम घोष ।**
**जातील रे दोष तुका म्हणे ।।५ ।।**

आत्मानुभवाची स्थिती काय असते हे एखादा आत्मानुभवीच जाणू शकतो. ह्याबद्दलचा खुलासा मागील अभंगात तुकाराम महाराजांनी केला. ह्या अभंगात तोच विषय पुढे नेताना ते म्हणतात,

**ज्याची त्याला पदवी इतरा न साजे ।**
**संताला उमजे आत्मसुख ।।१ ।।**

आपण आध्यात्मिक दृष्ट्या कोणत्या पातळीवर आहोत हे फक्त संत व आपले आपणच जाणू शकतो. एखादी व्यक्ती आत्मज्ञानाच्या पातळीवर पोहोचली आहे किंवा नाही हे फक्त आत्मज्ञानी संतच जाणू शकतात. इतर लोक केवळ बाह्य वर्तनावरून अंदाज करतात. समजा एखादी व्यक्ती शीघ्र कवित्व करते, अतिशय मुद्देसूद व शास्त्र प्रमाणित भाषेत वक्तृत्व करते, कदाचित अनेक संतांचे काव्य व चरित्र तिला मुखोद्गत आहे, चारही वेद ती उत्तमप्रकारे जाणते, काही पुस्तकांचे लेखनही त्याने केले आहे. अशा अनेक गुणसंपन्न व्यक्तीला लोक खूप मान देतात. तिची प्रशंसा करतात, ती पोहोचलेली असावी असा त्यांचा समज असतो. पण अशा व्यक्तीला खरंच आत्मज्ञान प्राप्त झाले आहे किंवा नाही हे फक्त एका आत्मज्ञानी व्यक्तीलाच समजू शकते. इतरांना त्यांचे वरवरचे ज्ञान दिसते. समर्थ म्हणतात, **''गुप्त आहे उदंड धन । काय जाणती सेवक जन । तयास आहे ते ज्ञान । बाह्यात्काराचे ।।६/९/१** परंतु एखादा आत्मज्ञानीच त्याच्या अंतरस्थितीला जाणू शकतो.

**देहीच विदेह होणे । करून कांहीच न करणे ।**
**जीवन मुक्तांची लक्षणे । जीवनमुक्त जाणे ।।६/९/३३**

आणि म्हणून आत्मज्ञानी माणसालाच खरे आत्मसुख अनुभवास येते. आत्मसुख प्राप्त झालेला पारमार्थिक दृष्ट्या श्रेष्ठ पदाला प्राप्त झालेला असतो. अखंड व निर्विषय आनंद, सुखरूपता, निश्चलता, निर्भयता, तृप्ती व शांती त्याच्या वाट्याला येते.जीवनाचे सार्थक झालेले असते. 'ब्रह्मानंद परमसुखदं' ह्या श्लोकातील सर्व लक्षणे त्याला लागू होतात. आणि म्हणून तुकाराम महाराज सामान्य लोकांना म्हणतात की, बाबांनो तुम्ही देखील आत्मसुखाच्या मागे लागा, ते प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी ज्ञानदृष्टी उघडा, उगाच आळस, प्रमादात, भलत्या गोष्टीमध्ये वेळ घालवू नका. इतर साधनांच्या भानगडीत पडू नका.

**आत्मसुख घ्या रे उघडा ज्ञानदृष्टी ।**
**यावीण चावटी करू नका ।।२ ।।**

महाराज म्हणतात,सामान्य लोकहो आत्मसुखावाचून असलेल्या संसारसुख किंवा विषय सुखाच्या नादी लागू नका. कारण विषयातून मिळणारे सुख हे क्षणिक आहे, फसवे आहे. सुखाचा आभास निर्माण करून पाठोपाठ दुःख घेऊन येणारे आहे, व वीटणारे आहे. समर्थही तेच सांगतात. 'विषयजनित सुखे सौख्य होणार नाही.'' तुजवीण रघुनाथा वोखटे सर्व काही'' किंवा ''सुख सुख

म्हणता हे दुःख ठाकून आले.'' म्हणून या संसार सुखात रंगणे, रमणे, रेंगाळणे म्हणजे ज्ञानदृष्टी झाकाळून टाकणे होय. तुकाराम महाराज ज्ञानदृष्टी उघडून, आत्मसुख शोधा असे म्हणत आहेत. हे आत्मसुख नेमके कोठे आहे ह्याचाही पत्ता ते आम्हाला सांगतात.

**तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख।**
**पाहीन श्रीमुख आवडीने।।**

किंवा ''सर्व सुखाचे आगर बाप रखुमादेवीवर'' सर्व सुख म्हणजेच आत्मसुख आणि ते आत्मसुख हे केवळ एका भगवंताजवळ आहे. कारण भगवंत सुखरूपच आहे व असा सुखरूप भगवंत आत्मरूपाने आपल्या जवळच दडलेला आहे नव्हे तेच आपले खरे स्वरूप आहे. पण ते जाणण्यासाठी ज्ञानदृष्टी उघडणे गरजेचे आहे. नाशवान असणाऱ्या संसार सुखाची आंस सोडून, शाश्वत अशा आत्मसुखाची कांस धरा व त्यासाठी ज्ञानदृष्टी जागृत करा असे ते या चरणातून सांगत आहेत. ''ज्ञानात एव तू कैवल्यम्'' असे श्रृति सांगते. आणि म्हणून स्वतःचे स्वरूप ओळखा.

**ऐक ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणजे आत्मज्ञान।**
**पहावे आपणासी आपण। या नांव ज्ञान।।**

असे समर्थ म्हणतात. आत्मसुख प्राप्त करण्यासाठी हाच एक मार्ग आहे. गड्यांनो आपण इतर उपाय (चावटी) करण्याच्या भानगडीत पडू नका.

**न जाणता कोटीवरी। साधने केली परोपरी।**
**तरी तो मोक्षास अधिकारी। होणार नाही।।९/४/२८।**

असे समर्थांचे म्हणणे आहे.

**चित्तस्य शुद्धये कर्म न तु वस्तुपलब्धये।**
**वस्तुसिद्धिर्विचारेण न किंचित् कर्म कोटीभिः।।११**

असे 'विवेक चुडामणि' ग्रंथात भ.शंकराचार्य म्हणतात. कर्म जे आपण करतो ते फक्त अंतःकरणाचे शुद्धीसाठी होय; वस्तुप्राप्तीकरिता नव्हे. वस्तुची सिद्धि विचाराच्या योगाने होते कोट्यावधी कर्मे केली म्हणून काही होत नाही. असा भावार्थ होय. आत्मसुख प्राप्तीसाठी ज्ञानदृष्टी उघडणे आवश्यक आहे. पण ही ज्ञानदृष्टी आपली आपल्याला उघडता येईल का ? ती कोण उघडून देईल ? तर ती संत, सद्गुरू उघडून देतील.त्यासाठी संतांचा, सद्गुरूंचा संग धरावा लागेल. आणि म्हणून महाराज तिसऱ्या चरणात म्हणतात, करू नका काही संत संग धरा। पूर्वीचा तो दोरा उगवेल.

मोक्षासाठी आत्मज्ञान होण्यासाठी साधुंची संगत श्रीगुरूंचे मार्गदर्शन व कृपा अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय तरणोपाय नाही.

**संतांचे संगति। मनोमार्ग गति।**
**आकळावा श्रीपती। येणे पंथे।।** ज्ञानदेव

सद्गुरू वाचोनी सापडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी। असे तुकोबाराय म्हणतात.

समर्थ त्यासाठी सुंदर दृष्टांत देतात,

**दिसेना जे गुप्त धन। तयासी करणे लागे अंजन।**
**गुप्त परमात्मा सज्जन। संगती शोधावा।६/९/१९**

न दिसणारे, जमिनीत पुरलेले धन दिसण्यासाठी डोळ्यात अंजन घालतात. तसा गुप्त परमात्मा अनुभवण्यासाठी श्रीगुरूंची संगत धरावी किंवा दुसरा दृष्टांत असा-

**रायाचे सन्निद्ध होता। सहजचि लाभे श्रीमंतता।**
**तैसा हा सत्संग धरीता। सद्वस्तु लाभे।।६/९/२०**

राजाच्या परिवाराला राजाच्या श्रीमंतीचा लाभ होतो. त्याचप्रमाणे संतसंगतीत ब्रह्मानुभवाचा लाभ होतो. म्हणून सतत जर संत संगती धरली, सद्गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे साधना, वाचन, अभ्यास व श्रीगुरूंच्या मुखातून श्रवण जर घडले तर हळूहळू देहभाव जीवभाव नाहीसा होऊन आत्मभाव (पूर्वीचा दोरा उगवेल) जागृत होईल. आपलेच आपल्याला स्वस्वरूपाचे भान होईल, जसे भगवंताचा गीतोपदेश ऐकल्यावर अर्जुन म्हणतो की,

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत् प्रसादात् मयाच्युत।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव।।१८/७३**

त्याचप्रमाणे साधुंच्या सततच्या उपदेशाने मोह,भ्रांती, अज्ञान, अविद्या नष्ट होऊन शिष्यास आत्म जागृती येते. मीपणा गळून पडून जुने ठेवणे आकळायला लागते. पुढे

महाराज म्हणतात,

**उगवेल प्रारब्ध संत संगे करूनी।**
**प्रत्यक्ष पुराणी वर्णियेले ।।४ ।।**

संत संगामुळेच पूर्वीचे पुण्य फळाला येईल, सद्गुरूंची भेट होऊन साधन मिळेल. साधना होऊन त्यांच्या कृपाशिर्वादाने साध्यापर्यंत पोहोचता येईल. याबाबतचे दाखले पुराणात देखील वर्णिलेले आढळतात. यासाठी नारद, ध्रुव, प्रल्हाद, उद्धवादी उदाहरणे दिली जातात. ध्रुव बालवयात तपश्चर्येसाठी जंगलात निघून गेला. तिथे त्याला श्री नारदमहर्षी भेटले व त्यांनी मंत्रोपदेश देऊन कृपांकित केले. श्रीगुरूंनी दिलेल्या नाममंत्राचा जप एकनिष्ठेने केल्याने त्याचेवर श्रीनारायण प्रसन्न झाले. व दर्शन देऊन त्याला अढळपद दिले. श्री नारद महर्षिंना देखील लहान वयात सत्संग घडला व नारायण नामाची गोडी लागली. त्यातून त्यांचा उद्धार झाला. श्री प्रल्हादाला तर आईच्या पोटात असतानाच गुरूमंत्र मिळाला व त्याच श्रद्धेपोटी भगवंताला खांबातून प्रगट व्हावे लागले. श्रेष्ठ भक्त म्हणून त्याची गणना केली जाते. श्री गुरूंनी दिलेल्या नामाने वाल्यासारखा अत्यंत पापी मनुष्य देखील ऋषीपदाला प्राप्त झाला. म्हणून संत संगति व त्यांनी दिलेले दिव्य नाम व उपदेश ह्या सर्व गोष्टींना परमार्थात अत्यंत महत्त्व आहे.

**सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला।**
**उद्धवा लाधला कृष्णदाता ।। (ज्ञानदेव हरिपाठ)**
**किंवा नामदेव महाराज म्हणतात**
**ध्रुव प्रल्हाद बळी अंबऋषी प्रबुद्ध।**
**नामेंचि चित्पद पावले देख ।।''**

असा हा नामाचा, संतसंगतीचा महिमा अपरंपार आहे. सद्गुरूंनी दिलेल्या नामामुळे, चित्ताचा दोष जाऊन चित्तशुद्धी होते व म्हणून तुकाराम महाराज शेवटच्या चरणात म्हणतात,

**वर्णियेले एक गुणनाम घोष। जातिल रे दोष तुका म्हणे ।।**

नामस्मरण, नामसंकीर्तन, नाम घोष ह्या संदर्भात सर्व साधुसंतांची एकवाक्यता आढळते. भ.शंकराचार्य कैवल्याष्टकामध्ये म्हणतात,

**आब्रह्मस्तम्बपर्यतं सर्वं मायामयं जगत्।**
**सत्यं सत्यं पुनः सत्यं हरेर्नामैव केवलम् ।।२ ।।**

तसेच,

**कलौ नास्त्यैव नास्त्यैव नास्त्यैव।**
**हरिर्नामैव केवलम्।**

असे भागवतही ओरडून सांगते.

**वेदे रामायणे शास्त्रे पुराणे भारते तथा।**
**आदौ मध्ये तथा चांते हरिः सर्वत्र गीयते ।।**

असे स्कंद पुराणात वर्णिले आहे. म्हणून संत, सद्गुरुंनी दिलेल्या नामाचा अत्यंत मनापासून, श्रद्धेने, प्रेमाने जप केल्यास चित्त शुद्धी होते व त्याचबरोबर श्री गुरूंनी उपदेश केल्यास आत्मसाक्षात्कारापर्यंत साधक पोहोचू शकतो. असे संत व शास्त्र सांगते. ह्या अभंगात तुकाराम महाराजदेखील तेच सांगत आहेत.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**






# दृष्टांत

श्री. अमृतबुवा रामदासी,
मो. ९४०४५९०७७३ सज्जनगड

**जगी होईजे धन्य या रामनामे। क्रिया भक्ती उपासना नित्यनेमे ।।**
**उदासीनता तत्वता सार आहे। सदा सर्वदा मोकळी वृत्ती राहे ।।** म.श्लो.५७

उदासीनता तत्वतः सार आहे या समर्थोक्ती प्रमाणे आयुष्याची घडण जर आपण ठेवू शकलो तर या मायेच्या भवभ्रमात आपल्याला भयभीत होण्याचे काहीच कारण नाही. आपण जे कार्य करतो ते उदासीन तत्त्वाने, पण उत्साहाने करावे. आता आपणास हे जाणून घेतले पाहिजे की नेमकी उदासीनता म्हणजे तरी काय? ही एक अशी उदासीनता आहे की ती उत्साहातून आली आहे. स्वात्मपरीक्षणातून स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न केल्यानंतर आलेली ही उदासीनता आहे. बऱ्याच वेळेस असे होते की संसारातील लहान मोठ्या उद्वेगाने नाराजी येते व आपण उदासीन होऊन जातो. आणि उदासीन या शब्दाचा एवढाच अर्थ आपणास लागतो. उदासीनतेचे तत्त्व जाणून घेण्यासाठी आपणास कर्म करताना उत्साह तर फलापेक्षेच्या ठिकाणी औदासिन्य वृत्ती जोपासावी लागते. ही एका अनासक्त असलेल्या जीवाची प्रबळ शक्तीच आहे.

इतिहासातील व प्रागैतिहास काळात अनेक संतांनी व युगपुरुषांनी याच कर्म-फल, उत्साह-औदासिन्य या कार्य-कारणावर भर दिलेला दिसतो.

आपणास संसारातील प्रलोभनांपासून आणि अहंकारापासून जितकं म्हणून लांब राहता येईल तितकं लांब राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा अहंकार जागृत होतो, तेव्हा माया निर्माण होऊन तिचा विळखा अजून घट्ट होतो. मनुष्याला जेव्हा फक्त स्वतःच्या शरीराची ओळख असते तेव्हा तो स्वतःचं खरं स्वरूप विसरून गेलेला असतो.

एक साधू एका रात्री एका स्मशानातून जात असतात. तेव्हा त्यांचा पाय अंधारात एका कोणत्या गोष्टीला धडकतो. त्यांनी त्या गोष्टीचं जवळून जेव्हा निरीक्षण केले तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की ती गोष्ट म्हणजे एक मानवी कवटी आहे. त्या साधूंनी लगेच ती कवटी उचलली आणि आपल्या मस्तकाला लावली. आणि म्हणाले ''कृपया मला माफ करा.'' रात्रीच्या या काळोखात न दिसल्या कारणाने चुकून माझा पाय आपणास लागला. कृपया माफी असावी. हे सर्व दृश्य पाहून त्या साधूचे शिष्य हैराण व अचंबित झाले. शिष्यांनी विचारले की एक मृत मानवाच्या मृत असलेल्या कवटीपासून आपण क्षमायाचना करीत आहात ? साधू म्हणाले हे पहा जर या क्षणाला ही व्यक्ती जिवंत असती तर आत्तापर्यंत याने माझी साल काढली असती मारून. हे स्मशान श्रीमंत लोकांचं आहे. साहजिक ही एक श्रीमंत व्यक्ती असली पाहिजे. त्या साधूंनी ती कवटी सांभाळून आपल्या झोळीत ठेवली. जिथे जातील तिथे त्या कवटीला आपल्या सोबत घेऊन जात असत. रोज सकाळी उठून त्या कवटीला नमस्कार करून माफी मागत असत. हे सर्व पाहून खूप विस्मित झालेल्या शिष्यांनी त्या साधूंना प्रश्न विचारला हे सर्व जे

ते करत आहेत त्याचा अर्थ काय ? खरं तर या कवटीचा काहीच उपयोग नाही. तेव्हा साधू म्हणतात, ही मनुष्याची कवटी तुम्हाला निरुपयोगी वाटत असली तरी ती माझ्यासाठी खूप अमूल्य आहे आणि पुढे म्हणाले हे पहा जेव्हा जेव्हा माझ्या मनात आसक्ती, अहंकार निर्माण होतात तेव्हा ही कवटी मी माझ्या झोळीतून काढून पाहत असतो. या कवटीकडे मी जेव्हा पाहतो तेव्हा मला स्मरण होतं की एक दिवस माझ्या शरीराचं स्वरूप याचप्रमाणे होणे आहे. माझी कवटी पण एक दिवस कोणत्या तरी स्मशानात अशीच पडणार आहे. कोणत्या अनोळखी व्यक्तीकडून ठोकरली जाणार. मग कशाचा अहंकार आणि कशाची आसक्ती ? हे ऐकून शिष्यांचे डोळे उघडले आणि सगळ्यांना जीवनातील सगळ्यात मोठा परिपाठ मिळाला.

वास्तविक ज्या शरीराचा आपण अहंकाराने वापर करतो ते शरीर एक दिवस कुणाच्या तरी पायधुळी जाणार मग आसक्ती आणि अहंकारापेक्षा उदासीनता श्रेष्ठ का नाही ?

" The scientists are exploring, going out word into vast space... But man has very rarely gone inward. There he can find immense. Immeasurable universe. For that there must be vast space in your mind. All that is meditation... And in that space there is love.."

*J. Krishnamurti.*

(The magnitude of the mind. Colombo. 16 Nov. 1980)

# रघुवीर समर्थ मासिक सभासदांशी हितगुज

❁ 'रघुवीर समर्थ मासिक' प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टामार्फत पाठविले जाते.

❁ महिन्याच्या २५ तारखेपर्यंत मासिक न मिळाल्यास कृपया स्थानिक पोस्ट ऑफिसमध्ये चौकशी करावी.

❁ एखाद्या महिन्याचा अंक न मिळाल्यास २५ तारखेनंतर स्थानिक प्रतिनिधी अथवा सातारा कार्यालयाकडे संपर्क केल्यास आपणास दुसरी प्रत पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.

❁ **अंकासंबंधी समस्या निवारणासाठी संपर्क –**
**श्री. रवि देशपांडे – ९४०५५४२४६१ (सातारा कार्यालय)**

❁ मासिकाची वर्गणी–
**वार्षिक वर्गणी– रु. १५०/–, चार वर्षांसाठी – रु. ५००/–आठ वर्षांसाठी – रु. १०००/–**

❁ कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

❁ मासिकाच्या कव्हर पाकिटावर आपल्या पत्त्याच्या खालील बाजूस वर्गणी संपण्याचा कालावधी दिलेला आहे. कृपया वर्गणीदारांनी तो पाहून एक महिना आधीच वर्गणी M.O. किंवा D.D. ने पाठवावी किंवा खालील बँक खात्यात आपण **चेकने** किंवा **ऑनलाइन** जमा करावी.

**श्रीरामदास स्वामी संस्थान, सज्जनगड IDBI Bank, Satara City Branch,**
**बचत खाते क्र. 45110010830237 IFSC - IBKL 0000451**

❁ वर्गणी पाठविल्याची माहिती एका स्वतंत्र पोस्टकार्डवर किंवा ईमेल द्वारे किंवा एस.एम.एस. करून आपले संपूर्ण नाव व पत्ता दूरध्वनी क्रमांकासहित कळवावी. ''**रघुवीर समर्थ**'' साठी असा उल्लेख करावा.

**❁ मासिकाची वर्गणी पाठविण्याचा पत्ता ❁**
**श्रीरामदास स्वामी संस्थान, सातारा कार्यालय**
**'चंद्रहास' प्लॉट नं. ३६ ब, सर्व्हे नं. ४६७/७ अ, उत्तेकरनगर, सदरबझार, सातारा ४१५००१.**
ई-मेल : raghuvirsmasik@gmail.com

# मित्र,मैत्री आणि समर्थ

**श्री. ग. प्र. कुलकर्णी** - मो. ८७९३३६०८१४






**युवक मित्रांनो**

**सप्रेम जय रघुवीर !**

आपल्या आयुष्यातील सर्वांगसुंदर असं नातं म्हणजे 'मैत्री'. मित्रांमध्ये आपला जीव (मन) जेवढा रमतो तेवढा क्वचित इतरत्र रमत असेल! मैत्रीच्या टॉनिकवर माणसाच्या जीवनाचे आरोग्य सुदृढ राहतं. प्रत्येक व्यक्तीच जीवन विविध नात्यांच्या धाग्यांना बांधलं गेलेले असतं. या नात्यांच्या बंधामुळे एका विशिष्ट मर्यादेत आपण जगत असतो. त्या प्रत्येक नात्यागणिक आपली भूमिका वेगवेगळी असते. आई,वडील, भाऊ, बहीण, चुलते, आजी-आजोबा, मामा,मावशी इत्यादी प्रत्येक नात्याचं काही एक खास वैशिष्ट्य असतं आणि त्या प्रत्येक नात्याची वैशिष्ट्यं जपत आपण आपलं जीवन आनंदानं जगत असतो. या दृष्टीने आपल्या भारतीय हिंदू संस्कृतीचं वैभव वाखाणण्याजोगं आहे. एखाद्या भोजनाच्या थाळीत जसे वेगवेगळ्या रुचींचे पदार्थ असावेत तसे हे नाते जीवनाचा आनंद वाढवितात. परंतु नाते कोणतेही असो या प्रत्येक नात्यात मैत्रीचा गोडवा आवश्यकच आहे. प्रत्येक नात्यामध्ये मैत्री मिसळून जे तयार होते त्याची चव काही औरच असते!

मित्र नाही असा मनुष्य शोधूनही सापडणे कठीण! आणि सापडलाच तर त्याला मनुष्य म्हणायचे का ? हाही चर्चेचा विषय ठरेल. विद्वानांनी तर असंही म्हटलंय की या जगात सर्वाधिक श्रीमंत माणूस तोच की ज्याला सर्वाधिक मित्र आहेत. या अर्थाने मैत्री ही व्यक्तीची आयुष्यातील खरी संपत्ती आहे. त्याचबरोबर 'मैत्री' ही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख आहे. *Friendship is an identity of a person.* मनुष्याची खरी पारख त्याच्या जिवलग मित्रांवरून केली जाते. प्रत्येक व्यक्तीच्या चरित्राचा, व्यक्तिमत्त्वाचा 'मैत्री' हा जणू आरसा आहे.

'मैत्री' ही प्रत्येक व्यक्तीची मानसशास्त्रीयदृष्टीने अभ्यासल्यास आवश्यकता. आपले सुख,दुःख, चिंता, मनातील विचार मतमतांतरांची देवाणघेवाण, मोकळ्या मनाने करण्यासाठी सदैव खुलं असलेलं हक्काचं व्यासपीठ म्हणजे 'मैत्री'.

या मैत्रीचे महात्म्य श्रीसमर्थांनी कशाप्रकारे वर्णिले ते पाहूया.

श्रीसमर्थांच्या या उपदेशाने आपण अधिक चांगले मित्र होऊ, आपली मैत्री अधिक प्रगल्भ होईल यात शंकाच नाही !

श्रीसमर्थ रामदास स्वामींनी करुणाष्टकात रामरायाकडे केलेली प्रार्थना पहा.

**''प्रसंग वेळ तर्केना । सुचेना दीर्घ सुचना ।**
**मैत्रीकी राखिनां येना । बुद्धि दे रघुनायका ।।''**

किंवा सज्जन संगती दे रे राम, बहुजनमैत्री दे रे राम. असे मागणे त्यांनी आपले आराध्यदैवताकडे मागितले आहे.आपणास मैत्रीचे महात्म्य सांगणारे समर्थ आपले खरे मित्र होऊन आपणास मैत्रीचे रहस्य समजावताना काही मुद्दे सांगतात ते असे-

**१) आधी स्वतःचे मित्र व्हा**

**आपला आपण करी कुडावा ।**
**तो आपला मित्र जाणावा ।**
**आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ।।**

सर्वप्रथम आपण स्वतःला समजून घ्यायला हवे. आपली आपल्याशीच खूप छान मैत्री असायला हवी.

आपली प्रसन्नता बिघडवणारे विचार, सवयी, व्यसनांना आपण दूर ठेवायला हवं. सतत होकारार्थी, सात्त्विक विचार, उच्च ध्येय मनाशी बाळगणं, सतत सदाचार राखणं, यामुळे आपण आपले चांगले मित्र होऊ.

**येथे बोल नाही जनांसी । हे आवघे आपणाचि पासी ।**
**विचारावे आपल्या मनासी । क्षणक्षणा ।।**

२) उत्तम संगती असावी

**उत्तमसंगती धरावी । आपली आपण चिंता करावी ।**
**अंतरी बरी विवरावी । बुद्धि जाणत्याची ।।**

मैत्री जरी ठरवून केली जात नसली तरी संगतीच्या लोकांमध्ये कोण खरा मित्र व कोण शत्रू याची तपासणी आपण आपल्या ठिकाणी करणे आवश्यक आहे. कारण आपल्या जीवनातील सुख-दुःख, यशापयश, प्रगती-अधोगती ही संगतीवरचं अवलंबून आहे. यादृष्टीने श्रीसमर्थांच्या पुढील ओव्या अतिशय बोलक्या आहेत.

**उत्तमसंगतीचे फळ सुख । अधमसंगतीचे फळ दुःख ।**
**आनंद सांडूनिया शोक । कैसा घ्यावा ।।**
**नाना दुर्जनांचा संग । क्षणक्षणा मनोभंग ।**
**याकारणे काही रंग । राखोन जावे ।।**
**संगदोषे महादुःखे । संगदोषे दरिद्रता ।**
**संगतीने महद्भाग्य । प्राणी प्रत्यक्ष पावती ।**
**संग तो श्रेष्ठ शोधावा । नीच संगत कामा न ये ।**
**न्यायवंत गुणग्राही । यत्नाचा संग तो बरा ।।**(स्फुट प्रकारण)

केवळ *time pass* साठी, वेळ घालवण्यासाठी कुबुद्धीचे आणि कुकर्मी मित्र आपणाभोवती गोळा झाले तर आपण आयुष्यात नापास झाल्याशिवाय राहणार नाही.

**निःस्वार्थता-निर्हेतुकता**

मैत्रीमध्ये स्वार्थ साधण्याचा हेतू नसावा. पैशाच्या आशेने, मदतीच्या आशेने, अपेक्षा मनात ठेवून केलेली मैत्रीचा धागा कच्चा असतो. अपेक्षाभंग झाला की मैत्री तुटते. मित्रांबद्दल मनात उत्स्फूर्तपणे सहकार्याची परहित जोपासण्याची भावना असावी.

**आशेची मैत्रिकी खोटी । दुराशा विटंबी पुढे ।**
**परोपकारणी मैत्री । ते मैत्री न विटे कदा ।।**

**सहजत्याग**

ज्या व्यक्तींच्यामध्ये खरी मैत्री असते तिथे 'सहजत्याग' दिसतो. सहजत्याग म्हणजे प्रत्येक मित्र दुसऱ्याशी काही ना काही त्याग करत असतो. या त्यागामध्ये कर्तेपणा नसतो. सहजप्रेमातून असा सहजत्याग घडतो. श्रीसमर्थ म्हणतात-

**माझे माझे तुझे माझे । ऐसी हे मैत्रिकी जनीं ।**
**माझे तुझे तुझे तुझें । ऐसें हे न घडे कदा ।।**

अशी मैत्री ही दुर्लभच असते. काही लोभी मित्र असतात. त्यांना मित्राकडून फक्त घेणेच माहिती असते. थोडक्यात 'जो तेरा है वो मेरा है और जो मेरा है वो भी मेरा' अशी मैत्री निम्नस्तरावरील होय. जो तेरा है वो मेरा है, जो मेरा है वो तेरा ही मैत्री मध्यम होय. परंतु 'जो तेरा है वो तेरा है, जो मेरा है वो भी तेरा' अशी मैत्री दुर्लभच! असे श्रीसमर्थ रामदास स्वामी म्हणतात. तात्पर्य त्यागाशिवाय मैत्री शक्य नाही. भावेविण भक्ती, बळेंविण शक्ती तशीच त्यागेवीण मैत्री. बोलताचि नये.

**परस्परविश्वास**

**अविश्वासें वस्ती केली । विश्वास हृदयी नसे ।**
**विकल्पे चालते मैत्री । ते मैत्री आत्मघातकी ।।**
**मित्र हो गोत्रजु बंधु । आपुले पारखें जनीं ।**
**विकल्पेंवीण जे सख्य । तें सख्य सुख दाखवीं ।।**

कोणत्याही नात्याचे वस्त्र परस्परविश्वासाच्या धाग्याने विणलेले असते. मैत्रीच्या नात्याचेही तसेच आहे. या वस्त्रावर विकल्प किंवा संशयाची कात्री लागता कामा नये. कोणत्याही नात्यात संशय घुसला की त्या नात्याचा सर्वनाश झालाच म्हणून समजा.

**निरहंकारिता**

**जाणत्या जाणता भेटे । नीतीचा गुणग्राहकु ।**
**अहंता नाडळे जेथे । तेथें आनंद होतसे ।।**

मित्रांना परस्परांच्या गुणांचे कौतुक असायला हवे. इतरांच्या सद्‌गुणाबद्दल, कलेबद्द, ज्ञान, यशाबद्दल मत्सर नको. अहंकारामुळे निर्माण होतो. समर्थ म्हणतात.

**पान ४० वर...**




# अभंग आस्वाद

**श्री. प्रसादबुवा रामदासी, सज्जनगड, मो. ९४२१५७४२००**

**आमुचे सज्जन संत साधु जन।**
**होय समाधान तयांचेनि**
**तयांचेनि संगे पाविजे विश्रांती।**
**साधु आदि अंती सारिखेचि।**
**सारिखेची सदा संत समाधानी।**
**म्हणोनिया मनी आवडती।**
**आवडती सदा संत जिवलग।**
**सुखरूप संग सज्जनांचा।**
**सज्जनांचा संग पापाते संव्हारी।**
**म्हणोनिया धरी रामदास ।।**

मनुष्य जीवनामध्ये संगतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण सत्याचा साक्षात्कार किंवा आयुष्याचा सत्यानाश करण्याचे सामर्थ्य संगतीमध्ये असते, श्री समर्थांनी मनोबोधामध्ये वर्णन केले आहे. 'मना सर्व ही संग सोडोनी द्यावा.' सर्व संगाचा त्याग करावा पण नियमाला अपवाद असतो, मनुष्यप्राणी हा संगप्रिय आहे, संगतीशिवाय तो राहू शकत नाही, म्हणून संग धरायचा असेल तर संतांचा धरावा. कारण जीवनामध्ये शांती, समाधान प्राप्त करून देण्याचे अतुल व अद्‌भुत सामर्थ्य संतांच्या संगतीमध्ये असते.

साधुसंत तुम्हाआम्हा सारखेच या मृत्युलोकात येतात. पण आपल्या जीवनामध्ये फार मोठी क्रांती करून आपले जीवन एवढ्या उंच पातळीवर नेतात की आजही त्यांचे चरित्र, त्यांचे वाङ्मय, त्यांच्या स्पर्शाने पावन झालेली भूमी आजही हजारो लोकांना आदर्शभूत, प्रेरणादायी तसेच अमूल्य तत्वांची ओळख करून देणारे त्यांचे विचार नवसंजीवनी देणारे असतात.

संतांच्या महानतेचे, महिम्याचे वर्णन अनेक संतांनी केलेले आहे, पण समर्थांनी केलेले संतवर्णन अलौकिक, अप्रतिम असेच आहे. वरील अभंगामध्ये संतांच्या स्वरूपस्थितीचे, त्यांच्या अधिकाराचे, त्यांच्या संगतीमुळे होणाऱ्या लाभाचे वर्णन सुरसपणे श्री समर्थांनी केले आहे, त्याचेच वर्णन श्री समर्थ कृपेने करूया.

**सन्मार्ग वर्तिनः सन्तः तद्‌रूपेन।**
**विद्या विनय वृद्धये स एव वर्तत इति संतः ।।**
शंकराचार्य ।।

संत या शब्दाचा मूळ अर्थ सद्‌वस्तू असा आहे, तीनही काळी ज्याच्या स्वरूपात बदल होत नाही, जिचा अभाव कोणत्याही काळी सिद्ध होत नाही अशी जी वस्तू तिला संत असे म्हणतात, प्रत्यक्ष ईश्वरस्वरूप असणारे, सन्मार्गाने वर्तन करणारे आणि विद्या व विनय यामध्ये परिपक्व दशा गाठलेल्या, जगाच्या कल्याणासाठी अवतीर्ण झालेल्या संतांच्या ठिकाणी जीवाला समाधानाची प्राप्ती होत असते. प्रपंचामध्ये प्रत्येक जीवास समाधान हवे असते, पण कितीही मिळाले तरी समाधान होणे शक्य होत नाही. विचार केला असता संतांनी समाधानाचे दोन मार्ग सांगितले आहेत.

एक नामस्मरण व दुसरे संताच्या भेटीत आहे. तुका म्हणे मना होय समाधान। देखिलया चरण वैष्णवांचे ।।

**उदये सविता रक्तः रक्त चास्तमये तथा।**
**संपतौ च विपत्तौ च महतामेकरूपता ।।**

सूर्य उगवताना लाल दिसतो. आणि मावळताना पण लालच दिसतो. तद्वत संत-सज्जन संपत्ती विपत्तीमध्ये समानता ठेवतात. 'सारिखेची सदा संत समाधानी.'

समाधान ही मनाची स्थिती आहे. पाऊस जरी नाही पडला तरी सागर संतुष्ट असतो. भरपूर पडला तरीपण संतुष्ट राहतो. तद्वत सुख-दुःखाच्या वेळी महात्मे समाधानी राहतात.

**सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः**
**मय्यर्पित मनोबुद्धि यो मे भक्तः समे प्रियः ।।**

अशा संत सज्जनांची संगत अखंड घडावी अशी समर्थांनी इच्छा व्यक्त केली आहे अनुभवी, सत्य वक्ते, निरपेक्ष दयाशील असणारे संत मनुष्य जीवाचे खरे जिवलग आहेत. आपल्याला जिवलग या शब्दाचा जो अर्थ अभिप्रेत आहे तो अर्थ आणि संतांना अभिप्रेत असलेला अर्थ खूप भिन्न आहे.

आपल्या भोवती असणारे जिवलग आपले ऐहिक कल्याण करू शकतात, प्रापंचिक सगळ्या इच्छा पूर्ण करू शकतात पण आपल्या कल्याणाचा, आत्मोद्धाराचा, भगवंताच्या चरणाजवळ नेण्याचा मार्ग दाखवू शकत नाही. संत मात्र जिवाचे खरे जिवलग असल्यामुळे जिवाचे कल्याण करू शकतात ही शक्ती संताच्या ठिकाणी असते. म्हणून अशा संतांचा संग सुखाचा, आनंददायी असतो. कारण संत हे सच्चिदानंद स्वरूप आहेत. अशा संतांची संगत काय करते. 'सज्जनांचा संग पापाते संव्हारी'

संतांची संगत माणसासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जिवाला आत्मज्ञानाची प्राप्ती व शाश्वत स्वरूपाची ओळख करून देण्याचे कार्य संत करतात. जीवाची ऐहिक व परलौकिक पापे संतांच्या संगतीमध्ये विलयास जातात. 'पाप ताप दैन्य जायी उठाउठी। जाहलीया भेटी हरिदासांची ।।' ही संतांची अनुभूती आहे. म्हणून समर्थ रामदास जीवाला संतसंगतीची कास धरण्यास सांगतात. सर्व गोष्टी प्राप्त होऊ शकतात. संतांची संगत संतांची सेवा ह्या गोष्टी मात्र दुर्लभ आहेत. जगात ईश्वराचे दर्शन दुर्लभ नाही, पण भगवंताच्या भक्ताचे दर्शन मात्र दुर्लभ आहे. संतांच्या कृपेने काय होते ते समर्थांच्या अभंगामध्ये पाहूया आणि या लेखाला पूर्णविराम देऊया.

**पावलो गति संतसंगति।**
**सांगणे किती सदा प्रचिती**
**भ्रांति हरली शांति थारली।**
**खेप वारिली जन्म तो नसे**
**वियोग तुटला राम भेटला।**
**भवाब्धि आटला सुख विलसे**
**जीवनमुक्त रे ऐक्य भक्त रे।**
**रामदास रे भिन्न तो नसे ।।**
**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

---



## काव्यांजली

# श्रीराम जन्म


साधुरक्षणा, दैत्य वधाया, कौसल्या उदरी
जन्मले राम धनुर्धारी ।।ध्रृ ।।
चैत्र शुद्ध नवमीसी भास्कर माध्यान्ही आला
कौसल्येसी नयनमनोहर राजस सुत झाला
शोभिवंत मुख, आजानुबाहू, मूर्ती गोजिरी ।।१
वार्ता कळता दशरथराजा, नावरेच हर्ष
धावत येऊन पहात राही अपुल्या पुत्रास
जातक केले, मधुबिंदूही घाली मुखाभीतरी ।।२ ।।
सुमित्रेसही एक, कैकयीराणीसी दोन
पुत्र जाहले, जाई तेथे अजराजनंदन
आनंदाला सीमा नाही, स्मरण प्रभूचे करी ।।३ ।।
महोत्साह करी इंदुमतिसुत आनंदे-गजरे
तेरावे दिनी नाम ठेविले चौघासी सत्वरे
राम-लक्ष्मण-भरत-शत्रुघ्न ऐसे सुत चारी ।।४ ।।
वात्सल्यासी येई भरते, मनी हर्ष दाटे
बाळांच्या पाहोनी लीला, बहुत धन्य वाटे
शुक्लेंदुसम वाढती, न्हाली आनंदे नगरी ।।५ ।।

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

**श्री. सुभाष शं. सरदेशमुख,**
मो. ९४२०४८५५६३

दासबोध-सानुल्यांसाठी

# समर्थचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे ?



सौ. अनुजा सोमण सातारा, मो. ९४२३३२४३३३

**आपल्या कुटुंबातील लहान मुलांना हे सदर वाचायवास द्यावे. या सदरातील गोष्टीचे तात्पर्य त्यांना जसे समजले तसे स्वहस्ताक्षरात लिहून पाठविणाऱ्या बालवाचकांची नावे मासिकात प्रसिध्द केली जातील.**

श्री रामदासांचा एक मधुकर नावाचा शिष्य होता. सद्गुरू आज्ञेनुसार तो माधुकरी मागण्यास गेला होता. वाटेत एका ज्योतिषाचे घर लागले. लहानगा मधुकर घरासमोर उभा राहिला.

'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे ?' असा श्लोक म्हणून 'ॐ भवति भिक्षांदेही' असे म्हणाला. ज्योतिषी माधुकरी वाढण्यास बाहेर आला. त्याने मधुकरास पाहिले अन् बसण्यास सांगितले. प्रथम माधुकरी वाढली. त्याचे नाव-गाव, इतर सर्व चौकशी केली. ज्योतिषी गणित मांडले अन् मधुकरला स्पष्टपणे सांगून टाकले ''अरे मुला, उद्या दुपारी तू मरणार आहेस.'' लहानगा मधुकर पुरता घाबरून गेला. माधुकरी घेऊन कसा बसा परतला खरा, परंतु तो तापानी फणफणत होता. रडवेल्या मधुकरने, झालेला सारा प्रसंग श्रीसमर्थ रामदासांना सांगितला. रामदास स्वामींनी मधुकरला धीर दिला.

ठरल्याप्रमाणे, दुपारी यमदूत मधुकरला नेण्यास आले. तेव्हा समर्थांनी निद्रेचे सोंग घेतले. अंगावर घोंगडी पांघरली. त्या घोंगडीचे एक टोक, मधुकरच्या हातात दिले अन् त्याला बजावले काहीही झाले तरी, त्या घोंगडीचे टोक हातून सुटता कामा नये.' लहानग्या मधुकरने घोंगडीचे टोक घट्ट धरून ठेवले. श्री समर्थ रामदास स्वामींच्या योगसामर्थ्यामुळे यमदूताचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. प्रत्यक्ष यमाचेही काही चालेना. अखेरीस देव तारी त्याला कोण मारी ?'

मृत्युचे पाश घोंगडीपर्यंत जाऊन, माघारी फिरत. मृत्यूसमय टळून गेला. हताश यमदूताला माघारी फिरावे लागले. काही दिवसात मधुकर पुन्हा ठणठणीत झाला. अन् त्याच ज्योतिष्याचा दारी उभा राहून म्हणू लागला 'समर्थचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे ?' ज्योतिषाच्या स्वतःच्याच कानावर विश्वास बसेना. तो धावत बाहेर आला. पाहतो तर काय, मधुकर दारात उभा. तो मटकन खालीच बसला. 'माझे भविष्य खोटे कोणी ठरवले ? असे विचारू लागला. छोट्याशा मधुकरने घडलेली हकिकत सांगितली. ज्योतिषाने श्री समर्थ रामदास स्वामींचे पाय धरले.

श्रीस्वामी समर्थांनी उपदेश केला,'आपल्या ज्ञानाचा उपयोग लोक कल्याणासाठी करा. कधी कुणास मरणकाळ सांगून घाबरवू नका. ''रामनामाचा जप करा.''

बालमित्रांनो, अशीच एक कृष्णावतारात कथा आहे. महाभक्त प्रल्हादाची. तो लहानपणापासून सतत 'नारायण नारायण' असा जप करी. त्याच्या भक्तीला कंटाळून, त्याच्या वडिलांनी त्याला अनंत यातना केल्या. मोठ्या मोठ्या शिक्षा दिल्या. तरी पुन्हा प्रल्हाद 'नारायण नारायण' म्हणण्यात रममाण. अखेरीस चिडून त्याच्या पित्याने त्यास विचारले ''काय रे, तुझा नेमका देव आहे तरी कशात?'' छोट्याशा प्रल्हादाने तो सर्वत्र, सर्ववेळी, सगळीकडे आहे' असे उत्तर दिले. आता अशा उत्तराने तर दुष्ट राजाला आणखीनच संताप आला. त्याने रागावून विचारले ''काय रे ह्या खांबात आहे का तुझा देव ?'' प्रल्हादाने आनंदाने ''हो'' म्हटले. अन् क्षणार्धात त्या खांबावर प्रहार पडले. क्रोधाविष्ट पित्याने खांबातील देवावर वार करण्याचे प्रयत्न केले. पण त्या सर्वांवर विजय प्राप्त केलेल्या दुष्ट पित्यास, देवाने उंबऱ्यावर बसून ठार केले.

अन् भक्त प्रल्हादास आशिर्वाद दिले.

**महाभक्त प्रल्हाद ह्या कष्टवीला।**
**म्हणोनी तयाकारणे सिंह जाला ।।**
**न ये ज्वाळ वीशाळ संनीध कोणी ।।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२१ ।।**

बालमित्रांनो वरील गोष्टीतील महाभक्त प्रल्हादाच्या पित्याचे अन् त्याचा वध करणाऱ्या कृष्णरूपाचे नाव कळवा.

वरील गोष्टीत केलेला समर्थ उपदेश स्व अक्षरात लिहून काढा व आपण कमवणाऱ्या ज्ञानाचा उपयोग लोककल्याणासाठी कसा करणार याचा आताच विचार करा. तर मग चला, लागा कामाला!

आपल्या ह्या सत्कार्यासाठी सदिच्छा व्यक्त करणारी आपली ताई.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

**पान ३६ वरून...**

**अभिमानें उठे मत्सर। मत्सरें ये तिरस्कार।**
**पुढें क्रोधाचा विकार। प्रबळें बळें ।।**

अहंकारामुळे मैत्रीचा नाश होतो. मित्राच्या सद्‌गुणांबद्दल आपल्या मनात आनंद असावा. 'परदुःखे दुखवावे। परसंतोषे सुखी व्हावे' अशी वृत्ती असेल तरच अभिमान गळून पडेल.

अशा विविध सद्‌गुणांच्य, स्वभाव वैशिष्ट्यांचे रसायन एकत्र आले की 'मैत्री' होते. टिकते. प्रगल्भ होते. दोन मनांचा संगम होतो. अशी मैत्री परस्परांना आनंद देणारी ठरते.

सर्वांना अशा मैत्रीचा अनुभव जीवनात यावा, यासाठी आपले परममित्र संत श्रीसमर्थांनी केलेले मार्गदर्शन खरंच अनमोल आहे. होय ना ?

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**


# श्री रामदास स्वामी संस्थान

**श्री रामदास स्वामींचा मठ, मु.पो. सज्जनगड, ता.जि. सातारा. फोन ०२१६२-२७८२२१, मो. ९४२३०३४११६**

## श्री समर्थ सेवेचे प्रकार

| | |
|---|---|
| १. ऐतिहासिक वास्तू संरक्षण निधी | रु. १०,००१/- |
| २. दरवर्षी एक दिवस अन्नदान निधी | रु. ६,००१/- |
| ३. लहान मुलांसाठी संस्कार केंद्र निधी | रु. ५,००१/- |
| ४. श्री दासनवमी महापूजा | रु. ३,५०१/- |
| ५. पाच पंचामृती पूजा -कायमनिधी | रु. ३,००१/- |
| ६. गुरुपौर्णिमा महापूजा | रु. २,५०१/- |
| ७. नैमित्तिक धार्मिक निधी | रु. २,००१/- |
| ८. एक दिवसाचे अन्नदान | रु. १,५०१/- |
| ९. पिण्याचे पाणी पुवरठा योजना | रु. ५०१/- |
| १०. नंदादीप कायम निधी | रु. १,५०१/- |
| अगर मासिक | रु. १५१/- |
| ११. गोपालन निधी | रु. २५१/- |
| १२. समर्थ समाधीस अभिषेक | रु. ५१/- |
| १३. गडावरील जुन्या वास्तूंचा जिर्णोध्दार | ऐच्छिक |
| १४. वैदिक पाठशाळा देणगी (प्रत्येक विद्यार्थ्याचा एक वर्षासाठी सर्व खर्च) | रु. १२,०००/- |
| १५. प्रकाशन विभाग | रु. १,००१/- |
| १६. 'रघुवीर समर्थ' मासिक वर्गणी | |
| १ वर्ष - | रु. १५०/- |
| ५ वर्षे - | रु. ५००/- |
| १० वर्षे - | रु. १०००/- |

देणगी प्रकारच्या माहितीसाठी संस्थानच्या सज्जनगडावरील अथवा संपर्क कार्यालयांशी संपर्क साधावा. वरीलपैकी कोणत्याही एका अगर अधिक सेवांमध्ये सहभागी होऊन श्रीसमर्थ सेवेचा लाभ घ्यावा ही विनंती.

# जुना दासबोध-आत्मनिवेदन (लेखांक दहावा)

**सौ. मंजिरी श. धूपकर, पुणे.** मो. ९९२३०४५५५४

**तिहीं प्रकारें आपण । नाहीं नाहीं दुजेपण ।**
**आपण नस्तां मीपण । नाहींच कोठें ।।**

भक्तीची परमावधी म्हणजे आत्मनिवेदन. भक्तीची आस एवढी मोठी; देवाला पाहात असताना आपणच देव होणें. हा श्रेष्ठ अनुभव उमजतेपणीं घ्यायचा आहे. ह्याचे मार्गदर्शन श्रीसमर्थ ह्या समासात करतात. हा समास महत्त्वाचा आहे. पराकोटीचा अनुभव आणि आनंद देणारा आहे. म्हणूनच वीस दशकी ग्रंथराज दासबोधामध्येहि श्रीसमर्थांनी हा समाविष्ट केला आहे. (दासबोध दशक १२, समास ५) . ह्या समासाची ओवी संख्या कमी (२२) आहे. तरीहि त्यांतील उपदेश मात्र महत्तम आहे.

'सगुणध्यान' समासात मुख्य देव एकच असल्याचे श्रीसमर्थांनी सांगितले आहे.

**'असो हरि मिळोनि हर। कीं तो सिंधुजेचा वर।**
**हे मुख्य देव इतर। अंश यांचे ।। ७.६**

ह्या मुख्य देवापासून दहा अवतार झाले. पुढे ज्याने त्याने आपापला एक किंवा अनेक देव मानले. म्हणून सध्या देवांची मोठीच संख्या आहे. हे सगळे स्पष्ट करण्यासाठी श्रीसमर्थांनी 'आत्मनिवेदन' समासात सर्वांना परिचित आणि वादातीत उदाहरण दिले आहे. एकूण सर्व ज्ञानाची कवाडे ही अक्षरातून व्यक्त होतात. हे अक्षर कसे तयार होते आणि त्याची रचना कशी होते; हे समासाच्या पहिल्या नऊ ओव्यांमधून सांगितले आहे.

रेषांना काही संकल्पित आकार देऊन त्याची अक्षरे तयार केली. अकार, उकार आणि मकार ह्या तीन पूर्ण मात्रा व त्यावरील चंद्र आणि चंद्रात अनुस्वार ही अर्धमात्रा अशा ह्या साडेतीन मात्रा होतात तो ओंकार. ह्या मूळ एका ओंकारातून सोळा स्वर आणि छत्तीस व्यंजने अशी एकूण बावन्न अक्षरे निर्माण होतात. ह्या अक्षरांपासून शब्द तयार होतात. शब्दांपासून वाक्ये आणि वाक्यांच्या शब्दरचनेच्या पद्धतीने श्लोक, गद्य, प्रबंध तयार होतात. ओंकार हा मूळ ध्वनीहि आहे. ह्यापासून शब्द, भाषा, साहित्य, संगीत तयार होतात. ह्या सर्वांमधून नादरूप आणि ध्वनीरूप विश्व व्यापून आहे. ह्या सर्वांचा विचार करणे म्हणजे विश्वविचार आहे.

**वेदशास्त्रें पुराणें। नाना काव्यें निरूपणें।**
**ग्रंथभेद अनुवादणें। किती म्हणोनि ।। १२.५.२**

विचारांचे व्यक्त- अव्यक्त साधन शब्दच आहे. विविध विचार मनात निर्माण होण्यासाठी, बुद्धीने विचार करण्यासाठी, आणि विचारांच्या अभिव्यक्तीसाठी शब्दच काम करतात. ऋषींनी आपली मतें शब्दात मांडली म्हणून विपुल ग्रंथ निर्मिति झाली. ऋग्वेदातील अध्याय, उप-अध्याय, ऋचा, श्रृती, स्मृती, अध्याय, सर्ग, स्तबक काव्यप्रकार, प्रसंग, मानें म्हणजे संगीत पद्धती, समास, पोथी, अनेक पदें, श्लोक, हिंदी काव्यातील छंद- बीर, कडक, साख्या, दोहे, डफ गाणे, माची गाणे, दंडी गाणे, कथा गाणे, अनेक मनोरंजक कथा, अनेक संगीताविष्कार, अनेक खेळ, हे सर्व अक्षरे व त्यांच्या शब्दांपासून तयार होतात. भाषेमध्ये चार प्रकार येतात. ध्वनी, घोष, नाद आणि रेखा. वाणीमध्येहि चार रूपे आणि प्रकार आहेत. पहिली परा वाणी. ही वायुरूप जाणिवेचे स्फुरण असते. दुसरी पश्यन्ती. ही ध्वनीरूप आहे. तिसरी मध्यमा. ही नादरूप आहे आणि चौथी वैखरी. ही शब्दरूप आहे. वैखरीने शब्दांचा व्यक्त आविष्कार होतो. ह्या शब्दाविष्कारातून संगीतातले अनेकविध राग, त्यातील ताना, ताल ह्यांचे ज्ञान, नृत्यप्रकारांचे ज्ञान होते. हे ज्ञान मानवी जीवन व्यापून टाकणारे, किंबहुना ज्याच्याशिवाय

मानवी जीवन केवळ अशक्यच आहे; असे आहे. म्हणून त्यांचे माध्यम शब्द महत्त्वाचे आहेत. शब्द ही ओम्‌ची निर्मिती असून हे सारे विश्व एका ओम्‌मध्ये विस्तार पावते.

**उन्मेष, परा, ध्वनी पश्यन्ती। नाद मध्यमा शब्द चौथी।**
**वैखरी पासून उमटती। नाना शब्दरत्नें।। १२.५.८**

पुढील पाच ओव्यांमध्ये शुद्ध ब्रह्म हे सर्व तत्त्वांहून वेगळे आहे असे श्रीसमर्थ सांगतात. शुद्ध सत्त्व हे सर्व तत्त्वांमध्ये मुख्य असून त्यालाच अर्ध मात्रा, महत्तत्व किंवा मूळमाया म्हणतात. विविध लहानमोठी तत्त्वे मिसळून पिंड ब्रह्मांडाची – पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ही पंचभूते, आणि सत्त्व, रज, तम हे तीन गुण मिळून अष्टधा प्रकृति बनते. ह्या अष्टधा प्रकृतीतला चंचळ वायू नाहीसा होतो. म्हणजे त्यातले चैतन्य संपते तेव्हा आकाशाचे जसे वाऱ्याशिवाय अस्तित्व होते; तसेच अष्टदेहाचे निरसन झाल्यावर केवळ दाट असे परब्रह्म उरते. त्याचा अनुभव घ्यावा असे श्रीसमर्थ सांगतात. म्हणजेच पिंडब्रह्मांडाची उभारणी आणि संहारणी ह्याहून वेगळे असलेले विमलब्रह्म अनुभवावे.

**ब्रह्मांडपिंडउभार। पिंडब्रह्मांडसंहार।**
**दोहिं वेगळे सारासार। विमळब्रह्म ।।१२.५.१४.**

पंचभूते दृश्य आहेत. ती जड पदार्थ आहेत. जे निर्माण होते त्याला लय निश्चित असतो. म्हणून पंचभूते नष्ट होणारी आहेत. अंतरात्मा चंचळ आहे. ह्या दोन्हींच्या पलिकडे असलेले विमलब्रह्म निश्चळ आहे. जड पदार्थ, चंचळ अंतरात्मा आणि निश्चळ परब्रह्म ह्यांचा सखोल विचार करीत राहिल्यास जड आणि चंचळ विरून जातात आणि विवेकी, निश्चळ परब्रह्माशी तादात्म्य पावतात.

पुढील सर्व ओव्यांमधून श्रीसमर्थ आत्मनिवेदन वर्णन करतात. आत्मनिवेदन तीन प्रकारचे आहे. जे जे म्हणून माझे आहे; तन, मन, धन अगदी मी, माझा प्रपंचसुद्धा ह्यांचा जणू मी केवळ विश्वस्त आहे. ह्यांचा मालक देव आहे ह्या श्रद्धेने जगणे म्हणजे जड आत्मनिवेदन. अंतरात्म्याच्या सत्तेपुढे अहंपणाला काही वाव नाही असे श्रीसमर्थ सांगतात.

**चंचळ कर्ता तो जगदीश। प्राणीमात्र त्याचा अंश।**
**त्याचा तोचि आपणांस। ठाव नाहीं ।। १२.५.१७**

प्रत्येक गोष्टीतला कर्ता हा चंचळ अंतरात्मा आहे. बाकी त्याचे अंश आहेत. म्हणून कर्ता देव आहे; आपण काहीच नाही; अशी निष्ठा ठेवणे हे चंचळ आत्मनिवेदन आहे. चंचळ हे स्वप्नासारखे असते. म्हणून ते नाशवंत असते. मुळात काही नाहीच. पण परमात्मा शाश्वत, निश्चळ, निराकार आहे. त्याच्याशी तद्रूप होणे हे निश्चळ आत्मनिवेदन आहे. चंचळाला मुळातच स्थान नाही. मग चंचळाच्या आधाराने मानला जाणारा मी, हाहि खरा नाही. खरे आहे ते फक्त निश्चळ परब्रह्म; असा अनुभव घेणे म्हणजे निश्चळ आत्मनिवेदन होय. 'मी'पणाचा लोप होऊन केवळ आत्मस्वरूप अनुभवणे हे तीनहि आत्मनिवेदनाचे वर्म आहे.

जे शाश्वत आहे ते परब्रह्म. त्याच्याशी तद्रूप होण्यासाठी आत्मनिवेदनाचा इतका सूक्ष्म आणि सखोल विचार करताना आत्मनिवेदनाचा अनुभव मिळतो. तेव्हा शब्द, मनन, चिंतन काही शिल्लकच राहत नाही. अनुभवाला येते ती फक्त शांतता. शांततेच्या ह्या अनुभवासाठी सूक्ष्म विवेक महत्त्वाचा आहे. हा अनुभव श्रीसमर्थ सांगतात तेव्हा शिष्याला शांततेचा अपूर्व अनुभव येतो.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

**सुजन वाक्य**

अनाचारेण मालिन्यं अत्याचारेण मूर्खता।
विचाराचारयोर्योगः स सदाचार उच्यते।।

▶ *कुकृत्य केल्यामुळे चारित्र्याला बट्टा लागतो. उतावीळपणाने मूर्खपणा पदरात पडतो. म्हणून विचारपूर्वक कृत्य केल्यास त्याला सदाचरण म्हणतात.*

# नमस्कार माझा सद्गुरू रामदासा (७)

**सौ. संध्या अशोक कोल्हटकर, कोथरुड, पुणे.** मो. ९८५००४३२७३

**जये अर्जुनासारखे सख्य केले।**
**मुळींहुनीया द्वैत निःशेष केले।**
**सितानायकू दृढ केला कुवासा।**
**नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ।।७।।**

भागवतातील कथा संदर्भ आणि नवविधाभक्ती यांचा सुंदर समन्वय घातलेल्या या सद्गुरू स्तवनामध्ये परिक्षितासारखी श्रवणभक्ती, नारदासारखी कीर्तनभक्ती, प्रल्हादासारखी स्मरणभक्ती, लक्ष्मीसारखी पादसेवनभक्ती, पृथूसारखी अर्चन भक्ती, अक्रुरासारखी वंदनभक्ती, मारुतीची दास्यभक्ती आतापर्यंत पाहिली. या श्लोकात अर्जुनाची सख्य भक्ती सांगितली आहे समर्थ म्हणतात-

**देवासी परमसौख्य करावे। प्रेमप्रीतीने बांधावे।**
**आठवे भक्तीचे जाणावे। लक्षण ऐसे ।।४-८-२।।**दासबोध।।

देवासी सौख्य करावे ते सुद्धा 'परम' म्हणजे श्रेष्ठ, निःस्वार्थ, निरपेक्ष बुद्धीने करावे 'परम' हा शब्द नारदीय भक्तिसूत्रांत भक्तीसाठी वापरला आहे.

**सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा ।। ना.भ.सू.२ ।।**

इथे ''परम प्रेमरूपा'' या शब्दाने कामुक व सकाम प्रेमापलीकडील अर्थ निर्देशित केला आहे. प्रेम हा शब्द व्यवहारात सोपाधिक आहे. आणि तो मनुष्याला क्षणिक सुखाचा आनंद देतो. नारदमहर्षींनी मात्र ''परमप्रेम'' हे अत्युच्च कोटींचे, अतिउत्तम, अनन्यसाधारण असे म्हटले आहे.ते आपल्याला निरंतन आनंद देते. तशीच श्रेष्ठ सख्यभक्ती समर्थांना अपेक्षित आहे.

अर्जुनाचे सख्यत्व असेच होते. खरं तर भगवान श्रीकृष्ण, अर्जुनाचा सखा,मित्र, मेहुणा, सारथी, पांडवांचा दूत आणि गुरू अशा अनेक नात्यांनी बांधलेला होता. पण तो अर्जुनाचा व अर्जुन भगवंताचा प्राण होते. म्हणून त्यांच्या सख्यत्वाला विशेषत्व प्राप्त झाले होते. सख्य म्हणजे मैत्री करणे. अर्जुनाने श्रीकृष्णाबरोबर सख्यभक्तीने नाते जोडले होते. व्यवहारात जास्त जवळीक निर्माण झाली की मैत्री वाढण्याऐवजी त्या व्यक्तीचे महत्त्व कमी होते. परंतु भक्त परमेश्वराशी जेव्हा सख्य करतो, तेव्हा भक्ताला परमेश्वराविषयी पूर्णपणे आदर श्रद्धा व निष्ठा असते. त्यामुळे भगवंताचे गुरुमहात्म्य भक्त विसरत नाही. म्हणूनच अर्जुनाने आपल्या रथाचीच दोरी भगवंताच्या हातात दिली होती असे नव्हे, तर स्वतःची पूर्ण सूत्रेच भगवंताच्या हवाली केली होती. जगाचे कल्याण करण्यासाठी, भक्तांवर कृपा करण्यासाठी, भगवंत नर-नारायण स्वरूपात जन्म घेतात. द्वापारयुगात अर्जुन व श्रीकृष्ण यांनी नर-नारायण स्वरूपांत जन्म घेतला होता. वीरता, स्फूर्ती, तेज, ओज, धैर्य, शस्त्र वापरण्याची कला, अस्त्रज्ञान यात अर्जुनाचा हात धरणारा कुणी नव्हता. दृढ प्रतिज्ञेसाठी अर्जुन प्रसिद्ध आहेच. जयद्रथाला मारण्याचेवेळी सूर्यास्त होत होता, अर्जुनाने अग्निकाष्ठ भक्षण करण्याची प्रतिज्ञा केली होती व ती पूर्ण करण्यासाठी तो सज्जही झाला होता; परंतु भगवंताने सूर्यावरील सुदर्शनचक्र बाजूला करून त्याला वाचविले होते. भगवंत आपल्या भक्तीसाठी वेळोवेळी धावून येतो हेच खरे !

स्त्रियांवरून बरेचवेळा कलह निर्माण होतो, युद्ध होतात असे इतिहास आपल्याला सांगतो. द्रौपदीवरून या पाच पांडवांमध्ये वितुष्ट येऊ नये म्हणून देवर्षी नारदांच्या सांगण्यावरून पांडवांना काही नियम ठरविले होते. ते पाचही पांडव पाळत असत. एकदा एक ब्राह्मण आपल्या गाई ''वाचविण्याची'' याचना करण्यासाठी अर्जुनाकडे आला. ब्राह्मणांच्या गाई वाचविणे हा राजधर्म होता तर युधिष्ठिर व द्रौपदी एकांतात असताना तिथे जाऊन शस्त्रागारांतून

शस्त्र काढणे म्हणजे ठरवून दिलेले नियम मोडणे होते. पण राजधर्म पाळणे जास्त महत्त्वाचे होते. म्हणून अर्जुनाने शस्त्रागारातून शस्त्रे घेऊन ब्राह्मणांच्या गाईंचे संरक्षण केले व नारदांनी ठरविलेल्या नियमाप्रमाणे धर्मपालन म्हणून १२ वर्षे तीर्थयात्रा केली. त्यावेळी युधिष्ठिर व द्रौपदीने अर्जुनाला खूप समजावले. ‘‘तीर्थयात्रेला जाण्याची गरज नाही. तू लहान आहेस मी तुला पित्यासमान आहे. तेव्हा प्रायश्चित्त घेऊ नकोस असे सांगितले.’’ पण अर्जुन विचलित झाला नाही. कारण तो धर्मनिष्ठ होता.

एकदा अर्जुन इंद्राबरोबर सिंहासनावर बसून देवसभेमध्ये अप्सरांचे नर्तन पहात होता. त्याची दृष्टी सतत उर्वशीवर होती हे इंद्राच्या लक्षात आले. उर्वशीसुद्धा अर्जुनाच्या पराक्रमावर, रूपावर मोहित झाली होती. इंद्राने चित्रसेन गंधर्वामार्फत उर्वशीला अर्जुनाकडे रात्री जायला सांगितले. उर्वशीसुद्धा आनंदाने तयार झाली व अर्जुनाकडे गेली. पण अर्जुनाने उर्वशीला ‘‘माते’’ अशी हाक मारली व म्हणाला,‘‘तू पुरूवंशातील राजा पुरूरवाची पत्नी आहेस. आमच्या वंशातील आहेस म्हणून मी तुला पाहात होतो आणि मनातल्या मनांत नमस्कार करत होतो. कारण कुंती माद्री जशी आहे तशीच तू आहेस, इंद्राची ‘‘समजण्यामध्ये’’ चूक झाली असावी. माते मी तुला प्रणाम करतो.’’ अर्जुनाचा इंद्रियसंयम अलौकिक होता.

अर्जुनाच्या इतर सद्‌गुणांबरोबर शरणागतता, इंद्रियसंयम, धर्माचरण हे गुण भगवंतांना जास्त आवडतात. म्हणून पांचही पांडवामध्ये अर्जुन भगवान श्रीकृष्णांचा लाडका होता. महाभारतात युद्धाचे वेळी युद्धांत आपल्या बाजूने होण्यासाठी दुर्योधन कृष्णाला आमंत्रण द्यायला गेला होता त्यावेळी श्रीकृष्ण शयनगृहात झोपले होते. दुर्योधन त्यांच्या उशाशी बसला नंतर अर्जुनही श्रीकृष्णाकडे गेला. तो त्याच्या पायाशी बसला कारण तो श्रीकृष्णाच्या चरणाशी अनन्य होता. हेच यावरून लक्षात येते. श्रीकृष्ण म्हणतात,‘‘मी अर्जुनाला प्रथम पाहिले त्यामुळे तो प्रथम मागेल.’’ यावर दुर्योधन खरं तर खूप चिडला. श्रीकृष्ण म्हणाले,‘‘एका बाजूला माझी संपूर्ण सशस्त्र वीर नारायणी सेना व दुसऱ्या बाजूला मी निःशस्त्र एकटा! मी शस्त्र उचलणार नाही आता सांग काय पाहिजे ?’’ यावर अर्जुनाने श्रीकृष्णाला मागितले. दुर्योधनाला खूप आनंद झाला. निःशस्त्र श्रीकृष्णाचा काय उपयोग? त्या ऐवजी त्याला पूर्ण नारायणी सेना मिळाली होती. दुर्योधन गेल्यावर श्रीकृष्णाने अर्जुनाला विचारले,‘‘नारायणी सेना नाकारून तू मलाच का मागितले ?’’ अर्जुन सांगतो, ‘‘तुझ्याशिवाय मला तिन्ही लोकांचे राज्य दिले तरी ते मला नको. मला फक्त भगवान श्रीकृष्णच हवेत.’’ कारण श्रीकृष्णावर त्यांची नितांत श्रद्धा होती. त्याचा हाच विनय व श्रद्धा श्रीकृष्णाला आवडते. समर्थ म्हणतात ‘देवाच्या सख्यत्वासाठी पडाव्या जिवलगांच्या तुटी।’’ त्याचे हेच वर्म आहे.

अर्जुनाला युद्धाच्यावेळी कुरुक्षेत्रावर आपल्याच सगेसोयरे, पितामह, गुरू, आचार्य यांच्या विरुद्ध शस्त्र घेऊन लढायचे, त्यांचा नाश करायचा व राज्य मिळवायचे ह्या गोष्टीबद्दल वाईट वाटत होते. मोठ्या मोठ्या युद्धांत शत्रूला पाणी पाजणारा अर्जुन आता मात्र हतबल झाला होता. स्वधर्मापासून परावृत्त होत होता. त्याला विषाद झाला होता. अर्जुनाचा विषाद भीतिजन्य नसून करुणाजन्य होता. त्यांत स्वार्थ नव्हता म्हणूनच अर्जुनाच्या विषादापासून ‘‘विषादयोग’’ निर्माण झाला व गीतारूपी तत्त्वज्ञान निर्माण झाले. भगवंतानी अर्जुनाला ‘‘गीता’’ सांगितली. ज्ञानाचा उपदेश केला. विश्वरूपदर्शन दिले व त्याच्यातील द्वैतभावनेचे निरसन केले. सहस्रकोटी सूर्य प्रकटावेत असे प्रकाशमय तेजोमय परमात्मस्वरूपाचे विराट दर्शन अर्जुनाला झाले. अनंत रूपे, अनंत मुखे, अनंत हात असे पाहताना ‘‘अनंत रूपे अनंत वेशे देखिले म्यां त्यासी’’ अशी अर्जुनाची अवस्था झाली होती. या अक्षर तत्त्वातूनच त्याला चराचराची उत्पत्ती स्थिती लय सुद्धा, दिसत होता हे अक्षरत्व प्राणशक्ती चैतन्यशक्ती असलेले स्पंदनात्मक आहे. ज्ञानयुक्त आहे. कारण ते ‘ज्ञ’ आहे. ते क्रियाशक्तीने युक्त आहे. अनंत आहे. ‘भूमा’ आहे. ह्याची जाणीव अर्जुनाला झाली. त्याच्या करालदाढांमार्फत

होणारा विध्वंस त्याने पाहिला. हे सर्वरूप पाहून 'मी'युद्ध करणार नाही म्हणणाऱ्या अर्जुनाचे अहंकाराचे कवच गळून पडले. 'मी'च्या कल्पनेमुळे निर्माण झालेल्या हे मित्र, हे शत्रू, हे बांधव, ह्या कल्पना गळून पडल्या. आपल्या पराक्रमाला कर्तृत्वाला अहंकाराला काहीच अर्थ नाही. कर्ता करविता तोच आहे मी फक्त निमित्तमात्र आहे हे अर्जुनाला समजले ''मी योद्धा आहे. मी त्यांना ठार मारणार आहे'' यातील 'मी' हा केंद्रबिंदू भगवंतात विलीन झाला. भगवंतच सर्व करणारा आहे ही भावना दृढ झाली.

''तोच'' खरा जिवलग आहे. ''जीव'' म्हणून वावरतानाही ''तो'' बरोबर असतो. देहापासून 'जीव' अलग झाला तरीही त्यानंतर तोच बरोबर असतो. यालाच आपण 'आत्मा' म्हणतो. त्यामुळे तो आणि मी वेगळा नाही. मी त्यांचाच अंश आहे. याची जाणीव अर्जुनाला झाली. दास्य भक्तीत ज्येष्ठ कनिष्ठ हा थोडासा भाव राहतोच. पण सख्यभक्तीत भक्त आपले गौणत्व विसरत नसला तरी भगवंत आपले स्वामित्व विसरून भक्तासाठी अहोरात्र श्रम करतो. म्हणूनच अर्जुनाचे केस धुवून द्यायचे, घोड्यांना खरारा करायचा. रथाचे सारथ्य करायचे प्रसंगी अर्जुनाचे प्राण वाचवायचे या सर्वगोष्टी भगवंत करत होते. श्रीकृष्ण अर्जुनाचा सखा होते. यापेक्षा भगवंत अर्जुनाला आपला सखा मानत होते. यांतच अर्जुनाच्या सख्यभक्तीचे रहस्य आहे.

समर्थ म्हणतात,

**''देवाच्या इच्छेने वर्तावे । देव करील ते मानावे ।**
**मग सहज चि स्वभावे । कृपाळु देव ।।**

सख्यभक्तीमध्ये भगवंताची जी इच्छा असते तीच भक्ताची इच्छा असते. म्हणून भक्त भगवंताच्या इच्छेप्रमाणे वागतो. समर्थांना श्रीरामांनी अनुग्रह दिला. त्यावेळी ''सांप्रत पृथ्वी म्लेंच्छमय होऊन धर्माचा उच्छेद झाला आहे. ह्यासाठी शिसोदे वंशामध्ये 'शिव' नामे करून राजा होईल, तो धर्मस्थापना करील, त्यास आपण कृष्णातीरी राहून अनुग्रह देऊन धर्म संस्थापना करावी.'' असे सांगितले होते. देवाच्या इच्छेने वर्तावे हे समर्थांनी पूर्णपणे आचरणांत आणले होते. त्यासाठी त्यांनी समर्थ संप्रदाय सुरू केला. त्यात महंत निर्माण केले. हे महंत निःस्पृह होते. उत्तम प्रचारक होते. त्यांच्यामार्फत समर्थांनी धर्मसंस्थापनेचे कार्य केले. हे महंत राजकारण, समाजकारण, धर्मकारण करता करता समाज प्रबोधन करीत होते. समर्थांची समाज प्रबोधनाची विलक्षण शक्ती आपल्याला त्यांच्या वाङ्मयावरून आजही लक्षांत येते. भारतभर मठांचे जाळे विणून समर्थांनी सावधपणे कार्य केले. ते सुद्धा निःस्वार्थबुद्धीने. श्रीरामाचे कार्य आहे असे समजून केले.

संसारात आपण ज्या ज्या व्यक्तींवर प्रेम करत असतो त्यांचेच चिंतन करतो. त्यांचाच सहवास आपल्याला आवडतो. त्यांचे गुणवर्णन आपण इतरांकडे करत असतो. तो मनुष्यस्वभाव आहे. सख्यभक्तीत भक्त अगदी हेच करत असतो. त्याच्या ध्यानी-मनी सतत भगवंताचे विचार येतात तो भगवंताचेच गुणवर्णन करतो. भगवंताच्याच सहवासांत आनंदी असतो. प्रपंचात तसे करणे मायेच्या अधीन होणे आहे. तर परमार्थात हे परमेश्वराच्या अधीन होणे आहे. मायेच्या अधीन होण्यात सुखदुःख दोन्ही आहे. पण परमेश्वराधीन होण्यात फक्त आनंदच मिळतो. म्हणून सख्यभक्तीतील भक्त सुखदुःखाच्या पलीकडे आनंदातच असतो. लौकिकदृष्ट्या काहीही चांगले वाईट घडले तरी भक्त ती परमेश्वराची इच्छा म्हणून आनंदाने स्वीकारतो. परमेश्वराला हृदयात, मनांत, वृत्तीत ठेवायचे म्हणजे त्याच्याशी सख्य करायचे यात पूर्ण शरणागती आहे. त्यामुळे एकरूपता येते. समर्थ व श्रीराम हे एकरूपच होते. म्हणून ''स्वानुभव दिनकर'' मध्ये दिनकर स्वामी म्हणतात-

**अहो रामचंद्र आणि रामदास**
**हे उपाधियोगे भिन्नता आभास ।**
**परि पाहतां मुळींच्या अभिधानास ।**
**तव ते अखंड अभिन्न ।।१६-२-२० ।।**स्वानुभ दिनकर

भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला अद्वैत ज्ञान दिले. तसेच समर्थांनी समर्थशिष्या वेणाबाईंना अद्वैताचे ज्ञान दिले. ही

कथा बहे बोरगांवची ! उद्धवस्वामी, वेणास्वामी आणि काही शिष्य मंडळी समर्थाबरोबर होती. एकदिवस वेणाबाई कृष्णेवर स्नानास गेल्या. स्नान झाल्यावर स्वतःचे वस्त्र(साडी) धुवून वाळवंटात वाळत टाकले. व ध्यानास बसल्या. ध्यान संपल्यावर उठून पाहतात तो धुवून वाळत टाकलेले वस्त्र कुठे दिसेना! आता काय करायचे अशा मनस्थितीतच त्या मठांत आल्या. त्यांनी पाहिले समर्थांनी त्यांचे वस्त्र रामदासी वस्त्राप्रमाणे गळ्यांत मेखला करून घातले होते. समर्थ आत्मस्वरूपी लीन होते. वेणाबाईंना आश्चर्य वाटले. त्याही सद्गुरूंची लीला पाहण्यासाठी समोर बसल्या. त्यांचेही ध्यान लागले. दोघेही देहबोधावर नव्हते. समर्थांच्या मनाची ती अत्युच्च अवस्था होती. समर्थांनी ११ दिवसांत वेणाबाईंना अद्वैताचे ज्ञान संक्रमित केले. यासंबंधी गिरीधर स्वामी म्हणतात-

**अकरा दिवस एक अंगी मेखला राहे।**
**उद्धव महंत अकरा दिवस वाट पाहे।**

ही सर्व स्थिती उद्धवस्वामींनी जवळून पाहिली होती. त्यांनी समर्थांची पूजा मांडली होती.ते म्हणतात-

**महाराज दे अंगीचे वस्त्र आता।**
**बहुजीर्ण जाली देहबुद्धी कंथा ।।**

श्रीकृष्णाने गोपींचे वस्त्रहरण करून त्यांचा देहभाव नाहीसा केला म्हणून तर त्या कृष्णभक्तीत बुडून गेल्या. वेणाबाई उत्तम कीर्तनकार होत्या. त्यानी हे वस्त्र समर्थ प्रसाद म्हणून सांभाळून ठेवले. आपला देह सोडण्यापूर्वी त्यांनी कीर्तन केले. त्यावेळी त्यांनी हे वस्त्र परिधान केले होते.

आपले बरेचसे देव हे शक्तीसह आहेत. भगवान शंकर पार्वतीसह विष्णू लक्ष्मीसह आहेत. तसेच परब्रह्मस्वरूप श्रीराम आपल्या शक्ती सीतेसह आहेत. हे लक्षात घेऊन उद्धवसूतांनी या रचनेत ''सीतानायकू'' असा श्रीरामाचा उल्लेख केला आहे. समर्थांच्या कार्यामध्येही सीताशक्तीसह परब्रह्म श्रीरामाचे अधिष्ठान होते. 'कुवासा' ह्या शब्दाचा एकनाथी भागवतातील शब्दकोशाप्रमाणे अर्थ ''आधार'' असा आहे. समर्थ करुणाष्टकांत


**मज कोंवसा (रक्षणकर्ता) राम कैवल्य दाता।**
**तयोचेनि हे फिटली सर्व चिंता ।।** असे म्हणतात.

श्रीराम हे समर्थांचे रक्षणकर्ते तर आहेतच व आधारभूत दैवत आहेत. समर्थ कार्य करताना परमेश्वराचे अधिष्ठान पाहिजे असा आग्रह धरतात. ज्यामुळे ते कार्य सत्कार्य होते व योग्य प्रकारे केले जाते असा विश्वास बाळगतात म्हणूनच समर्थ म्हणतात,''तेथे पाहिजे अधिष्ठान भगवंताचे।'' कार्य करण्यासाठी योग्य शक्तीही लागते. म्हणून सीताशक्तीसह श्रीरामाचे अधिष्ठान असलेल्या समर्थांचे धर्मसंस्थापनेचे कार्य, समाजसंघटनेचे कार्य, समाजमन तयार करण्याचे कार्य, स्वराज्य स्थापनेचे कार्य यशस्वी झाले. ही समर्थांची धारणा होती.

अशा तऱ्हेने अर्जुनाप्रमाणे भगवंताशी श्रीरामांशी सख्यभक्ती करणाऱ्या, आराध्य दैवताशी अद्वैतभावाने एकरूप झालेल्या, सीताशक्तीसह श्रीरामाचा ज्यांना आधार आहे अशा श्री समर्थांना माझा नमस्कार असो.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

**सुजन वाक्य**



**यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम्।**
**लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिष्यति ।।**

(पंचतंत्र)

▶ ज्याला स्वतःला काहीच अक्कल नाही त्याला शास्त्राचा काय बरं उपयोग ? ज्याला डोळ्यांनी दिसत नाही, त्याला आरसा काय उपयोगी पडणार ?

## मासिक 'रघुवीर समर्थ' वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| रु. १५० | एक वर्षासाठी |
| रु. ५०० | चार वर्षांसाठी |
| रु. १००० | आठ वर्षांसाठी |

# विविध कार्यक्रम वृत्ते

## समर्थ शिष्य श्री देवदास स्वामी मठ, दादेगाव येथे श्रीरामनवमी महोत्सव संपन्न

श्रीसमर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेले श्रीरामपंचायतन, समर्थ शिष्य आद्य मठपती सद्गुरू देवदास स्वामींची समाधी आणि सुमारे ३५० वर्षांहून अधिक काळाची दिव्य परंपरा असलेला रामदासी मठ म्हणजे श्रीक्षेत्र दादेगाव (ता.आष्टी.जि.बीड)यंदाचा श्रीरामनवमी महोत्सव या मठाच्या पुनर्वैभवप्राप्तीचा संकेत देणारा ठरला.

जयंत्या पर्वे महोत्सव। असंभाव्य चालवी वैभव।जे देखतां स्वर्गीचे देव। तटस्थ होती।।

या समर्थवचनाची आठवण या उत्सवाच्यानिमित्ताने झाली. या वर्षीच्या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सज्जनगडाच्या पद्धतीने सुरू केलेला सकाळ व संध्याकाळचा छबिना. यावर्षी छबिन्यासाठी आवश्यक असणारे अब्दागिरी, मोर्चेल, पंखे, चवऱ्या, राजदंड, दिवट्या, छत्र इ. साहित्य आणून उत्सवातील सर्वही मानाचे वाटप झाले. या छबिन्याच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मानकरी, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती.

चैत्र शु. प्रतिपदेपासून चैत्र शुद्ध दशमीपर्यंत उत्सवातील उत्साहाची चढती कमान राहिली. पहाटे काकड आरती, श्रीराम पंचायतन महापूजा, छबिना, श्रीरामकथा, सामुदायिक रामनामजप, सायंआरती, सायं. छबिना, दासबोध वाचन, कीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम चालत असे.

उत्सवात ह.भ.प.रामचंद्र पेनोरे, ह.भ.प.गणेश म.डांगे, ह.भ.प. विलासबुवा गरवारे, स.भ. राघवेंद्र रामदासी, ह.भ.प.ज्ञानेश्वर मुगगांवकर यांची कीर्तनसेवा श्रीरामचरणी रुजू झाली. स.भ.मंदारबुवा रामदासी यांनी श्रीरामकथा निरूपणाची सेवा कली. स.भ.शहाजीबुवा रामदासी यांनी चैत्र शु. ५ व ६ ला रामदासी भजनसेवा रुजू केली.

अनेक वर्षांपूर्वी खंडित झालेली लळीत कीर्तन परंपरा पुनश्च सुरू झाली. स.भ.राघवेंद्रबुवा रामदासी यांनी लळिताचे कीर्तन केले. उत्सवातील संपूर्ण दहा दिवस दुपारी भक्तांना महाप्रसाद देण्यात आला.

मागील वर्षी अधिक मासात १३ कोटी श्रीरामनाम जपाचा संकल्प ग्रामस्थांनी केला आहे. दररोज सकाळी व सायंकाळी दीड तास नामोपासनेसाठी सुमारे १०० नामसाधक मंदिरात उपस्थित असतात. ७ कोटी जप पूर्ण झाला आहे. सर्व ग्रामस्थांच्या वतीने सद्गुरू श्रीदेवदास स्वामींच्या समाधी मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निश्चय झाला आहे, ही या उत्सवाची मोठी उपलब्धी आहे.

'भक्ती ही सामाजिक शक्ती आहे' याचा प्रत्यय ग्रामस्थ आणि देवस्थानचे विश्वस्त यांनी आणून दिला आहे. सर्वांच्या योगदानाने हे कार्य उत्तरोत्तर वाढत आहे.

**श्री. सुनिल निंबाळकर, दादेगाव**

## काळोशी येथे व्यायाम शाळेचे उद्घाटन

श्री क्षेत्र सज्जनगड परिसरात पायथ्याशी असणाऱ्या सोनवडी या गावास संस्थानतर्फे गेल्या वर्षी साहित्य देण्यात आले होते. त्यानंतर हनुमान जयंतीचे औचित्य साधून गडाच्या पंचक्रोशीतील काळोशी या गावास व्यायाम (जिमचे) साहित्य देण्यात आले. हनुमान जयंतीच्या दिवशी दुपारी काळोशी येथील २०० तरुणांनी मारुतीरायांच्या मूर्तीची मोठी मिरवणूक काढली. नंतर व्यायाम शाळेत स.भ.शहाजीबुवा रामदासी यांच्या हातून मूर्तीची स्थापना करण्यात आली. मूर्तीची व साहित्याचे पूजन झाल्यानंतर सर्व तरुणांना व्यायामाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. व्यायाम शाळेचे नाव श्रीशिवसमर्थ व्यायाम शाळा असे ठेवण्यात आले.

**स.भ.शहाजीबुवा रामदासी, सज्जनगड**

# शिरगाव येथील ग्रंथराज दासबोध पारायण वृत्तांत

**दासबोधी समर्थ निवास। ग्रंथी वरदान निजध्यास।**
**निजध्यासेंचि प्रत्ययास। येत ग्रंथ स्वरूप।।मेरूस्वामी.**

दरवर्षीप्रमाणे शिरगाव येथे ग्रंथराज दासबोध पारायण सोहळा पार पडला. शिरगाव येथे श्री समर्थांचे पट्टशिष्य श्री कल्याणस्वामींचे बंधू श्री. दत्तात्रय स्वामींचे समाधी मंदिर आहे. त्याच ठिकाणी श्री समर्थ स्थापित मारुती व श्री समर्थांची बसण्याची गुफा आहे. तसेच दत्तात्रय स्वामींच्या वंश परंपरेतील अनेक सत्पुरुषांच्या समाध्या त्या ठिकाणी आहेत.

मनाच्या श्लोकांची आरती लिहिणारे श्री यशवंत स्वामी यांचीपण समाधी तेथेच आहे. असे ते अत्यंत पवित्र ठिकाण आहे. त्या ठिकाणी गेली पंधरा वर्षे ग्रंथराजाचे पारायण सुरू आहे. यावर्षी दि. ३० मार्च ते ५ एप्रिलपर्यंत पारायणाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात त्या ठिकाणी कार्यक्रम संपन्न झाले. त्यात अनेक नामवंत कीर्तनकारांची कीर्तने त्या ठिकाणी झाली. दररोज संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत शिवचरित्र कथन वक्ते श्री. घनःश्याम ढाणे यांचा कार्यक्रम झाला. सकाळी ८ ते १२ यावेळेत ग्रंथराजाचे वाचन व निरूपण. संध्याकाळी उपासना, हरिपाठ, रात्री कीर्तनानंतर भजन असे भरगच्च कार्यक्रम पार पडले. या पारायणात मोठ्या प्रमाणात गावकऱ्यांचा सहभाग होता. शंभर वाचक पारायणासाठी बसले होते. त्यात तरुण व तरुणींची संख्या जास्त होती. मध्यप्रदेश ग्वालियरहून श्री. दत्तात्रय स्वामींचे वंशज श्री.राघवेंद्र महाराज व श्री. उपेंद्र महाराज संपूर्ण कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच त्यांच्या बरोबर १०-१२ भक्त पारायणासाठी ग्वालियरहून आले होते. पारायण दरम्यान अनेक मान्यवर शिरगाव येथे येऊन गेले. त्यात श्री. समर्थ वंशज भूषण स्वामी, श्री. विजयराव ठोंबरे, श्री. कुबेर काका, आर. एन. कुलकर्णी, डॉ. भारत कुलकर्णी, जालना.

दि. ६ रोजी रात्री ''शिवरायांचा आठवावा प्रताप'' नावाचे छोटेस नाटक झाले. त्याची निर्मिती श्री. घनःश्याम ढाणे यांनी शिरगावमधील २० ते २५ छोट्या मुलांना घेऊन हे नाटक बसवले होते. गावकऱ्यांनी खूप मेहनत घेऊन पारायण सोहळ्यास वेगळे स्वरूप आणले.

**स.भ.शहाजीबुवा रामदासी, सज्जनगड**

# खातगांव जि.नगर येथील हनुमान जन्मोत्सव सोहळा

खातगांव ग्रामस्थ व समर्थ भक्तांच्या उपस्थितीत हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न झाला. श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने हे समर्थ कार्य सुरू झाले.

नगरचे मा. खासदार श्री.दिलीप गांधी यांनी त्यांच्या स्थानिक विकास निधीतून या सांस्कृतिक सभागृहासाठी दहा लक्ष रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे या सभागृहाचे काम पूर्ण झाले व दि. २४/४/२०१३ रोजी मा.दिलीपजी गांधी यांचे हस्ते या सांस्कृतिक सभागृहाचे उद्घाटन झाले. यावेळी नगरचे वेदमूर्ती श्री. धर्माधिकारी गुरूजी श्री.सुनिल रामदासी, कर्जत तालुक्यातील सर्व पदाधिकारी, सरपंच, ग्रामस्थ तसेच वारकरी व रामदासी संप्रदायाचे मान्यवर उपस्थित होते. हनुमान जन्मोत्सव सोहळाही मोठ्या प्रमाणात संपन्न झाला. पंचक्रोशीतील भक्तगण, तसेच पुणे,नाशिक, नांदेड, जालना, औरंगाबाद, नगर येथील समर्थभक्त मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

ग्रामस्थ व न्यासाच्या वतीने या सांस्कृतिक सभागृहात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. डॉ. विद्याधर कुंभार, (एम.डी. आयुर्वेद) व तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने खातगांव व पंचक्रोशीतील नव्वद टक्के ९०% कुपोशीत मुले कुपोशणमुक्त झाले आहेत. समर्थकृपेने व ग्रामस्थ व समर्थ भक्तांच्या पूर्ण सहकार्यातून हे उपक्रम सुरू आहेत.

# दासनवमी वृत्त - बार्शी

दासनवमी महोत्सव समिती, बार्शीच्या वतीने आयोजित केलेला दासनवमी उत्सव येथील भगवंत मंदिरात आठ दिवस मोठ्या उत्साहात पार पडला. दि.२६ फेब्रुवारी रोजी सकाळी पादुकांची प्राणप्रतिष्ठा झाली. दि. २७ फेब्रुवारी पासून सकाळी ८ ते १२ या वेळेमध्ये दासबोध पारायण होत असे. सुमारे ६५ समर्थभक्त पारायणामध्ये सहभागी झाले होते. श्री.बंडोपंत पोळ व श्री.इंगळे काका दासबोधाचे वाचन करीत होते.

रोज सकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत काकड आरती होत असे. दि. २७ फेब्रुवारी पासून समर्थ साहित्यग्रंथ विक्रीला प्रारंभ झाला. सामुहिक मनाचे श्लोक व करूणाष्टके दररोज सायंकाळी ५ ते ६ या वेळेत होत असत. दि. २८ फेब्रुवारी १३ ते ५ मार्च दरम्यान दररोज सायं. ६ ते ८ या वेळेमध्ये व्याख्यान, प्रवचनं, किर्तन आयोजित केले होते.

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प माजी प्राचार्य रामचंद्र गौरकर (बार्शी) यांनी गुंफले. 'दासबोधाचे महत्त्व' या विषयावर बोलताना ते म्हणाले सामान्य माणसापासून अध्यात्माच्या मार्गाला लागलेल्या प्रत्येकाला मार्गदर्शन करणारा दासबोध हा ग्रंथ आहे. सगुणाच्या आधारे निर्गुणाची उपासना करणाऱ्या 'बद्ध ते सिद्ध' या पारमार्थिक प्रवासातील साधकांचा तो पथदर्शक आहे. सतराव्या शतकात समर्थ रामदासांनी मरगळलेल्या मराठी माणसाच्या मनात राष्ट्रप्रेमाची धगधगती ज्योत प्रज्वलित करण्याचे काम केले. त्या कामामध्ये परकीय सत्तेचे आक्रमण होते. तर आता 'परकीय वृत्तीचे' आक्रमण होत आहे. आज स्वातंत्र्य आहे पण समाजात 'नैतिक' आणि 'सामाजिक ध्येयवाद' नाही म्हणून पूज्य समर्थांच्या वाङ्मयाकडे समाजाचे लक्ष वेधणे जरूरीचे आहे.

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प श्री.पद्मनाभ व्यास (तेर) यांनी गुंफले. 'जयासि आवडे भगवंत' या विषयावर बोलताना ते म्हणाले, ज्याला भगवंत मनापासून आवडतो त्याच्या संकटाचे ओझे देवावर पडते. भगवंत त्याच्या संकटात धावून जातो. **जयास भगवंत आवडे। तयाचे देवासि साकडे। संसार दुःख सकळ उडे। निजदासाचे ।।**

माणसाच्या आवडीचा विषय हा 'विषय' असतो. आम्ही देव आवडतो असे म्हणतो पण ते वास्तव नसते. इतर आवडीच्या तुलनेत माणसाला, भगवंताची आवड कमी असते. देव आवडतो म्हणणाऱ्यांमध्ये दंभ असतो. ज्यांना जीवापासून देव आवडतो त्यांच्या चित्तामध्ये देवाची आवड असते. भगवंत व भक्ताचे वर्णन या ओवीमध्ये आहे. तिसरे पुष्प रेणू रामदासी, दिंडोरी यांनी गुंफले. रामपंचायतन या विषयावर त्यांचे सुश्राव्य प्रवचन झाले.

चौथे पुष्प राष्ट्रीय किर्तनकार भरतबुवा रामदासी, बीड यांनी गुंफले. समाजामध्ये नैतिक परिवर्तन करण्याची ताकद फक्त संतविचारांमध्ये आहे. संतविचारांचे बीजारोपण झाले असते तर 'दिल्ली प्रकरण' घडले नसते. समाजातील वाढता चंगळवाद माणसामध्ये विकृती निर्माण करीत आहे असे प्रतिपादन भरतबुवा रामदासी यांनी आपल्या कीर्तनामधून केले. पाचवे पुष्प सचिन जहागिरदार (पुणे) यांनी समर्थ शिष्यावर कल्याण स्वामी या विषयावर गुंफले. समर्थ रामदास व कल्याण स्वामी ही जोडी गुरुशिष्य परंपरेमधील 'मेरूमणी' आहे. मृत्युनंतरही कल्याणस्वामींनी समर्थांची साथ सोडली नाही असे ते म्हणाले.सहावे पुष्प सौ. अपर्णा धनंजय कुलकर्णी (पुणे) यांनी गुंफले. रामायणातील ऋषींची सविस्तर माहिती त्यांनी उदाहरणासह दिली.सातवे पुष्प श्री.प्रसाद बुवा कुलकर्णी यांनी गुंफले. दासनवमी दिवशी सकाळी ८ ते १० या वेळेत ग्रंथ दिंडी व प्रभात फेरी काढण्यात आली. काल्याचे कीर्तन रामबुवा जोशी(बीड) यांनी केले. दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसाद झाला. सुमारे दोन हजार नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

दासनवमी महोत्सव समितीचे निमंत्रक अजय कुलकर्णी, प्रभाकर जपे, शिवाजी ठोंबरे, बिपीन नाईकवडी दादासाहेब बुडूख, संजय कुलकर्णी, विजय घुमरे यांनी दासनवमी महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

**स.भ.रामचंद्र गौरकर**

# ग्रंथमात्र धांडोळावा...



## प्रश्नमंजुषा

या अंकापासून आपल्या 'रघुवीर समर्थ' मासिकाच्या प्रत्येक अंकात त्या अंकातील लेखांवर आधारित 'प्रश्नमंजुषा' सुरू करित आहोत. साधारण प्रत्येक लेखातून एक प्रश्न काढला आहे.आपला अभ्यास वाढावा व वाचक समर्थ भक्तांशी संवाद घडावा, हा मुख्य हेतू आहे. सर्वाधिक योग्य व अचुक उत्तरे लिहून पाठविणाऱ्या निवडक वाचकांची नावे मासिकातून प्रसिध्द केली जातील,

१) श्री समर्थ रामदास स्वामी वेण्णास्वामींना कोणत्या नावाने संबोधत असत ?

२) योगवासिष्ठामध्ये रामाने चित्ताला कोणत्या उपाध्या दिल्या आहेत ? आणि तदनुषंगाने येणारे अडथळे कोणत्या अभंगाने दर्शविले आहेत ?

३) कोणत्या नियमांचे पालन केले असता एक उत्तम लेखक तयार होतो ?

४) उदासीनता म्हणजे काय ? आणि जीवनात औदासिन्य कोणत्या गोष्टीकरिता बाळगल्याने समाधान मिळेल ?

५) सर्व स्त्रीसमाज सुधारकांचे व श्रीसमर्थांचे स्त्री समाज सुधारणेतील वैशिष्ट्य कोणत्या रूपाने समोर येते ?

६) वेण्णास्वामींनी रचलेली व लेखात उल्लेखिलेली सर्वात जास्त ओवी संख्या असलेली ग्रंथरचना कोणती? व तिचे वैशिष्ट्य काय ?

७) श्रीमत् भागवतात सांगितलेली भगवंताची पाच पूजास्थाने कोणती ?

८) भगवंताच्या कृपाशिर्वादाने साध्यापर्यंत पोहोचता येते या करिता पुराणातील कोणकोणत्या भक्तांचे दाखले दिले आहेत ?

९) श्रीसमर्थांनी संतसंगती कोणत्या उद्देशाने सांगितली आहे ?

१०) भक्त प्रल्हादाच्या पित्याचे नाव काय ? व भगवंताने कोणत्या अवतारात त्याचा वध केला ?

११) भगवंताचे आणि अर्जुनाचे सख्य कशाप्रकारचे आहे ?

१२) भक्तिमार्गाची पंचपदी कोणती ?

१३) सनत्कुमारांच्या शापामुळे जय व विजय यांना किती वेळा व कोणकोणत्या रूपाने जन्म घ्यावा लागला ?

**प्रश्नमंजुषेचे उत्तर पाठविण्याचा पत्ता :**

**श्री. अमृतबुवा रामदासी ('रघुवीर समर्थ' मासिक 'प्रश्नमंजुषे' करिता)**

**श्री रामदास स्वामी संस्थान, श्री रामदास स्वामींचा मठ,**

**मु.पो. सज्जनगड, ता.जि. सातारा. पिन ४१५०१३**

**मो. ९४०४५९०७७३**



श्री दत्तात्रय स्वामी मठ, शिरगाव येथे ग्रंथराज दासबोध पारायणात सहभागी समर्थ भक्त व व्यासपीठ संचालन करताना स.भ.श्री.शहाजीबुवा रामदासी

## शिरगाव



शिरगाव येथे सांप्रदायिक भिक्षा मागताना
महंत श्री.उपेंद्र महाराज व रामदासी मंडळी



श्री.घनश्याम ढाणे श्री शिवचरित्र कथन करताना



संस्थानतर्फे आयोजित निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात
डॉ. संदिप श्रोत्री यांचा सत्कार करताना संस्थानचे अध्यक्ष श्री.भूषण स्वामी



खातगाव येथील श्री हनुमान जंयती उत्सवास मा.खासदार श्री.दिलीप गांधी
यांनी सदिच्छा भेट दिली, त्याप्रसंगी स.भ.श्री.मोहनबुवा रामदासी

## दादेगाव





श्री देवदास स्वामी मठ,दादेगाव येथील श्रीरामनवमी उत्सवातील छबिना व छबिन्यात सहभागी झालेले भक्तगण

RNI - MHMAR/2007/19142 Regd. No. SATARA/036/2013-2015

।। श्रीराम समर्थ ।।

# युवा संस्कार वर्ग शिबिर,सज्जनगड

दिनांक १ जून २०१३ ते ९ जून २०१३ या कालावधीमध्ये श्री क्षेत्र सज्जनगड येथे श्री रामदास स्वामी संस्थानद्वारा आयोजित संस्कार शिबिर संपन्न होणार आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शालेय सुट्टीचे कालावधीमध्ये युवा वर्गासाठी (वय १५ ते २५ वर्षेपर्यंत मुले व मुली) श्री रामदास स्वामी संस्थानतर्फे विनाशुल्क संस्कार वर्ग शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिराच्या माध्यमातून मनाचे श्लोक, व्यायाम, सूर्यनमस्कार, लेझीम, समर्थ वाङमयातून सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास, भारतीय कलांची माहिती, भारतीय संस्कृतीची ओळख, भारतीय क्रांतीकारकांच्या विषयी माहितीपर व्याख्याने, ऐतिहासिक प्रसंग वर्णन माहिती, दैनंदिन उपासना व तदनुषंगाने प्रश्नमंजुषा मालिका असे अनेक प्रबोधनात्मक आणि संस्कारक्षम सांस्कृतिक कार्यक्रम सज्जनगडावर संपन्न होणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.

पाश्चात्य संस्कारांचे अनुकरण हे नकळत आपणाकडून दैनंदिन जीवनात होणे हे नित्याचे झाले आहे. पण त्यास आवश्यकतेप्रमाणे घेऊन भारतीय संस्कृतीची उपासना आपल्या युवा वर्गातून घडावी आणि उपासनेकरिता त्याच्या माहितीची जोपासनाही व्हावी व मनाने सक्षम व विचारांनी सुसंस्कृत अशी युवा पिढी समाजात कार्यरत व्हावी, या सद्हेतूने या संस्कार शिबिराचे आयोजन श्रीशिवसमर्थांच्या पदस्पर्शाने शतशः पुण्यपूनीत झालेल्या श्रीक्षेत्र सज्जनगडावर श्री रामदास स्वामी संस्थान सज्जनगड तर्फे आयोजित केलेले आहे.

या शिबिरांतर्गत गेल्या वर्षीच्या मुलांच्या पालकांच्या आग्रहास्तव शेवटचे दोन दिवस, ८ व ९ जून या कालावधीमध्ये पालकांचे शिबिर घेण्यात येणार आहे. इच्छुक पालकांनी शिबिरात सहभागी होण्याची पूर्वकल्पना संस्थानच्या कार्यालयात देणे आवश्यक आहे.

**संपर्क : श्री रामदास स्वामी संस्थान सज्जनगड**

स. भ. मोहनबुवा रामदासी - ९७२११७७८२१,
श्री.अमृतबुवा रामदासी - ९४०४५९०७७३,
श्री.शहाजीबुवा रामदासी - ९४२१८७१८६८
श्री.आनंद मुळीक - ९४०५२५०८३०

श्री.भूषण स्वामी
अध्यक्ष व अधिकारी स्वामी
श्री रामदास स्वामी संस्थान सज्जनगड

प्रेषक :

।। रघुवीर समर्थ ।।

श्री रामदास स्वामी संस्थान,श्री रामदास स्वामींचा मठ,
सज्जनगड, जि. सातारा, पि.४१५ ०१३. फोन : (०२१६२) २७८२२१

प्रति,